

म. ग्रं. सं. ठाणें
विषय भू-प्रवास
सं. क्र. ५५०


# आपला भारत

# गरवी गुजरात






REFBK-0019007





आपला भारत : ४



# गरवी गुजरात

राजा
मंगळवेढेकर

REFBK-0019007

नितीन प्रकाशन
पुणे

प्रकाशक
सौ. सुधा वसंत गोगटे
नितीन प्रकाशन
११८२ सदाशिव पेठ
पुणे - ३०

प्रथमावृत्ती
५ मे १९७२

© राजा मंगळवेढेकर

किंमत
चार रुपये

मुद्रक
शशिकान्त महादेव देव
सुलभ मुद्रणालय
२९१ शनिवार पेठ
पुणे - ३०

**प्रिय यदुनाथजी थत्ते**

मला लिहिते करणाऱ्यांपैकी
तुम्ही एक आहात

□ □

भारत देश महान आहे !
या महानतेत विपुल विविधता आहे.
विविध प्रान्त, विविध भाषा,
विविध साहित्य, विविध कला...
घरदार, राहणीमान, खाणेपिणे,
सणसमारंभ, वेषभूषा:..
विविधता हे भारताचे वैशिष्ट्य.
आणि या विविधतेतही एकता
हा भारताचा आत्मा !
हेच भारतीयत्व !
आपण सारे भारतीय आहोत.
भारताचा आत्मा जाणून घेऊ या !
भारतीयत्व ओळखू या !
त्यासाठीच हा एक प्रयत्न.

□ □

## भिन्नतेत या अभिन्न

भिन्नतेत या अभिन्न आज गाऊ आरती
लक्ष हस्त, लक्ष पाद, हृदय एक भारती ।
भिन्न वेष, भिन्न भाष, भिन्न धर्मरीती
भिन्न जात, भिन्न पंथ, तरीही एक संस्कृती ॥ १ ॥

भिन्न रंग, भिन्न ढंग, भिन्न भाव आकृती
भिन्न छंद, भिन्न बंध, आगळी कलाकृती ।
भिन्न वाणी, भिन्न गाणी, अर्थ एक वाहती
भिन्न शौर्य, भिन्न धैर्य, घोष एक गर्जती ॥ २ ॥

भिन्न भवन, भिन्न हवन, भिन्न क्षेत्र मानिती
लहर लहर भिन्न तरी, एक गगन-माती ।
भिन्न तार, ताल तरी, एक मधुर झंकृती
कमलपुष्प हासते पाकळ्यांतुनी किती ॥ ३ ॥

राजा मंगळवेढेकर

गुणवंती गुजरात ... १
साक्षी इतिहास ... १०
लोक आणि लोकाचार ... २६
भाषा आणि साहित्य ... ३९
कलाप्रिय गुजरात ... ५९
स्थल-यात्रा ... ७५
अर्वाचीन गुजरातचे शिल्पकार ८६
विकासोन्मुख गुजरात ... ९३
गुर्जराती लोकसाहित्य ... ९७
संभाषण ... १०४
गुजरात-गीत ... १०६

१२००८

# गुणवंती गुजरात

हमारो गुणियल गुर्जर देश
ग्रीस, रोम थी य जूना
कुरु–पांडव थी य प्राचीन
सोमनाथ, गिरिनगर, द्वारिका
युग–युग ध्यान विलीन
उभी ते कालसिंधु ने तीर
बजावे बंसरी भव्य सुधीर
हमारो गुणियल गुर्जर देश

—आमचा हा गुणवंत असा गुजरात देश आहे. ग्रीस-रोम या साम्राज्यांहून किंवा कौरव-पांडव यांच्या काळापेक्षा प्राचीन अशी ही भूमी आहे.

एखाद्या योग्याप्रमाणे ध्यानधारणेत गढून गेलेली सोमनाथ, गिरनार व द्वारिका ही इथली स्थळे कालसागराच्या भव्य काठावर धीर-गंभीर असे बासरीचे स्वर घुमवीत युगानुयुगे उभी आहेत.

आमचा हा गुणवंत गुजरात देश आहे.

गुजरातचे श्रेष्ठ कवी न्हानालाल यांनी गुजरातमहिमा गायलेला आहे. गुजरात-गौरव वर्णिलेला आहे.

गुजराती माणसाने गौरव-गीते गावीत आणि अन्य भारतीयांनी त्यांच्या स्वरात स्वर मिसळून अभिमान बाळगावा अशीच ही गुणवंत-गुणियल भूमी आहे. भगवान श्रीकृष्णाने आपली ‘ सोन्याची द्वारिका ’– राजनगरी वसवली ती याच भूमीवर आणि म. गांधीजींनी आपला ‘ सत्याग्रह-आश्रम ’ स्थापिला तो

याच भूमीवर. बलराम-श्रीकृष्णांनी येथल्याच प्रभासपट्टण नगरीत देहोत्सर्ग करून अवतार-समाप्ती केली, आणि कृष्णसखा सुदाम्याच्या सुदामपुरीत, म्हणजेच आजच्या पोरबंदर गावात गांधीजींचा जन्म झाला. 'वैष्णव जन तो तेणे कहिये, जो पीड पराई जाग रे।' हे भजन संत नरसी मेहताने इथेच गायले आणि बौद्ध, जैन, पारशी, मुस्लिम हे भिन्न, भिन्न धर्म-पंथही येथे सहिष्णुतेने वागले, वाढले. अशा व्यापक-उदार-सर्वसमावेशक वृत्तीमुळेच गुजराती माणूस भारताच्या भिन्न भिन्न प्रांतांत जाऊन रमला आणि गुजरातेत राहून 'जय जय गरवी गुजरात' म्हणत असताना देखील,

**'ईस्लामी यात्राळीनुं आ मक्कानुं मुखबार**
**हिंदु मुसल्मिन पारसीओने अहिंया तीरथद्वार**
**प्रभु छे एक, भूमि छे एक, पिता छे एक, मात छे एक....**

अशा भावनेने वागत आला. गुर्जर भूमी कशी, तर न्हानालालच्याच शब्दात तो म्हणतो—

**'हिंद मातानी लाडिली बाळ**
**जय जय गुर्जरी ! तव चिरकाळ !'**

कधी कविवर्य उमाशंकर जोशींच्या शब्दात तो म्हणतो—

**'भारतनी भोममां झाझेरी गुजरात**
**गुजरात मोरी मोरी रे !'**

तर कधी त्यांचेच गीत गातो—

**'हुं गुर्जर भारतवासी !**
**सर्व धर्म सम, सर्व धर्म मम, उर ए रहो प्रकाशी।**
**सदा जागरूक, जगत नागरिक, सागरतीर्थ निवासी।**
**हुं गुर्जर भारतवासी !'**

आणि अशी विशाल, विश्वमानुषत्वाची, भारतीयत्वाची अनुभूती घेत असतानाच तो आपल्या गुर्जरी भूमीविषयी मांगल्यगर्भ उद्‌बोधनाची आकांक्षा कवी मनसुखलाल झवेरींच्या शब्दात व्यक्त करतो—

**'तव ऊड, गुर्जरी ! ऊड !**
**पांख तुज सबळ, गगन सुविशाळ !**

**तुज भूतकाळ अति भव्य;**
**भव्यतर निश्चय आवती काल !'**

अशी ही गुर्जर भूमी भारताच्या पश्चिम दिशेला वसलेली आहे. गुजरातचे भाग्य असे की भारताच्या किनारपट्टीच्या एकतृतीयांश एवढा, म्हणजे सुमारे १६०० किलोमीटर लांबीचा सिंधूसागराचा किनारा पश्चिमेस लाभलेला आहे. ईशान्य दिशेला प्यारो राजस्थान आहे, आग्नेय दिशेला समृद्ध मध्य-प्रदेश आहे, दक्षिणेस दगड–फुलांचा महाराष्ट्र आहे, तर वायव्येला पश्चिम पाकिस्तानचा शेजार लाभलेला आहे.

कविवर्य नर्मदाशंकर यांनी आपल्या 'जय जय गरवी गुजरात' गीतात गुजरातची चतुःसीमा अशी वर्णिलेली आहे :

**उत्तरमां अंबा मात,**
**पूरबमां काळी मात,**
**छे दक्षिण दिशमां करंत रक्षा कुंतेश्वर महादेव ।**
**ने सोमनाथने द्वारकेश ए, पश्चिम केरा देव ।**
**छे सहायमां साक्षात, जय ! जय ! गरवी गुजरात ।।**

— उत्तरेला आबूच्या पर्वतावर असलेली अंबाली माता आहे, पूर्वेला पावागडची कालिकामाता आहे, दक्षिणेस कुंतेश्वर महादेव शत्रूंपासून रक्षण करीत असून पश्चिमेस सोमनाथ आणि द्वारकेश साक्षात् श्रीकृष्ण गुजरातच्या साहाय्यार्थ सदैव सिद्ध आहे !

ब्रिटिश आमदानीत गुजरात मुंबई इलाख्यात समाविष्ट होता. कच्छ-काठेवाडातील बराचसा प्रदेश तत्कालीन संस्थानात होता. स्वातंत्र्यापूर्वी भारतात सुमारे ६०० संस्थाने होती. त्यांपैकी २७० एकट्या सौराष्ट्र-गुजरातमध्येच होती. यावरून गुजरात त्या वेळी किती लहान लहान तुकड्यात विभागलेला होता याची कल्पना येईल. १९४७ साली भारतीय स्वातंत्र्यानंतर सरदार वल्लभभाई पटेलांच्या मुत्सद्दीपणाने हिंदी संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलिनीकरण झाले. त्या वेळी काठेवाड-कच्छ मधील संस्थानांचे १९४८ मध्ये 'सौराष्ट्र' नावाने एक स्वतंत्र राज्य निर्माण करण्यात आले. जुनागडच्या नबाबाने त्या वेळी संस्थान भारतात सामील करण्यास टाळाटाळ करून पाकिस्तानशी संधान जमविले होते. परंतु जुनागडच्या प्रजेने याला विरोध केला व भारतात सामील होण्याची आपली इच्छा व्यक्त केली. सामोपचाराने भागले नाही तेव्हा भारत सरकारलाही सैन्याची हालचाल करावी

लागली. परंतु संस्थान सोडून नबाब पाकिस्तानात पळून गेला. जुनागड सौराष्ट्रात आले. पुढे भाषावर प्रांतरचनेच्या घडामोडीत फाजलअली कमिशनने गुजरात–महाराष्ट्राचे द्विभाषिक राज्य असावे अशी शिफारस केली व त्यानुसार १ नोव्हेंबर १९५६ रोजी दोन्हींकडची सर्व संस्थाने विलीन करून द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. परंतु याने मराठी व गुजराती भाषिकांचे समाधान झाले नाही, आणि दोन्ही प्रदेशांत स्वतंत्र भाषिक राज्यांसाठी प्रचंड आंदोलने झाली. त्यातूनच १ मे १९६० रोजी द्विभाषिकाचा अंत झाला आणि समस्त गुजराती भाषिकांचे 'महागुजरात' राज्याचे स्वप्न साकार झाले.

आजच्या गुजरात राज्याचे प्रामुख्याने तीन नैसर्गिक विभाग पडतात : (१) गुजरात, (२) कच्छ व (३) सौराष्ट्र. तथापी, काही प्रदेश स्थानिक नावानेच तेथे ओळखला जातो. साबरमती व मही नदीच्या मधल्या प्रदेशाला 'चरोतर' म्हणतात. ही भूमी फार सुपीक आहे. बडोद्याच्या दक्षिणेला 'वाकल' म्हणतात, भडोचच्या दक्षिण भागाला 'कानम' म्हणतात, तर सौराष्ट्राचा बहुतेक भाग राजपूत राजांमुळे झालावाड, गोहिलवाड आदी 'सोरठ' नावाने ओळखला जातो.

गुजरात विभागात बहुतेक मैदानी प्रदेश आहे. दक्षिणेस सुरतजवळ २५ किलोमीटर इतका अरुंद असलेला त्रिकोणी मैदानी पट्टा उत्तरेच्या वाळवंटी भागाला मिळताना बराच प्रशस्त, रुंद बनलेला आहे. किनारपट्टीचा प्रदेश गाळाच्या जमिनीमुळे सुपीक झालेला आहे.

कच्छच्या द्वीपकल्पाभोवती समुद्र असून पूर्वेला व उत्तरेला रण पसरलेले आहे. पावसाळ्यात पाण्याने हा भाग भरून जातो. या भागात रेताड मैदाने व खडकाळ डोंगर विखुरलेले आहेत. किनाऱ्याला लागून वाळूच्या टेकड्या आहेत. त्यांमागे चदुवा व धोला नामक पूर्व-पश्चिम डोंगररांगा आहेत.

सौराष्ट्र म्हणजेच भारताच्या नकाशात पश्चिमेकडे वेगळे दिसणारे काठेवाडचे द्वीपकल्प होय. याच्या पूर्वेस मैदानी व पश्चिमेस दलदलीचा प्रदेश आहे. कच्छचे व खंबायतचे रण आणि नल सरोवर यांनी या द्वीपकल्पास पूर्वेस व वायव्येस आपल्या बाहुपाशात घेतले आहे. या भागातील किनारा चिखलमय आहे. दीवपासून कच्छच्या आखातापर्यंतचा किनारा सपाट व वाळूच्या टेकड्यांनी व्यापलेला आहे. हा प्रदेश किनाऱ्यापासून लाटांप्रमाणे मध्यावरील डोंगराळ भागाकडे उंचावत गेलेला

आहे. या भागातील डोंगर एकमेकांना समान्तर असे उत्तर-पूर्व व दक्षिण-पश्चिम असे पसरलेले आहेत. उत्तर भागात कनडोल्याचा, चोटिल्याचा व गोपचा हे प्रमुख डोंगर आहेत, तर दक्षिण भागात प्रसिद्ध गिरनार पर्वत, शत्रुंजय किंवा पालिताणा, नंदी-वेला, तुळशी-श्याम, तळजालोर हे आणि सान्याचे डोंगर आहेत. पोरबंदरच्या ईशान्येस बरदा व पूर्वेला ओसाम हे डोंगर आहेत. हे डोंगर ज्वालामुखीपासून बनलेले आहेत. गुजरात राज्याला लांबवर पसरलेला जेवढा समुद्रकिनारा लाभलेला आहे तेवढी डोंगरांची समृद्धी लाभलेली नाही.

गुजरातमधून साबरमती, तापी, मही, बनास, सरस्वती, नर्मदा या मोठ्या नद्या वाहतात. त्याशिवाय भादर, शेत्रुंजी, आजी, मच्छू, दमणगंगा, विश्वामित्री ह्या लहान नद्या वाहतात. कच्छ भागात लहान, उथळ पात्राच्या नद्या आहेत. राजस्थानातून आलेली लूणी ही खारी नदी कच्छच्या आखातात अंतर्धान पावते. लूणीव्यतिरिक्त कच्छमध्ये अनेक लहान—लहान नद्या आहेत.

काठेवाडच्या सागरकिनाऱ्याला लागून बऱ्याच खाड्या आहेत. पीरम, चांच, श्रियाळ, दीव, ब्येट व चांका ही बेटेही आहेत. खंबायतचे रण पावसाळ्यात जलमय होते. आसपासची खेडीही पाण्याने वेढली जाऊन बेटे बनतात.

काठेवाडातील बहुतेक नद्या मध्यभागी असलेल्या उंचवट्याच्या प्रदेशात उगम पावतात आणि चोहोबाजूस वाहतात. पावसाळ्यात या नद्यांची पात्रे दुथडी भरलेली असतात, पण उन्हाळ्यात मात्र ती कोरडी पडतात.

गुजरातच्या ईशान्येस अरवली, पूर्वेस विंध्य, सातपुडा व सह्याद्री या पर्वतांच्या शिखररांगा घुसलेल्या आहेत. या पर्वतांच्या उदरातून असंख्य जलप्रवाह निघतात आणि तेथील नद्यांना जलमय बनवतात. या प्रदेशाला सखल पण रेती व लवणे याने व्याप्त असा किनारा लाभलेला आहे. तथापी जहाजे येऊ शकतील अशा मोठ्या नऊ-दहा खाड्याही आहेत.

गुजरात राज्यात कच्छच्या रणाच्या पश्चिमेकडील 'सिंधी' सरोवर, खंबायतच्या आखाताच्या मध्यावर असलेले 'नळ' सरोवर व 'माधवपूर'ची सरोवरे विशेष प्रसिद्ध आहेत.

गुजरातच्या पश्चिम किनाऱ्यावरील प्रदेश आणि काठेवाडच्या पूर्वेकडून पोरबंदरपर्यंतचा किनारी प्रदेश व तेथील माती अलिकडील काळात बनलेली

नवी ' गाळाची माती ' ( लोएस ) आहे. पोरबंदरने कच्छच्या छोट्या रणापर्यंतच्या किनारी व थोड्या आंतरभागाची जमीन तांबडी व पिवळी ' रेताड ' आहे. या भूमीलगतच गुजरातच्या पूर्वेस व काठेवाडच्या मध्यावरील प्रदेशाला ' रेगूर ' म्हणजे खोल्वर काळी अशी सकस जमीन आहे. उत्तर गुजरात व कच्छ या भागात ' गोराडू ' म्हणजे मिश्रगाळाची जमीन आहे.

शेती हाच प्रमुख व्यवसाय असून राज्यांतील जमिनीपैकी ५४ टक्के जमीन लागवडीखाली आहे. अन्नधान्याच्या बाबतीत तसा हा प्रदेश प्रारंभापासूनच तुटीचा आहे. पण ही तूट भरून काढण्याचा प्रयत्नही नव्या विकास कार्यान्वये होत आहे. ह्या प्रयत्नामुळे धान्योत्पादनात अलीकडील काळात जी वाढ झाली आहे ती लक्षात घेता गुजरातचा भारतात दुसरा क्रमांक लागतो. परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे वाढते उत्पादनही अपुरे पडते.

गुजरातच्या भूमीत भात, गहू, बाजरी, ज्वारी, मका, डाळी आदींचे उत्पादन होते. कापसाचे उत्पादनही गुजरातमध्ये मोठ्या प्रमाणावर होते. ऊस, केळी, जिरे, बडिशेप ही पिके काही विशिष्ट भागात चांगली होतात. भुईमुगाच्या उत्पादनात गुजरात राज्य भारतात पहिल्या क्रमांकाचे तर तंबाकूच्या उत्पादनात दुसऱ्या क्रमांकाचे मानले जाते. सुदीर्घ सागर किनाऱ्यामुळे मिठागरे पुष्कळ आहेत. भारतातील मीठ उत्पादनापैकी सुमारे सत्तर टक्के मीठ गुजरातेत निर्माण होते. पश्चिम किनाऱ्यावर कांडला, ओखा, पोरबंदर, वेरावळ, जामनगर इत्यादी बंदरे आहेत. यांतून मोठा व्यापार-उद्योग चालतो. मच्छीमारीचा उद्योगही जोरात आहे.


गुजरात राज्याच्या उत्तर सरहद्दीजवळून कर्कवृत्त जाते, त्यामुळे गुजरात-मध्ये हवामानाची तीव्रता व विषमता आढळते. झाडीच्या उंच प्रदेशात हवामान थंड आहे. किनाऱ्यालगतच्या प्रदेशात तपमान कमी असून हवा आल्हादकारक व आरोग्यदायी आहे. मधल्या मैदानी प्रदेशाची हवा विषम आहे.

या राज्यात सरासरी ७५ ते १२५ सें. मी. पाऊस पडतो. कच्छमध्ये २० ते ४० सें. मी. तर काठेवाडचा उत्तर भाग, पूर्व व दक्षिण किनारा येथे ४० ते ६० सें. मी., मध्य काठेवाड, उत्तर व मध्य गुजरातमध्ये ६० ते १०० सें. मी. आणि दक्षिण गुजरातमध्ये १०० ते ३०० सें. मी. पाऊस पडतो.

गुजरातच्या एकूण क्षेत्रफळाच्या ९ टक्के प्रदेश जंगलाचा आहे. पंचमहाल,

सुरत व डांग या भागात झाडी विरळ आहे तर गीरच्या जंगलात झाडी दाट आहे.

बांबू, साग, चंदन, पिवळ्या लाकडाचे–यलो वुड, रक्तचंदन, शिसू, खार ही झाडे इकडच्या जंगलातून विशेष आढळतात. सागाची झाडे डांगच्या जंगलात विपुल आहेत. किनारपट्टीच्या भागात नारळीची व रानखजुरीची झाडे पुष्कळ आहेत. काठेवाडचा काही भाग, छोटे व मोठे रण या भागात गवताची विपुलता आहे. याशिवाय अन्य तऱ्हेची झाडेही जंगलात आढळतात.



गीर–जंगलातील वनराज

जंगलाचे प्रमाण तसे कमी असले, तरी विविध प्रकारचे रानटी प्राणी पुष्कळ आढळतात. गीरचे जंगल तेथील रुबाबदार सिंहासाठी प्रसिद्ध आहे. गीर शिवाय सिंह अन्यत्र क्वचित आढळतात. चित्ता, तरस, लांडगा, सांबर, चितळ, नीलगाय, काळवीट, हरिण इत्यादी अनेक जातींची श्वापदे गुराजतच्या जंगलात आहेत. तसेच मोर, विविध प्रकारची बदके, रोहित इत्यादी पक्षीही आहेत. स्थलांतर करणारे पक्षीही गुजरातमध्ये येतात. कच्छच्या रणात व नळसरोवराच्या

काठी स्पेनमधील फ्लेमिंगो पक्षी हिवाळ्यात येत असतात. रेतीच्या छोट्या ढिगातून हे पक्षी अंडी घालतात. सारस व राजहंस पक्षी लक्ष वेधून घेतात. ओखा बंदराजवळ कुंजकडी नावाचे पक्षी हिमालय, तिबेट, सायबेरियाकडून येतात.

पाळीव प्राण्यांत इकडील गायी, म्हशी व बैल प्रसिद्ध आहेत. पुष्कळ दूध देणाऱ्या म्हणून काठेवाडी व जाफराबादी म्हशींची फार प्रसिद्धी आहे. सौराष्ट्री-तट्टे, झालवाडी गाढवे, बढियार, कांक्रेज व गीर जातीच्या दुधाळ गायी प्रसिद्ध आहेत. शेळ्या-मेंढ्या, कोंबडी, बदके आदी पशुपालनाचा व्यवसाय मोठा आहे. वाळवंटी भागात उंटाचाही उपयोग करतात. गुरे पाळण्याचा व्यवसाय प्राचीन काळापासूनचा आहे.

गुजरातच्या भूमीत खनिजांची विपुलता आहे. सौराष्ट्र व कच्छमध्ये बॉक्साईटचे व सौराष्ट्र कच्छमध्ये लिग्नाइटचे मोठे साठे आहेत. चुनखडी, अगेट, कॅलसाइट, चिनीमाती आदींचीही समृद्धी आहे. अलिकडेच अंकलेश्वर, कलोल व खंबायत भागात खनिज तेल व नैसर्गिक वायूंचे साठे मोठ्या प्रमाणावर सापडले असून तेल वर काढण्याचे काम सुरूही झालेले आहे.

गुजरात राज्याचे एकूण क्षेत्रफळ १,९५,९८४ वर्ग किलोमीटर असून लोकसंख्या २,६६८७,१८६ आहे. त्यात ८० टक्के हिंदू असून बाकी मुस्लीम, बौद्ध, ख्रिश्चन, जैन आदि धर्मीय आहेत. या राज्यात साक्षरतेचे प्रमाण २४·५६ टक्के आहे.

गुजरात राज्याची नवीन राजधानी 'गांधीनगर' येथे असून पुढील १९ जिल्हे राज्यात आहेत –

| | |
|---|---|
| अहमदाबाद | बडोदा |
| अमरेली | कच्छ |
| बनासकाठा | मेहसाणा |
| भडोच | पंचमहाल |
| भावनगर | राजकोट |
| गांधीनगर | साबरकाठा |
| जामनगर | सुरत |

जुनागड सुरेंद्रनगर
खेडा डांग
आणि बलसाड

एक लाखाहून अधिक लोकसंख्या असलेली पुढील सात मोठी शहरे गुजरात राज्यात आहेत :

अहमदाबादची लोकसंख्या १५,८८,३७८ इतकी आहे. सुरतची ४,७१,८१५ आहे, बडोद्याची ४,६७,४२२ आहे, राजकोटची ३,००,१५२ आहे, भावनगरची २,२६,०७२, जामनगरची २,१४,८५३ आहे, तर नडी-यादची १,०८,२६८ आहे.

पाच हजार ते एक लाख वस्ती असलेली लहान-मोठी गावे गुजरातेत २१७ आहेत, आणि कमी लोकसंख्येची १८,५८४ खेडी आहेत.

गुजरातची प्रमुख भाषा गुजराती असून लिपी देवनागरीचेच एक वेगळे वळण आहे. या लिपीत देवनागरीची शिरोरेखा नसून काही अक्षरांच्या आकृती बदललेल्या आहेत.

गुजरातचे नामकरणही 'गुर्जर' लोकांवरून झालेले आहे. प्राचीन काळी या भूमीला 'गुर्जरमा' असे म्हणत असत. गुज्र + आत यापासून 'गुजरात' शब्द बनला अशी याची व्युत्पत्ती अलबीरूनीने सांगितली आहे. 'आत' हा अरबी भाषेतील बहुवचनी प्रत्यय आहे. त्यानुसार बहुसंख्य गुज्र किंवा गर्जर लोकांची वसती जेथे आहे तो प्रदेश 'गुजरात' होय.

असा हा गुणियल गुर्जरांचा गुणवंती गुजरात !

☐ ☐

# साक्षी इतिहास


**गु**र्जर ही एक प्राचीन आर्य जाती आहे. गुर्जर लोक उत्तरेकडून स्थलांतर करीत करीत खाली दक्षिणेकडे आलेले आहेत. पंजाब, राजस्थानचा प्रदेश उल्लंघून भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर गुर्जर लोकांनी वसती केली.

प्राचीनकाळी अबूचा पहाड आणि श्रीमाल नगरी गुर्जर देशात होती. सातव्या शतकात सरस्वती नदीपासून उत्तरेकडे जोधपूरच्याहीवर पलीकडे गुर्जरदेश पसरलेला होता. मही नदीचे खोरे, रतलामचा काही भाग, पंचमहाल, बडोदा व खेडा हे जिल्हे--या सर्व प्रदेशाला प्राचीन काळी 'मालव' असे नाव होते. खेडाला त्याकाळी 'खेटक' म्हणत असत, तर अहमदाबाद जिल्ह्याचा काही भाग 'आशापल्ली' या नावाने ओळखला जात असे. त्याच्या उत्तर दिशेला आर्नत देश होता. या आर्नत देशाची राजधानी होती आनंदपूर म्हणजे वडनगर येथे. सुमारे नऊशे वर्षांपूर्वी 'गुजरात' हे नामाभिधान प्राप्त झालेल्या या भूमीचा इतिहास मात्र फार प्राचीन आहे. या भागात झालेल्या उत्खननावरून असे आढळते की, पुराणाश्म युगात मही, साबरमती व नर्मदा या नद्यांच्या काठी मानववस्ती होती. सुमारे अडीच लक्ष वर्षांपूर्वीची जुनी हत्यारे तिथे सापडली आहेत. त्यानंतर मध्य अश्मयुगातील लहान, लहान दगडी हत्यारे आणि मानवी हाडांचे सांगाडे सापडले आहेत. नवाश्मयुगातील हत्यारे सौराष्ट्रातील अमरेली जवळ सापडली आहेत.

**लोथल**

गुजरातमध्ये लोथल येथे प्राचीन संस्कृतीचे अवशेष सापडले आहेत. हडप्पा आणि मोहेंजदडो या संस्कृतीच्या समकालीन हे अवशेष आहेत. सुमारे साडेचार हजार

वर्षांपूर्वीच्या इतिहासावर याने प्रकाश पडतो. लोथल खंबातच्या खाडीजवळ होते. कदाचित पुराच्या पाण्याने ते पोटात घेतले असावे. पूर्वी तेथे बंदरही असावे असे उत्खननात आढळलेल्या जहाजांच्या गोदामावरून अनुमान निघते. या बंदरातून मेसोपोटेमिया व सिंधूच्या किनाऱ्यावरील शहरांशी, तसेच दक्षिण गुजरातमधील लहान लहान बंदरांशी व्यापार चालत होता, असे दिसते.



' लोथल ' मुद्रा

लोथलच्या उत्खननावरून त्या काळच्या प्रगत नगररचनेचीही कल्पना येते. नगरीच्या दक्षिणभागी धर्मगुरू राहात असे. मध्यवर्ती भागात बाजार होता. सोन्याचे अलंकार, नाणी, मातीची रंगीत भांडी इत्यादींवरून त्या काळच्या समृद्ध जीवनाची कल्पना येते. उत्तर भागात अग्निपूजा होत असावी असे तिथे सापडलेल्या अवशेषांवरून अनुमान निघते. पश्चिमेकडल्या अवशेषांवरून त्या भागात कारागिरांचे कलाकुसरीचे कारखाने असावेत असे दिसते. घरे व्यवस्थित बांधणीची, स्नानगृहे आदी सोयींनी युक्त होती. रस्ते रुंद होते. या अवशेषांवरून तत्कालीन सिंधू-संस्कृती सिंधपासून खाली काठेवाडपर्यंत पसरलेली दिसते.

कालाच्या उदरात लोथल नगरी व संस्कृती लुप्त झाली, पण तत्कालीन उद्यमशीलता व वणिक वृत्तीचा वारसा मात्र भावी गुजरातला मिळालेला स्पष्ट दिसतो.

विश्वामित्री नदीच्या काठीही काही प्राचीन अवशेष सापडले आहेत. गुजरात प्रदेशात सापडलेल्या रोमन नाण्यांवरून व मातीच्या विशिष्ट भांड्यांवरून प्राचीन काळी भारताचा रोमशी फार मोठा व्यापार चालत असे हे सिद्ध होते.

## कुश

उत्तरेकडून आर्य येण्यापूर्वीपासूनच गुजरातच्या भूमीवर कुश नावाच्या

जमातीने वस्ती केलेली होती. हे कुश समर्थ, साहसी व व्यवहारकुशल होते. पुराणातील उल्लेखांवरून असे दिसते की, जरासंधाच्या आक्रमणामुळे श्रीकृष्णाने मथुरेची राजधानी कुशस्थळी येथे आणली. हीच कुशस्थळी पुढे द्वारका म्हणून प्रसिद्धीस आली. कुशस्थळी ही नगरी कुशांनी वसवली होती. या कुश लोकांची संतती म्हणजेच ऋग्वेदात वर्णिलेले 'पणी' लोक, असे तज्ज्ञांचे मत आहे. हे पणी लोक मोठे व्यवहारकुशल होते. ते समुद्रमार्गे परदेशांशी व्यापार करीत असत. नौकानयनात ते पारंगत होते. गुजरातला लाभलेली वणिकवृत्ती पणींच्याकडून मिळालेली आहे. पणी शब्दावरूनच वणिक शब्द बनलेला आहे.

**शर्याती-आर्य**

कुशांच्या नंतर शर्यातीच्या कुलगोत्राचे जे आर्य लोक होते त्यांनी या प्रदेशात येऊन वस्ती केली. त्यांनी या प्रदेशाला 'आनर्त' असे नाव दिले. महाभारत, भागवत, बृहत्संहिता आदी प्राचीन ग्रंथांत आनर्ताचा उल्लेख आढळतो.

सुकन्या नावाची शर्यातीची मुलगी ही च्यवनाची पत्नी होती. च्यवन हा भृगुकुलोत्पन्न होता. सध्याचे भडोच म्हणजे प्राचीन काळचे भृगुकच्छ होय. येथेच भृगुंचे वास्तव्य होते. भृगुकुळातील उशना किंवा शुक्राचार्य हा असुरांचा पुरोहित होता. त्याच्याच पौरोहित्याखाली बळीराजाने भृगुकच्छ येथे एक यज्ञ आरंभिला होता. बळी हा असीरियामधून असुरांची जी टोळी समुद्रमार्गे येऊन भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर उतरली, तिचा नेता होता. भृगुंच्या म्हणजेच भार्गवांच्या साहाय्याने बळीने येथे एका प्रबळ राज्याची स्थापना केली.

**हैहय**

कालांतराने हैहय वंशातील महापराक्रमी अशा सहस्रार्जुन नावाच्या राजाने गुजरात प्रदेश जिंकून त्यास 'अनुपदेश' असे नाव दिले. हैहय लोक शूर, पराक्रमी पण रानटी, व असंस्कृत प्रवृत्तीचे होते. सहस्रार्जुनाने अनुपदेशाचे साम्राज्य बनविले. त्याने सौराष्ट्र जिंकून पश्चिम सागरावरही प्रभुत्व मिळविले. पंजाबपासून दक्षिणेस लंकेपर्यंत त्याचा दरारा निर्माण झाला होता. अनेक लहान लहान राजांना त्याने आपले मांडलीक बनविले होते. हाती आलेल्या अफाट सत्तेमुळे तो इतका उन्मत्त झाला की, जमदग्नीसारख्या ऋषींचाही त्याने शिरच्छेद केला. आपल्या पित्याचा वध केल्यामुळे जमदग्नीचा पुत्र परशुराम यांनी आपल्या पराक्रमी परशूने सहस्रार्जुनाला ठार केले. हैहयांची आणखी एक राजधानी असलेल्या माहिष्मती

नगरीचा विध्वंस करून टाकला. परशुरामाने सारा अनुपदेश देखील जिंकला. पुढे श्रीकृष्णाने द्वारकेस नवे राज्य स्थापले आणि हा सर्व प्रदेश आर्यावर्ताचा भाग बनला.

**यौधेय**

इसवी सनापूर्वी ५०० च्या सुमारास या प्रदेशात यौधेयांची अनेक गणराज्ये निर्माण झाली. हा मानवगण पाणीनीच्या काळातच उदय पावला असावा. हे लोक प्रथम पूर्व पंजाबात सतलजच्या तीरावर वसलेले होते. तिथून ते मुलतानमार्गे सिंध व सौराष्ट्र या प्रदेशात आले. या गणाला पाणीनीने 'आयुधजीवी संघ' म्हणजे शस्त्रांच्या साहाय्याने उपजीविका करणारा गण, असे म्हटले आहे. हे यौधेय उशीगर राजाचे वंशज होते. हे व्यापारात कुशल, साहसी आणि व्यवहारदक्ष होते. कालांतराने शक महाक्षत्रप रुद्रदामन या राजाने यौधेयांवर आक्रमण करून त्यांचा पराभव केला. इसवी सनपूर्व चौथ्या व तिसऱ्या शतकात या भागांवर मौर्य वंशातील राजांनीही सत्ता गाजवली होती. सम्राट चंद्रगुप्ताने हा प्रदेश जिंकला. पुढे सम्राट अशोकाने या प्रदेशावर राज्य केले. गिरनार पर्वतावर अशोकाने खोदलेला शिलालेख आजही सुरक्षित आहे. त्या काळातच भगवान बुद्धही गुजरातच्या भूमीत आले होते. गिरनारच्या पायथ्याशी असलेल्या बुद्ध-लेण्यांवरून याची साक्ष मिळते. इसवी सनाच्या पहिल्या शतकात शक क्षत्रप नहपान याने डांगपासून सौराष्ट्रपर्यंत सत्ता स्थापिली होती. या वंशातील रुद्रदामन या महापराक्रमी राजाने अपरांत व सौराष्ट्र या प्रदेशांवर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. गिरनार पर्वतावर याचेही शिलालेख आहेत.

यानंतर शंभर-दीडशे वर्षे दक्षिण-गुजरातवर आभिरांनी राज्य केले. हे पहिल्या शतकापासून सौराष्ट्राचे रहिवासी होते.

**मैत्रक**

आभिरांच्यानंतर इसवी सनाच्या पाचव्या शतकात गुजरात हा गुप्त साम्राज्याचा एक भाग बनला. स्कंदगुप्ताचा राजप्रतिनिधी परणदत्त हा गिरीनगर येथून सौराष्ट्राचा कारभार करीत होता. स्कंदगुप्ताच्या मृत्यूनंतर परणदत्ताचा एक सेनाधिकारी भट्टार्क मैत्रक याने सौराष्ट्रातील वल्लभी येथे आपले स्वतंत्र राज्य स्थापन केले. मैत्रक हा स्वतः मोठा पराक्रमी राजा होता. त्याने गुजरातबरोबरच

माळव्यावरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. वल्लभी या आपल्या राजधानीचे वैभव त्याने सर्व बाजूंनी वाढविले. वल्लभी ही समुद्रकाठची तत्कालीन मोठी व्यापार-पेठ होती, व शंभर लक्षाधीश व्यापारी तिथे होते. नालंदासारखे एक विद्यापीठही त्याने तेथे स्थापन केले होते. तो स्वतःला गुप्तांचा मांडलीक म्हणवून घेत असे.

मैत्रक वंशातील सहाव्या राजा गुहसेन गुप्त साम्राज्यापासून स्वतंत्र झाला, आणि स्वतंत्रपणाने राज्य करू लागला. त्याचे राज्य ७६६ पर्यंत चालू होते.

मैत्रकांच्या ठावठिकाणाविषयी विद्वानांत एकमत नाही. कोणी त्यांना परदेशी, कोणी सूर्योपासक, कोणी क्षत्रिय, तर कोणी व्रात्य वैश्य मानतात. परंतु असे जरी असले तरी ते शैव होते आणि तरीही त्यांनी बौद्धांना उदारपणाने वागविले. त्यांच्या राजवटीतच एका वल्लभी नगरीतच शंभर बौद्ध-मठ स्थापन झाले. ते महान पराक्रमी होते, हे सर्वमान्य आहे. ते आर्य असोत–नसोत, त्यांनी या भूमीतले आर्य-संस्कार आत्मसात केले व आर्यत्व पत्करले हे खरेच.

**प्रतिहार**

ज्या गुर्जर लोकांवरून गुजरात हे नाव ह्या प्रदेशास मिळाले, त्यांच्यातील प्रतिहार घराण्याचे राज्य हरिचंद्र नावाच्या पुरुषाने ५५० मध्ये राजपुतान्यात स्थापिले. त्यावेळी राजपुतान्यास गुर्जर म्हणत असत. त्याची उत्तर सरहद्द जोधपूरपर्यंत होती व दक्षिण सीमा सरस्वती नदी होती. पुढे हे गुर्जर प्रतीहार पूर्वेस माळव्यात व दक्षिणेस लाटपर्यंत पसरले. लाट देशावर ५८० पासून ७३५ पर्यंत प्रतिहारांनी राज्य केले. त्यांची राजधानी नांदीपूर येथे होती.

**चालुक्य**

सातव्या शतकात चालुक्य राजा पुलिकेशी याने लाट, मालव व गुर्जर हे देश जिंकले होते. ऐहोळ येथल्या शिलालेखावरून ही माहिती मिळते. चालुक्य वंशातील–जयसिंह वर्मा नावाच्या राजाने ६९३ पर्यंत नवसारी येथे राज्य केले. आठव्या शतकात काही काळ खेटकमंडळापर्यंतचा प्रदेश, म्हणजेच आजचा खेडा जिल्हा, चालुक्यांच्या साम्राज्यात होता. काही दिवसांनी या प्रदेशावर आरबांनी आक्रमण केले, आणि कच्छ, सौराष्ट्र व गुजरात हे प्रदेश जिंकले. अरबांच्या या आक्रमणास उज्जैनीच्या प्रतिहारांनी यशस्वीपणे तोंड दिले आणि लाट देशावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

इसवी सन ७५० च्या सुमारास राष्ट्रकूट राजा दंतिदुर्ग याने प्रतिहारांचा पराभव करून लाट, खेटक व माळ्व हे प्रदेश जिंकले.

७८० च्या सुमारास उज्जैनीच्या वत्स राजाने राष्ट्रकुटाकडून हा प्रदेश जिंकून घेतला व गुर्जर देशावर आपली सत्ता प्रस्थापित केली.

नवव्या शतकात सर्व गुर्जर देश मिहिरभोज याच्या साम्राज्याचा एक भाग बनला.

दहाव्या शतकात राष्ट्रकुटांनी गुर्जर देशावर दोन स्वाऱ्या केल्या, त्यामुळे गुर्जर साम्राज्याचे दोन तुकडे झाले. राष्ट्रकूट राजा तिसरा कृष्ण याने गुर्जर देश जिंकला. त्याचा प्रतिनिधी म्हणून दुसरा शियाक नावाच्या परमार राजाने सरस्वती नदीच्या दक्षिणेकडील सर्व गुजरात प्रदेश जिंकला. हे परमार घराणे गुर्जर देशातले असून नवव्या शतकात प्रतिहारांचे मांडलीक होते. धार ही शियाक राजाची राजधानी होती. शियाक राजाचा पुत्र वाक्पतिमुंज याने उत्तर गुजरात-मध्ये साम्राज्य स्थापन केले. त्याने लाट देशही जिंकला होता. तो केवळ पराक्रमीच नव्हता, तर कवी आणि कवींचा आश्रयदाताही होता. ९९६ मध्ये कर्नाटकाधिपती तैलप याने यास पकडून ठार मारले.

**चावडा**

मैत्रकांचा पराजय झाल्यावर त्यांच्या अंकित असलेले सुभेदारही स्वतंत्र झाले. त्यांपैकी चावडा हे एक होत. या वंशाचा आद्य संस्थापक होता वनराज चावडा. त्यांनी पाटणच्या आसपास उत्तर गुजरातमध्ये अनेक ठिकाणी राज्य केले. वल्लभीचे राज्य अस्तास गेल्यावर वनराज चावडा याने अणहिल्पूर पाटण ही नगरी वसवली. आजही पाटण नावाने ती प्रसिद्ध आहे. चावडा वंशाने तेथे बराच काळ आपली राजधानी ठेवली होती. तत्कालीन राजधानीचे ऐतिहासिक अवशेष तेथे आढळतात. वनराज चावडाने ही नगरी वसवली, त्याबद्दल एक ऐतिहासिक दंतकथा प्रचलित आहे :

सुमारे बाराशे वर्षांपूर्वी, आज ज्याला राधनपूर म्हणतात, तो प्रदेश पंचासर या नावाने ओळखला जात असे. या प्रदेशावर जयशिखरी नावाच्या राजाचे राज्य होते. या जयशिखरी राजाला आपला मांडलिक बनविण्यासाठी दक्षिणेतील भूवड नामक राजाने त्याच्यावर आक्रमण केले. त्या वेळी जयशिखरी राजाचा साडू सुरपाल

हा त्यांचा सेनापती होता. जयशिखरी आणि सुरपाल यांनी या आक्रमणाचा मोठ्या शौर्याने प्रतिकार केला. परंतु भूवड राजाच्या अफाट सेनेपुढे त्यांना टिकाव धरणे कठीण झाले. पराभव अटळ आहे असे दिसताच, जयशिखरी राजाने आपली गर्भवती राणी रूपसुंदरी हिला सेनापती सुरपाल याच्याबरोबर जंगलाचा आश्रय घेण्यास सांगितले. राजाज्ञेनुसार सुरपाल रूपसुंदरीला घेऊन छुप्या मार्गाने जंगलात निघून गेला.

जयशिखरी राजाने मोठ्या शौर्याने बराच काळ शत्रूशी झुंज दिली, पण अखेरीस तो या लढाईत मारला गेला. भूवड राजाने पंचासरवर विजय मिळवला. तेथील कारभार पाहण्यासाठी आपला एक सुभेदार नेमून तो कल्याणीकडे निघून गेला.

इकडे रूपसुंदरी प्रसूत झाली आणि तिला मुलगा झाला. त्या मुलाचा जन्म वनात झाला म्हणून त्याचे नाव ‘ वनराज ’ असे ठेवण्यात आले.

वनराज मोठा झाला, तेव्हा त्याने आपल्या पित्याच्या पराभवाचा व मृत्यूचा सूड घेण्याची प्रतिज्ञा केली. त्याने जंगलात गुरेढोरे पाळून गुजराण करणाऱ्या भरवाड जातीच्या लोकांना एकत्र केले. त्यांना युद्धाचे शिक्षण दिले आणि भूवडच्या सुभेदारावर हल्ला करून त्याला पराजीत केले. पित्याचे गेलेले राज्य परत मिळवले. वनराजाचा एक बहादूर भरवाड शिपाई होता. त्याचे नाव अणहिल असे होते. त्याच्या स्मरणार्थ आपल्या राजधानीचे नाव अणहिलपूर पाटण असे ठेवले.

### सोळंकी

चावडा वंशातील आठ राजांनी बराच काळ गुजरातवर राज्य केले. चावडा वंशातील अखेरचा राजा सामंतसिंह नावाचा झाला. या राजाला संतान नव्हते म्हणून त्याने आपला भाचा मूळराज सोळंकी याला दत्तक घेतले. इसवी सन ९४२ मध्ये राज्यलोभाने मूळराज सोळंकी याने आपल्या मामाचाही वध केला आणि तो पाटणच्या गादीवर बसला. या पाप कृत्याचे प्रायश्चित्त म्हणून याने सिद्धपूर येथे रुद्रमहालय बांधण्यास सुरुवात केली. परंतु त्याच्या हयातीत ती वास्तू पूर्ण झाली नाही. पुढे त्याच्या वंशजांनी ती पूर्ण केली. परंतु मुसलमानी आक्रमकांनी तिचा विध्वंस केला. सिद्धपूरमध्ये आजही रुद्रमहालयाचे छिन्नविछिन्न अवशेष इतस्ततः विखुरलेले दिसतात.

मूळराज सोळंकी हा मोठा कर्तबगार राजा होता. त्याने महेसाणा, साबरकांठा आणि बनासकांठा हा दक्षिणेकडील प्रदेश जिंकून घेतला आणि सरस्वतीच्या तीरावरील अणहिलवाड येथे आपली राजधानी स्थापली. मूळराजाचे राज्य लहान होते, परंतु त्याने आपली राज्यव्यवस्था आदर्श ठेवली होती. मूळराजा विद्या आणि कलांचा भोक्ता होता.तसेच कर्णासारखे औदार्यही त्याच्या ठायी होते. त्याच्याविषयी एका दानपत्रात, ‘ सतत दानधर्म करीत राहिल्यामुळे मूळराजाचे हात सदैव ओले असत ’ असा गौरवपर उल्लेख आढळतो. मूळराजाच्या राजवटीत अणहिलवाड हे पश्चिम भारतातील एक महत्त्वाचे संस्कृती केंद्र म्हणून नावारूपाला आले होते. आपल्या राज्यातील विद्याध्ययनाची परंपरा अबाधितपणे अखंड चालावी म्हणून त्याने माळवा व कनौज येथून कितीतरी पंडित आणि विद्वान ब्राह्मण गुजरातमध्ये आणले आणि त्यांच्या योगक्षेमाची व्यवस्था करून दिली. याच विद्वान ब्राह्मणांचे वंशज औदिच्य ब्राह्मण या नावाने हल्ली गुजरातमध्ये प्रसिद्ध आहेत. कितीतरी ब्राह्मण व जैन ग्रंथकारांनी याच्या आश्रयाखाली राहून विविध ग्रंथावर टीका, भाष्ये लिहिली आणि मौलिक साहित्य रचना केली. या काळात अपभ्रंश भाषेतही पुष्कळ ग्रंथरचना झाली. याच मूळराजाने सोमनाथाची प्रतिष्ठापना केली. मूळराजाचे राज्य ‘ सारस्वत मंडळ ’ या नावाने ओळखले जात होते. या वंशातील राजा भीम याच्या कारकीर्दीत गझनीचा सुलतान महमूद याने सोमनाथावर स्वारी केली आणि सोमनाथचे मंदिर उध्वस्त करून टाकले. परंतु भीम राजाने पुन्हा ते बांधून काढले. सोळंकी राजाच्या कारकीर्दीतच पाषाणावरील कलाकौशल्य व नक्षीकाम यांना चालना मिळाली. गुजरातमध्ये पाषाणावरील नक्षीकाम ठिकठिकाणी बऱ्याच प्रमाणात पाहावयास मिळते. आपली राणी उदयामती हिच्या आग्रहावरून भीम राजाने पाटण येथे एक मोठी बाव तयार केली होती. आजही ती ‘ राणीनी बाव ’ या नावाने पाटण येथे पाहावयास मिळते. या बावेवरची नक्षी आणि तिची सुंदर घडण यावरून गुजरातीमध्ये एक म्हणच प्रचलित झालेली आहे—

**राणी नी वाव ने दामोदर कुवो**
**जेणे ना जोयो ते जीवतो मूवो ॥**

—राणीची बाव आणि दामोदर विहीर ज्याने पाहिली नाही तो जिवंत असून मेल्यासारखाच होय.

भीम राजाच्या पश्चात त्याचा मुलगा कर्णदेव हा १०६४ मध्ये गादीवर आला. कर्णदेव राजाने भिल्लांचा पराभव करून कर्णावती नावाची नगरी वसवली. आज या नगरीचे नामोनिशाण नाही. परंतु अहमदाबादजवळच ती कोठेतरी असावी असा तर्क आहे. कर्णदेव राजाने दक्षिणेतील मीनळदेवी हिच्याशी विवाह केला होता. तिला सिद्धराज नावाचा मुलगा झाला. कर्णदेव राजाचा मृत्यू झाला त्यावेळी सिद्धराज लहान होता, म्हणून मीनळदेवीने राज्य सांभाळले.

सिद्धराज हा सोळंकी वंशातला एक श्रेष्ठ राजा मानला जातो. याने गुजरातची सीमा आनर्त प्रदेश, भडोजच्या बाजूचा लाट प्रदेश, सौराष्ट्र-कच्छ-उज्जैन आणि अजमेर येथपर्यंत नेऊन बराच राज्यविस्तार केला होता. त्यामुळे त्याला ' जयसिंह सिद्धराज ' असे नाव मिळाले.

जयसिंहाने पाटण येथे सहस्रलिंग तलाव खोदला होता. तलावाच्या चोहों बाजूंनी एक हजार शिवमंदिरे बांधली होती. या विषयी एक लोककथा प्रचलित आहे :

जसमा नावाची एक रूपवती ओडण, म्हणजे ओड जातीची स्त्री, आपल्या पतीबरोबर तलाव खोदण्यासाठी येत असे. जसमा ओडणच्या रूपावर राजा सिद्धराज मोहित झाला. जसमाला आपली राणी बनवण्याचा त्याने पुष्कळ प्रयत्न केला. परंतु जसमा तयार झाली नाही. सिद्धराजने जसमाच्या पतीचा आणि दुसऱ्या ओडणांचा वध केला. जसमा आपल्या पतीबरोबर सती गेली. तिने राजाला शाप दिला की, ' तू निःसंतान राहशील आणि तू खोदलेला तलाव कधीही पाण्याने भरणार नाही. ' ही लोककथा आजही गुजरातमध्ये फार प्रसिद्ध आहे. त्या लोककथेवर आधारीत नाटके रचिली गेली आहेत. भवाईसारखी लोकनाट्येही लिहिली आहेत. जसमाच्या शापाने की, अन्य कशाने कोणास ठाऊक, पण सिद्धराजाला संतान झाले नाही. आणि सहस्रलिंग तलावसुद्धा पाण्याने कधी भरला नाही.

जयसिंह सिद्धराजाविषयी गुजरातमध्ये आणखीही अनेक दंतकथा प्रचलित आहेत.

असे सांगतात की, जयसिंहाला एक भूत वश होते. त्याचे नाव होते बाबरा. वस्तुतःबाबरा हा एक माणूसच होता सिद्धपूरच्या ईशान्येस ज्या बर्बर टोळ्यांची वस्ती होती, तिचा बाबरा हा राजा होता. आपल्या भोवतालच्या प्रदेशावर अचानक धाड घालून लूटमार करणे हा बाबराचा उद्योग होता.त्याची धाड केव्हा पडेल याचा काही

नेम नव्हता. वळवाच्या पावसासारखा तो अचानक येऊन झोडपून जाई. त्यामुळेच त्याला ‘ बाबर्योभूत ’ म्हणत असत. तर एकदा त्याने अशीच अचानक धाड घालून रुद्रमहालय हे मंदिर लुटले आणि उध्वस्त करून टाकले. जयसिंह राजाला हे सहन झाले नाही. तो संतापला आणि त्याने बाबऱ्यावर हल्ला केला. दोघांचे द्वंद्वयुद्ध जुंपले. त्यात बाबऱ्याच्या छाताडावर बसून जयसिंहाने त्याला ठोश्यांनी बुकलून काढले. या माराने बाबऱ्या रक्त ओकू लागला. बाबऱ्याचा जीव जाण्याची वेळ आली पण तेवढ्यात पिंगालिका नावाची बाबऱ्याची बायको तेथे आली. तिने हात जोडून आणि पदर पसरून जयसिंहाकडे बाबऱ्याला जीवदान मागितले. पिंगालिकेच्या प्रार्थनेने जयसिंहाचे मन विरघळले. त्याने बाबऱ्याला जीवदान दिले. हा उपकार स्मरून बाबरा हा पुढे जयसिंहाचा विश्वासू अंगरक्षक बनला.

मूळराजाप्रमाणे जयसिंह सिद्धराजानेही आपल्या कारकीर्दीत कलाकारांना व पंडितांना उदार आश्रय दिला. त्यांच्यासाठी त्याने पाटणच्या सहस्रलिंग तलावाच्या काठी सतशाला व मठ बांधून दिले. अध्ययन– अध्यापनाची व्यवस्था केली. काव्यशास्त्रविनोदाच्या चर्चा होऊ लागल्या. तिथे होणाऱ्या तात्त्विक वादविवादांच्या वेळी राजा स्वतः उपस्थित राहात असे. माळवा जिंकून परत येताना त्याने माळव्याचा राजा यशोवर्मा याला जसे कैद करून आणले तसेच त्याचे प्रचंड ग्रंथालयही उचलून आणले. ह्या घटनेवरून त्याच्या जइष्णू वृत्तीबरोबरच त्याची ज्ञानलालसा दिसून येते. याने आपल्या कारकीर्दीत गुजरातची किर्ती दिगंत केली.

जयसिंह सिद्धराजाच्या पश्चात कुमारपाल नावाचा त्याचा एक पुतण्या पाटणच्या सिंहासनावर बसला. कुमारपालच्यावेळी गुजराती भाषेला स्वतंत्र रूप येऊ लागले होते. प्रख्यात जैन पंडित हेमचंद्र हा कुमारपाल राजाचा मार्गदर्शक गुरू होता. कुमारपालाने बऱ्याच लढाया मारल्या. जयसिंह सूरी नावाच्या एका जैन कवीने ‘ कुमारपाल चरीत ’ नावाचे एक काव्य त्याच्यावर रचले आहे. कुमारपालाच्या वेळी गुजरातची दक्षिण सीमा दमणगंगा ही नदी होती. कुमारपालानंतर भीमदेव राजा गादीवर आला. या भीमदेवाच्या कारकीर्दीतच मुसलमानी आक्रमण गुजरातवर झाले.

**वाघेल**

१२४१ साली भीमदेव हा सोळंकी वंशातील अखेरचा राजा मरण पावल्यावर गुजरात मध्ये वाघेल घराण्याची सत्ता सुरू झाली. कुमारपाल राजाने आपला

मावस भाऊ अरुणराज याला वाघेर वगैरे गावांची जहागिर दिली होती. अरुण राजाचा पुत्र लवणप्रसाद हा भीमदेवाचा प्रधान होता. तोच पुढे अणहिलवाडचा राजा झाला. त्याचा पुत्र वीरधवल याच्या राजवटीत वस्तुपाल व तेजपाल नावाच्या दोन जैन प्रधानांनी गिरनार व अबू या पर्वतांवर अनेक जैन मंदिरे बांधली. वीरधवल आणि वीसलदेव यांच्या कारकीर्दीत गुजरात बराच समृद्ध बनला. वीसलदेवाने डभोई येथे सुंदर इमारती बांधल्या.

वाघेला वंशातील अंतिम राजपूत राजा कर्ण वाघेला झाला. इतिहासात हा किरणघेला या नावाने प्रसिद्ध झाला. या राजाने तेराव्या शतकाच्या अखेरपर्यंत गुजरातवर राज्य केले. किरणघेलाच्या कारकीर्दीतच अल्लाउद्दीन खिलजीने प्रचंड सैन्य घेऊन आक्रमण केले आणि गुजरातचे राज्य जिंकले. गुजरातेत तेव्हापासून मुसलमानी राजवट सुरू झाली.

**मुसलमानी अंमल**

तेराव्या शतकाच्या अखेरीस, इ. स. १२९८ मध्ये, अल्लाउद्दीन खिलजीने माळवा जिंकून घेतला आणि अणहिलवाड पाटणवर स्वारी केली. जाळपोळीचे आणि लुटालुटीचे तंत्र अवलंबीत अल्लाउद्दीनची धर्मांध सेना धुमाकूळ घालीत आली. अल्लाउद्दीनचा सेनापती अल्लाखान याने पाटणवर आपला विजयध्वज रोवला. सुलतानशाही सुरू झाली. राजकीय क्षेत्रातच नव्हे, तर धार्मिक-सांस्कृतिक क्षेत्रातही उच्छेद मांडला. जबरदस्तीने धर्मान्तरे होऊ लागली. मंदिरे पाडण्यात येऊन तिथे मशिदी उभारण्यात आल्या. श्रद्धास्थाने भ्रष्ट करण्यात आली.

उलुफखान नावाच्या अल्लाउद्दीनाच्या दुसऱ्या सेनापतीने पश्चिमेकडे हल्ला चढवून हिंदूंचे पवित्र सोमनाथ मंदिर पुनश्च छिन्नविछिन्न करून टाकले. जुने किल्ले जिंकून जमीनदोस्त करून टाकले.

गुजरातमध्ये अल्लाउद्दीन खिलजी व त्याच्यानंतर मुहम्मद तुगलक यांची राजवट १४०७ पर्यंत चालली. त्यानंतर गुजरातमधील सुलतान केंद्रीय सत्तेपासून स्वतंत्र बनले आणि त्यांनी आपापली स्वतंत्र राज्ये स्थापन केली.

सुमारे साडेपाचशे वर्षांपूर्वी अहमदशाह सुलतान मुलूख पादाक्रान्त करीत साबरमतीच्या काठी आला आणि कर्णावती नगरीत त्याने राज्यस्थापना केली. कर्णावतीचा त्या काळापासून पुष्कळच विकास झाला. स्थापत्यकलेचे अनेक उत्कृष्ट नमुने उभे राहिले आणि कर्णावती नगरी बघता बघता अहमदाबाद शहरात

रूपांतरित झाली. तेथूनच अहमदाबाद शहर गुजरात प्रदेशाची राजधानी म्हणून प्रसिद्धीस आले.

सुलतान अहमदशाहाने १४११ ते १४४२ पर्यंत सत्ता गाजवली. मध्यंतरीच्या काळात लहान, मोठे असे पंधरा सुलतान झाले. सुमारे १६६ वर्षे गुजरातवर सुलतानी अंमल होता. १४५१ मध्ये सुलतान कुतुबुद्दीन याने अहमदाबाद शहराच्या बाहेर सुमारे ७६ एकर भूमीवर ' हौजे कुब्त ' नावाचा तलाव निर्माण केला. हल्ली तो ' कांकरिया झील ' या नावाने प्रसिद्ध आहे.

महमूद बेगडा नावाच्या सुलतानाने १४५८ ते १५११ पर्यंत राज्य केले. महमूद बेगडा याने वात्रक नदीच्या काठी ' महमूदाबाद ' नावाचे शहर वसविले. तेच आज महेमदा या नावाने प्रसिद्ध आहे. महमूद बेगडाने आपले वास्तव्य महमूदाबाद येथेच ठेवले होते.उन्हाळ्याच्या त्रासापासून सुटका व्हावी यासाठी त्याने तेथे शीतगृहे आणि चक्राकार विहिरी बनविल्या. गुजरातमध्ये आजही चक्राकार विहिरी प्रसिद्ध आहेत. त्यांना गुजरातमध्ये ' भंमरिया कूवो ' असे म्हणतात. या विहिरीवर लोकगीतेही रचलेली आहेत. महमूद बेगडा हा कर्तबगार, शूर शासक होता. त्याने गिरनार आणि चांपानेर येथील राजपूत राजांचा पराभव करून ते दोन्ही प्रदेश आपल्या ताब्यात घेतले. पुढे त्याने आपली राजधानी चांपानेर येथेच हालवली. महमूद बेगडा याला मोठमोठ्या इमारती बांधण्याची आणि सुंदर बगीचे तयार करण्याचा शौक होता. सरखेज, अहमदाबाद, चांपानेर, इत्यादी ठिकाणी त्याने बांधलेल्या इमारती आजही दृष्टीस पडतात. सरखेज येथे बांधलेला रोजा आणि अहमदाबाद येथील दहियाखानका गुम्बज ह्या इमारती स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या असून प्रेक्षणीय आहेत.

महमूद बेगडाने ५४ वर्षांहून अधिक काळ राज्य केले. त्याच्या कारकीर्दीत गुजरातमधे शांती आणि समृद्धी नांदली. अन्य सुलतानांनी धर्माच्या नावाखाली जशी लुटालूट करून व जाळपोळ करून अशांती माजवली तशी स्थिती याच्या कारकीर्दीत राहिली नाही. मुस्लिम स्थापत्यकलेचा विकास देखील याच्याच कारकीर्दीत झालेला आढळतो. म्हणूनच महमूद बेगडाच्या राजवटीला गुजरातमधील सुवर्ण-युग म्हटले जाते.

इ. स. १५०० नंतर पोर्तुगीजांनी गुजरातच्या किनाऱ्यावरील दीव, दमण वगैरे ठिकाणे काबीज केली होती. ती भारताच्या स्वातंत्र्यानंतर गोवा-मुक्तीबरोबरच मुक्त झाली.

**मोगल**

१५७३ मध्ये अकबर बादशहाने गुजरातवर आपली सत्ता प्रस्थापित केली. गुजरातमधील स्वतंत्र सुलतानांच्या राजवटीचा अंत झाला. तेथून मोगली सत्ता सुरू झाली. या काळातच गुजराती भाषा, साहित्य शिल्प, स्थापत्य, इत्यादी क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण प्रगती होत होती. गुजरातचा भक्त कवी नरसी आणि भालण याच काळात होऊन गेले.

अकबर, जहांगीर, शहाजहाँ या मोगल शासकांच्या काळात गुजरात मध्ये शांती नांदली. खंबात, सुरत आणि घोघा ह्या बंदरांचा विकास झाला. लहान मोठी सुमारे ८४ बंदरे त्या काळी गुजरातच्या किनाऱ्यावर होती. अहमदाबाद शहराचाही विकास या काळी होत होता. हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान आणि औरंगजेब हे मोगल बादशहा गुजरातमध्ये येऊन राहिले होते. औरंगजेबाचा जन्म गुजरातमधील दोहोद येथेच झाला होता.

मोगलांच्या वेळी जमीन महसूल लागू करण्यासाठी राजा तोडरमल हाही गुजरातमध्ये आला होता.

जहांगिर बादशहा १६१८ मध्ये ज्यावेळी अहमदाबाद येथे येऊन राहिला होता, त्याच वेळी इंग्लंडचा राजा दुसरा जेम्स याने सर टॉमस रो याला आपला प्रतिनिधी म्हणून जहांगीरच्या मुलाखतीसाठी पाठविले होते. या मुलाखतीच्या वेळीच जहांगिराने इंग्रजांना येथे व्यापार करण्याची परवानगी दिली. त्यामुळेच इंग्रजांनी अहमदाबाद, सुरत आणि खंबात येथे आपल्या व्यापारी वखारी उघडल्या, आणि तेव्हापासूनच गुजरातवर इंग्रजांचा प्रभाव पडला. जहांगिराच्या बरोबर नूरजहानही अहमदाबादला आली होती आणि कांकरिया तलावात त्यांनी नौकाविहार केला होता, असा उल्लेख आढळतो.

**मराठे**

मोगलांचे राज्य गुजरातवर सुमारे १८५ वर्षे होते. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर गुजरातवर मराठ्यांनी आक्रमण केले. सरदार गायकवाड यांनी गुजरात आणि सौराष्ट्रावर आपली सत्ता प्रस्थापित केली. गुजरातमधील लहान लहान राजांनीही आपली स्वतंत्र राज्ये स्थापन केली.

१७५३ मध्ये अहमदाबादवर मराठ्यांची सत्ता स्थापन झाली होती. १७५७ मध्ये प्लासीच्या लढाईत इंग्रजांचा विजय झाला आणि ब्रिटिश साम्राज्याचा पाया घातला गेला.


**ब्रिटिश**

ब्रिटिशांची राजवट सुरू झाल्यावर १८५७ साली क्रांतीचा उठाव झाला. परंतु इंग्रजांनी तो उठाव मोडून काढला. ईस्ट इंडिया कंपनीच्या हातातली सत्ता ब्रिटीश पार्लमेंटने आपल्या हातात घेतली. व्हिक्टोरिया राणीचा अंमल भारतावर सुरू झाला; भारतभर असलेली लहान मोठी देशी राज्ये इंग्रजांची मांडलीक बनली. गुजरातेतदेखिल गायकवाड आणि इतर यांची लहान लहान संस्थानी राजवट सुरू झाली.

१८८५ साली कॉंग्रेसची स्थापना झाल्यावर गुजरातमध्येही स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले. १८८४ सालीच अहमदाबादमध्ये 'गुजरात व्हर्नाक्यूलर सोसायटी' स्थापन झाली होती. या सोसायटीच्या मार्फत लोक जागृतीचे व सामाजिक सुधारणांचे काम करण्यासाठी मुंबईहून ' मुंबई समाचार ' आणि ' अहमदाबाद वर्तमान ' ही वृत्तपत्रे गुजराती भाषेत प्रसिद्ध होऊ लागली.

**स्वातंत्र्य-लढा**


स्वातंत्र्याच्या आंदोलनात गुजरात सदैव आघाडीवर राहिलेला आहे.आधुनिक भारताचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात गांधीजींनी आपले एक पर्वच निर्माण केले होते. सत्य, अहिंसा आणि सत्याग्रह हे त्यांचे तत्वज्ञान गुजरातने पूर्णपणे आत्मसात केले.गांधीजींच्या पाठीशी सारा गुजरात उभा राहिला. गांधीजींनी आपला पहिला ' स्वराज्य आश्रम ' अहमदाबाद शहराजवळ साबरमती येथेच स्थापन केला होता. स्वातंत्र्याच्या आंदोलनातील मिठाच्या सत्याग्रहाच्या वेळची सुप्रसिद्ध



महात्मा गांधी

दांडी-यात्रा १२ मार्च १९३० च्या सकाळी साबरमतीच्याच आश्रमातून निघाली होती. त्यावेळी गांधीजींच्या बरोबर देशातील निवडक सत्याग्रही होते. ही पदयात्रा २४ दिवस गुजरातच्या गावागावातून स्वातंत्र्याचा संदेश देत दांडीकडे निघाली. या वेळी भारताचेच नव्हे तर साऱ्या जगाचे लक्ष गुजरातकडे लागलेले होते.

२४ दिवसानंतर ही अभूतपूर्व यात्रा ५ एप्रिल १९३० रोजी गुजरातमधील समुद्रकाठच्या दांडी या गावी पोहोचली. ६ एप्रिल १९३० हा जालियनवाला बागेतील हत्याकांडाचा स्मृतिदिन होता. गांधीजी त्या दिवशी दांडीच्या समुद्र तीरावर उभे राहिले आणि मिठाचा खडा हातात घेऊन म्हणाले, ' ही पहा मी साम्राज्यशाही नष्ट करतो ! ' त्यांच्या पाठोपाठ इतर सत्याग्रहींनीसुद्धा मीठ गोळा



सरदार वल्लभभाई पटेल

करून मिठाचा कायदा मोडला. ' नमक का कायदा तोड दो ! ' गांधीजींनी साऱ्या देशाला आदेश दिला. सत्याग्रह-संग्रामाची तुतारी गुजरातच्या भूमिवरून निदादली. देशभर मिठाचा सत्याग्रह सुरू झाला. भारतात एक नवीन चैतन्य सळसळले. स्वातंत्र्याच्या चळवळीत सरदार वल्लभभाई पटेल व विठ्ठलभाई पटेल या दोघा पटेल बंधूंनी फार मोठी कामगिरी बजावली. गुजरातमधील बार्डोली येथे गांधीजिंच्या आशीर्वादानेच तेथील शेतकऱ्यांची कर बंदीची चळवळ सुरू झाली होती. या वेळी बार्डोलीच्या लढ्याचे नेतृत्व वल्लभभाई पटेल यांच्याकडेच होते. वल्लभभाईंनी त्या वेळी खेडोपाडी हिंडून शेतकऱ्यांत जागृतीचे काम केले. सारा बार्डोली तालुका त्यांच्या पाठीशी उभा राहिला. तेव्हापासूनच वल्लभभाईंना लोक ' सरदार ' म्हणू लागले.

सरदार वल्लभभाई पटेल हे स्वातंत्र्याच्या चळवळीतील आघाडीचे गांधीजींचे सहकारी होते. कॉंग्रेसची व देशाची त्यांनी अमोल सेवा बजावली. गुजरातच्याच नव्हे तर भारताच्या आधुनिक शिल्पकारांपैकी सरदार वल्लभभाई पटेल हे एक प्रमुख शिल्पकार होते. १९४७ साली भारत स्वतंत्र झाल्यावर देशी संस्थानांचा प्रश्न वल्लभभाईंच्या मुत्सदीपणामुळेच यशस्वीरित्या सुटला. सर्व देशी संस्थाने भारतात विलीन झाली. त्याच वेळी गुजरातमधील सुमारे २७० संस्थानेदेखिल भारतीय संघराज्यात त्यांनी सामिल करून घेतली.

स्वातंत्र्योत्तर भारतातील गुजरात राज्याची वाटचालही प्रगतीच्या दिशेने चालू आहे.

□ □

# लोक आणि लोकाचार

गुजरातचे लोक कसे? तर सौम्य-शांत—सौजन्यशील प्रकृतीचे, साहसी, वणिक-वृत्तीचे व कलाप्रिय—उदार मनाचे.

लोकांच्या जीवनमानावर राहणीमानावर, आजूबाजूच्या परिस्थितीचा व निसर्गाचा परिणाम होत असतो. मारवाडात पाण्याचे दुर्भिक्ष त्यामुळे मारवाडी माणूस कंजुष आणि कमालीचा काटकसरी बनला. तसाच प्रदीर्घ लांब किनारा लाभल्या-मुळे गुजराती माणूस साहसी बनला. मात्र त्याचे हे साहस रणांगणावर प्रकट होण्याऐवजी व्यापार-धंद्यात व्यक्त झाले. सागरकिनाऱ्यामुळे पुष्कळशी बंदरे गुजरातच्या वाट्याला आणि या बंदरातून दूर देशांशी, व्यापार उदीम करता आला. आजही गुजराती माणूस म्हटल्यावर आपल्यापुढे पांढरे शुभ्र धोतर नेसलेला, त्यावर गुडघ्यापर्यंत लांब व बऱ्याच गुंड्यांचा पांढरा शुभ्र कोट घातलेला आणि डोक्यावर टोपी असलेला थुलथुलीत अंगाचा, मध्यम बांध्याचा आणि गौर वर्णाचा शेठजी डोळ्यापुढे उभा राहतो. व्यापाराच्या, देवधेवीच्या, सट्ट्याच्या अशा काही ना काही उलाढाली करताना तो दिसतो. गुजरात्यांनी केवळ गुजरात मध्येच नव्हे तर भारतभर मोठमोठ्या उद्योगधंद्यावर आणि व्यापारावर प्रभुत्व मिळविलेले आहे. मुंबईतील बहुतेक मोठे उद्योग हे गुजराती माणसाच्या हातात आहेत. इतकेच कशाला महाराष्ट्राच्या लहान मोठ्या गावातही गुजराती शेठजीचे दुकान असतेच. नाना तऱ्हेचे धंदे गुजराती माणूस करतो, आणि त्यात हुषारीने पैसे कमावतो. मराठी आणि गुजराती माणसाच्या उद्योग-धंद्यातील चातुर्याबद्दल गमतीने असे म्हटले जाते की, 'मराठी माणसाच्या डोक्यात गिरणी असते, पण गुजराती माणसाच्या ती हातात असते.' या वरूनही गुजराती माणसाच्या साहसी वणिक वृत्तीची कल्पना येते. परंतु गुजराती माणूस धंदेवाईक वा व्यापारी असला तरी तो मनाने उदार आहे, रसिक आहे.

व्यापाराव्यतिरिक्त गुजरातच्या ग्रामीण भागातून शेती आणि पशुपालन हाच उद्योग चालतो. समुद्र किनारपट्टीच्या भागात मच्छिमारीचाही धंदा चालतो.

गुजरातमध्ये बहुसंख्य लोक हिन्दूधर्मीय आहेत. त्यांच्यात चार्तुवर्णीय व्यवस्था असून जातीजमातीचे प्रस्थ इतर प्रांताप्रमाणेच आहे. गुजरातमध्ये असलेल्या हिंदू समाजात ३०० हून अधिक जाती आहेत. केवळ ब्राह्मणातच ८४ जाती आहेत. राजपूतातही चुडासमा, जेठवा, झाला, जाडेजा, गोहिल, वाघेला, चोहाण, सोळंकी, राठोड, भाटी, यादव इत्यादी जाती व उपजाती असंख्य आढळतात. वैश्य व्यापाऱ्यांमध्ये वाणीया, लुहाणा व भाटिया या प्रमुख जाती आहेत. कुणबी, काछिया, खमार, माळी, सतवारा या शेती करणाऱ्या मुख्य जाती आहेत. या शिवाय भिल्ल, कोळी, दुबळा, घोडीया, गोंड, काथोडी, नायकडा, पारधी, रबारी, भरवाड, बाबरीया, अहिर, इत्यादी अनेक आदीवासी जमातीसुद्धा गुजरात राज्यात आहेत. गुजरातमध्ये २५ लाख लोक मागासलेल्या जमातीचेच आहेत. एकूण लोकसंख्येच्या मानाने गुजरातमध्ये दर पंधरा व्यक्तिमध्ये दोन मागासलेल्या जातीचे असतात. भारतात हरिजनांची लोकसंख्या आदिवासींच्या दुप्पट आहे. परंतु गुजरातमध्ये या उल्ट परिस्थिती आहे. येथील आदिवासींची लोकसंख्या हरिजनांच्या दुप्पट आहे. डांग, सुरत, बलसाड भडोच, पंजमहाल, बडोदा, साबरकांठा, बनासकांठा या भागात आदीवासींची संख्या पुष्कळ आहे. सुरत, बलसाड या जिल्ह्यांची निम्मी लोकसंख्या आदीवासींची आहे, तर डांग हा संपूर्ण जिल्हाच आदीवासींचा आहे.

**नाना पंथ**

हिंदू लोकांची विभागणी नाना पंथात झाली आहे. काही सूर्योपासक आहेत. त्यामुळे गुजरातेत कितीतरी जुनी सूर्य मंदिरे आता भग्नावस्थेत आढळतात. यांना सौर संप्रदायी म्हणत असत. सूर्यदर्शन झाल्यावाचून हे लोक अन्नग्रहण करीत नाहीत. सूर्याचे नाव घेऊन शपथ वाहण्याची चाल आहे.

गुजरातमध्ये दुसरा संप्रदाय आहे शैवांचा. शैव शिवभक्त आहेत. मैत्रक राजे शिवभक्त होते.

लकुलीशाच्या पाशुपत पंथाचा प्रसार गुजरातेत बराच झाला. लाट मंडळातील काया व रोहण म्हणजे कारवाण लकुलीशाचे जन्मस्थान होते. त्याच्या

गर्गनामक शिष्याने गुजरातेत त्याची अनेक मठ-मंदिरे उभारली. ११ व्या शतकात सोळंकी राजांच्या कारकीर्दीत या पंथाचे पुनरुज्जीवन झाले. जयसिंह सिद्धराज हा ह्या पंथाचा अनुयायी होता. त्याने या पंथाच्या प्रसाराला बराच हातभार लावल्यामुळे गुजरातेत हा पंथ राजमान्य व लोकमान्यही ठरला.

स्वामी नारायण पंथ या नावाचा आणखी एक पंथ गुजरात–सौराष्ट्रात आढळतो. नारायण म्हणजे द्वारकाधीश कृष्ण. या पंथात कृष्ण उपासना केली जाते. भडोचपासून कच्छपर्यंत अनेक ठिकाणी त्याची मंदिरे आहेत. हा पंथ सर्व जातीजमातींना खुला आहे. तिथला गवंडी समाज त्याच पंथाचा आहे.

गुजरातमधील राजपुतात शैव व वैष्णव यांच्याप्रमाणे शक्तीचेही उपासक आहेत. प्रत्येक कुळाची वेगळी कुलदेवी असते. जाडेजांच्या आशापुरी देवीचे मुख्य मंदिर कच्छमध्ये आहे. झाला राजपूतांच्या शक्तीदेवीचे मंदिर हाळवद येथे आहे. गोहिलांच्या खोडियार देवीचे मंदिर राजपरा नामक एका ग्रामात आहे. जेठवा राजपूतांची विंध्यवासीनी पोरबंदर जवळच्या छाया नामक गावी आहे. परमारांच्या मांडवरी देवीचे स्थान मुळी या गावात आहे.

१२ व्या शतकाच्या अखेरीस गुजरातमधील हिंदू राजसत्ता नष्ट होऊन पुढील चार पाच शतके मुस्लिम सत्ता नांदली, पण त्या कालखंडातसुद्धा या परधर्मी संस्कृतीला गुजरातच्या सामाजिक जीवनात फारसे स्थान मिळाले नाही. तिथला व्यापार श्रेष्ठी व महाजन यांच्या हाती होता. गावकीचे अधिकार पंचायत कडे होते. नैतिक अधिकार जातीजातींकडे होता. सर्व जातींवर ब्राह्मणांचे वर्चस्व होते. बौद्ध आणि जैन हे धर्मही गुजरातेत वाढले. त्यांना राजाश्रयदेखील लाभला

**पारशी लोक**

पारशी धर्माला गुजरातच्या भूमीने फार मोठा आसरा दिला. पूर्व इराण मधून ८ व्या शतकाच्या प्रारंभी काही पारशी लोक प्रथम भारतात आले. भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर खंबायतच्या खाडीतील देव नावाच्या बेटावर उतरले. त्यावेळी संजानचा हिंदू राजा जदिराणा म्हणून होता. पारशी लोकांच्या नेत्याने जदिराणाकडे वस्तीसाठी जागा मागितली. परंतु जदिराणाला परक्या लोकांना आपल्या राज्यात सामावून घेणे अशक्य वाटले, म्हणून त्याने नकार दिला. पण त्याने हा नकार एका वेगळ्या तऱ्हेने, मोठ्या चातुर्याने कळवला. जदिराणाने दुधाने काठोकाठ भरलेला एक पेला आपल्या प्रधानाकरवी पारशी नेत्याकडे

धाडला. तो दुधाने काठोकाठ भरलेला प्याला आपल्या मागणीच्या उत्तरादाखल आलेला पाहून पारशी नेत्याने त्या मागचा आशय ओळखला. तोही मोठा चतुर होता. त्याने त्या पेल्यात साखरेची चिमूट टाकली आणि तो पेला परत राजाकडे धाडून दिला. ' तुमच्या भरलेल्या पेल्यात आम्ही साखरेप्रमाणे विरघळून जाऊ, एकरूप बनू, गोडी वाढवू,' असा त्यातील अर्थ होता आणि तो राजानेही जाणला. राजा खूष झाला. त्याने पारशी लोकांना आपल्या साम्राज्यात सामावून घेतले.

गुजरातच्याच नव्हे तर एकूण भारतीय जीवनाशी पारशी एकरूप झालेले आहेत. भडोच, नवसारी, अंकलेश्वर, बिलिमोरा, गठादेवी, ही शहरे विशेषकरून पारश्यांचीच आहेत. त्यांची भाषाही आता गुजराती झालेली आहे. व्यापार, उद्योगात पारशी लोकही आघाडीवर आहेत.

याशिवाय मुस्लिम, शीख, ख्रिश्चन, इत्यादी धर्माचे लोकही गुजरातमध्ये आहेत. येथील मुसलमान देखिल गुजराती भाषा बोलतात.

**स्त्री-जीवन**

गुजराती स्त्री आता पुष्कळच सुधारलेली आहे. शिक्षणाचा प्रसार बराच झालेला आहे. परंतु पूर्वीच्या काळी स्त्रियांना शिक्षणाचा गंध नव्हता. बालविवाह, हुंडापद्धती रूढ होती. सौराष्ट्र, काठेवाडात काठीयाणी व नागराणी स्त्री पडादानशील असे. ती सहसा बाहेर पडत नसे. पडलीच तर तिच्या गाडीभोवती पडदे असत. ओठ लाल ठेवणारी, विडा खाणारी नागराणी स्त्री रुबाबात असते. सौराष्ट्रातील खारण जातीच्या स्त्रिया चित्रासारख्या आकर्षक असतात. त्या मेंढ्या, बकऱ्या गाई, म्हशी पाळतात. डोंगर–दऱ्यातून हिंडतात. गुजरातमधील छारा जातीतील स्त्री दिसायला पुरुषी व लढाऊ दिसते. तिच्या अंगी धीटपणा असतो. सुरतेकडील स्त्रिया जास्त नाजूक व शौकीन दिसतात. अहमदाबाद सुरत दरम्यानच्या भागात बहुसंख्य वस्ती पाटीदारांची आहे. या स्त्रियांचे बोलणे जरा कठोर वाटते. त्यांचे जीवनही खडतर असते. त्यांना कष्टाची कामे करावी लागतात.

कच्छ–सौराष्ट्राच्या मानाने गुजरात कमी रूढीप्रिय आहे. येथील सामाजिक चालीरीती थोड्या शिथील आहेत. महागुजरातच्या निर्मितीनंतर नव्या सलगतेमुळे नवे विचारप्रवाह गुजराती समाजात वाहू लागले आहेत. स्त्री-जीवनातील भिन्नपणाही कमी होऊ लागला आहे. पूर्वीचे गुलामी जीवन संपुष्टात येत आहे.

गुजरातमध्ये सामाजिक सुधारणेचे कार्य कवी नर्मद यांनी प्रथम हाती घेतले. धर्माच्या नावाखाली स्त्रियांवर होणारे अन्याय व अंधश्रद्धा यांच्याशी त्यांनी सामना केला. जनमानसात सुधारणेची भावना रुजवली.

गांधीजींनी गुजरातमधली स्त्रीशक्ती जागृत केली. आपल्या कार्यात त्यांची मदत घेतली. घराबाहेर न पडणाऱ्या गुजराती स्त्रिया गांधीजींच्या हाकेने धडाडीने घराबाहेर पडल्या आणि त्यांच्या चळवळीत सामील झाल्या. सत्याग्रह करून तुरुंगातही गेल्या.

पूर्वीच्याकाळी मुलीचे लग्न फार खर्चिक होई. मुलीच्या बापाला हुंडा आणि पैठन या गोष्टी डोईजड होत असत. काही ठिकाणी तर अशी चाल होती की, मुलीला माहेरी आणायची तर पुन्हा लग्नाइतका हुंडा द्यावा लागत असे म्हणून कित्येक मुलींना सासरी गेल्यावर आयुष्यात आईबापाचे तोंड परत दिसत नसे.

पाटीदार जातीमध्ये हजारो रुपये पैठनच्या रूपाने द्यावे लागत असत, म्हणून मुलगी जन्मली की मारून टाकत असत.

पूर्वीच्या या अमानुष चाली किंवा रूढी आता उरलेल्या नाहीत. श्रीमती मृदुलाबेन साराभाई, पुष्पाबेन मेहता आदी स्त्रियांनी गुजरातमध्ये 'ज्योती संघाची' स्थापना करून स्त्रियांचे प्रश्न सोडवले आहेत.

श्री. गिजूभाई बधेका यांनी स्त्रियांना बालशिक्षणाचे शिक्षण दिले. गुजरातमधील अनेक गावातून स्त्रिया आता बालमंदिरे चालवतात.

श्रीयुत काबराजी या पारशी गृहस्थांनी स्त्रियांसाठी 'स्त्रीबोध' नावाचे मासिक काढले होते. त्यांनी स्त्रियांत वाचनाची आवड निर्माण केली. आता अलीकडच्या काळात स्त्रियांसाठी अनेक नियतकालीके निघालेली आहेत.

श्री. झवेरचंद मेघाणी यांनी गुजरातमधील अशिक्षित स्त्रियांची 'स्त्रीगीते' जमवून त्यांचे संकलन करण्याचे फार मोठे काम केले आहे.

आजची गुजराती स्त्री शिक्षित झाली असून नोकरी-चाकरी करून द्रव्यार्जनही करू लागली आहे. त्याचप्रमाणे शिक्षण, कला, साहित्य, राजकारण व संस्कृती इत्यादी क्षेत्रांत ती भाग घेत असून महत्त्वाचे कार्य करीत आहे.

गुजरातचे महाकवी न्हानालाल यांनी आपल्या कवितेत गुजराती स्त्रीचे सुरेख चित्र शब्दबद्ध केले आहे —

**चोळी चणियो पाटली नो घेर**
**छेडले साळूनी सोनल सेर**
**अंग अखेय नीज अलबेल**
**साळुमा ढ़ांकती रूपनी वेल**
**राणकतनया भावशोभना सुंदर तानो छोड**
**आर्य सुंदरी नथी अवनिमां तुज रूप गुणनी जोड**
**भाल कुमकुम करकंकणसार**
**कंथ ना सजां ते शणगार**

—नागवेलीसारखी नाजुक देहयष्टी, पारिजातकाच्या पुष्पासारखी कोमल मुखश्री, लज्जाभाराने लवलेल्या पापण्या ज्या ठिकाणी असतील तेथे खात्रीपूर्वक समजावे की ती, गुर्जर सुंदरीच आहे! तिच्या वेशभूषेचे लालित्यही आगळेच आहे. ठाशीव चोळी, घेरदार परकर आणि व्यवस्थित सुटया निऱ्यांचे नेसण, कमरेभोवती लपेटून घेतलेला, कुंतलभार झाकीत खांद्यावरून गेलेला पदर, हातात काकणे आणि पायात झांजर...

नाजुक काया, ललित भूषा यांना शोभणारा नम्र, गोड व ऋजू स्वभाव हे तिचे आणखी एक वैशिष्टय आहे. या गौरवशाली गुर्जरीला गुजरातीत 'गुरवी गुजरातण' असे म्हटले आहे.

**वेशभूषा**

गुजराती माणसाचा पोषाक साधासुधाच असतो. सामान्यपणे पुरुष धोतर नेसतात. सौराष्ट्रात 'चारेणो' म्हणजे एक प्रकारचा पायजमा आणि कंबरे एवढा 'मिरजई' म्हणजे एक प्रकारचा अंगरखा घालतात. डोक्यावर पगडी, साफा, किंवा फेटा असतो. पूर्वीच्या काळी गुजराती पुरुष जी पगडी वापरीत असत ती २० ते २५ वार लांबीचे तलम सूती कापड घेऊन बांधलेली असे. कपाळाच्या वर घड्या, माथ्यावर मध्यभागी उंचवटा व कोपऱ्यात एक लहान टोक अशी त्या पगडीची रचना असे. फेटो किंवा साफो म्हणजे ऐत्यावेळी बांधलेले पागोटे असे. जुन्या काळी अंगात अंगरखे, जाकीट व जामो घालून व वर उपट्टो म्हणजे उपरणे घेण्याची पद्धत होती. शहरात कोट, टोपी वापरतात. गुजराती माणूस धोतराचा कासोटा मात्र उजव्या बाजूला खोचतो.

गुजराती शहरातील स्त्रिया पाचवारी पातळ विकच्छ नेसतात. ग्रामीण स्त्रिया

कासोट्याचे पातळ नेसतात. गुजराती स्त्रिया साडीचा पदर डाव्या खांद्यावरून न घेता उजव्या खांद्यावरून घेतात.

पूर्वीच्या काळी स्त्रिया घागरा, काचोळी व ओढणी वापरीत असत. ही वेशभूषा कलाकुसरीने आकर्षक केलेली असे. स्त्रियांच्या पायात पोकळ पण जाडजूड वाळे, हातात चुडी म्हणजे सोन्याच्या किंवा हस्तिदंती बांगड्या, गळ्यात हांसडी, दानिया, कंठी, चंद्रहार, झलमर, सांकलीया इत्यादी अलंकार ती घालत असे. त्याचप्रमाणे लोलिमा, झाल, थोलिमा, इत्यादी कर्णभूषणे, छाक हा केसात घालायचा अलंकार व बुट्टी म्हणजे कुडी इत्यादी अलंकार ती वापरीत असे.

परंतु आता जुनी वेशभूषा व जुने दागदागिने मागे पडत असून गुजराती पुरुष साध्या सुटसुटीत सुटाबुटात व स्त्रिया गोल साड्यात वावरताना दिसतात.

**खाणे–पिणे**

बहुसंख्य गुजराती माणसे शाकाहारी आहेत. गुजरातच्या सात्त्विकतेला शाकाहाराने पोसलेले आहे. काही जातीजमाती मांसाहारी आहेत.

गुजराती जेवणात गहू, ज्वारी, बाजरी, भाज्या, असतात. त्यांच्या जेवणात आले, मिरची, ओली हळद, पुदिना या वस्तूंचे वैपुल्य विशेष आढळते. या मालमसाल्याशिवाय गुजराती जेवणाला रुची येत नाही. गुजराती गृहिणी पोळी ऐवजी रोटल्या किंवा फुलके करते. जेवणाचा प्रारंभ रोटल्यानेच होतो. त्याच्या जोडीला पात्राची भाजी हटकून असते. पात्रा म्हणजे अळू. पात्राच्या तळलेल्या खमंग वड्या, निरनिराळ्या तऱ्हेची लोणची, डाळ, गुजराती जेवणाची रुची वाढवीत असतात. भात आधी न जेवता जेवणाच्या शेवटी डाळभातानेच जेवण संपते. गुजराती माणसाच्या आहारात तूप किंवा तुपातील पदार्थ प्राचुर्याने असतात. ‘ घी नी लडवा, लडवानुप्पर घी ’ तुपातला लाडू आणि लाडूवर तूप, असा मागून पुढून तुपाचा मारा असतो. तुपातील नाना तऱ्हेच्या मिठाया सणावारी किंवा शुभकार्याच्या जेवणावळीत विपुल प्रमाणात असतात. लाडू, जलेबी, पेढा, बर्फी, इत्यादी मिष्टान्न जसे असते, त्याचप्रमाणे सेवा, तळलेली डाळ, श्याक, ढोकळा इत्यादी खमंग व चमचमीत पदार्थही त्यांच्या खाण्यात असतात. खाकरा हा एक विशेष गुजराती खाद्य प्रकार आहे. हा रोटी सारखाच कणकेचा पातळ पापडासारखा कुरकुरीत व स्वादिष्ट असतो. यात पाण्याचा अंश नसल्यामुळे तो बरेच दिवस टिकतो. त्यामुळे प्रवासातही खाकरा जवळ बाळगला जातो.

चहा आता गुजरातमध्ये सर्वमान्य झालेला आहे. परंतु गुजराती माणसाचा चहा साधासुदा नसून मसालेदार असतो. लवंग, वेलची, दालचिनी यांची पूड त्यात टाकून चहाला एक वेगळीच चव ते आणतात.

गुजरातमध्ये आदरातिथ्य फार आढळते. आलेल्या पाहुण्याला नाना तऱ्हेची भरपूर मिठाई खाऊ घालून त्याला तुपात तळून आणि साखरेत घोळून काढल्या-खेरीज गुजराती गृहिणीला समाधान वाटत नाही. वेळेला एवढे जरी घडले नाही तरी भजिया आणि दूधपुरी एवढा पाहुणचार तरी होणारच होणार.

गुजरातच्या काही भागात तांदुळही होतो. तेथे अर्थातच भोजनात भाताचे प्रमाण अधिक असते. खिचडी ही गुजराती माणसाला फार आवडते. डाळ ही जेवणात हवीच. मूग, उडिद, हरभरा, तूर, मसूर या डाळी त्यांच्या आहारात असतात. भुईमुगाचे उत्पन्न पुष्कळ असल्यामुळे भुईमुगाचे तेल बरेच वापरात असते. तीळ आणि सरसूचे तेलही वापरतात.

संत्री, मोसंबी, चिक्कू, आंबे, केळी इत्यादी फळफळावळही त्यांच्या आहारात असतात. बलसाडचा हापूस आंबा प्रख्यात आहे. सुरतेची फेणीदेखील प्रसिद्ध आहे.

गुजराती माणसाला जेवणानंतर सुपारी किंवा बडिशेप खाण्याचा शौक आहे.

**चालीरीती**

चालीरीती, लोकाचार यांना एक परंपरा लाभलेली असते. गुजरातमध्ये पारंपारिक लोकाचार आहेतच.



पुत्रजन्माचा आनंद

मूल जन्मले की या चालीरीती सुरू होतात. मूल जन्मल्याबरोबर काशाची थाळी वाजवून आनंद प्रकट करतात. सहाव्या दिवशी 'छटी' साजरी करतात. त्या दिवशी पाटावर कोरा कागद, दौत, लेखणी ठेवून पूजा करतात. मुलाच्या भाग्याचा 'ललाट लेख' या दिवशी देव लिहितो अशी समजूत आहे. सुहासिनी गाणेही म्हणतात :

'छट्टीना लखीना लेख रे
चुकता नथी रे।'

बाळंतीण चाळीस दिवसांची झाली म्हणजे चुलीला हळद-कुंकू, अक्षदा वाहून पूजा करते आणि मग वागायला उठते. तोपर्यंत तिने घरकाम करायचे नसते.

मुलाला महिना होऊन गेला म्हणजे एखादा शुभदिवस पाहून त्याचा नामकरण विधी होतो. याला 'गोत्रज' म्हणतात. या दिवशी सुहासिनी येऊन मुलाचे नाव ठेवतात. गाणी म्हणतात. हळदी-कुंकू करतात.

मुलाचे जावळ काढण्याचा विधी 'वाळवडा' म्हणून करतात. मूल १३ महिन्यांचे, १५ महिन्याचे किंवा तीन वर्षांचे झाले म्हणजे 'वाळवडा' करतात.

मूल पाच वर्षांचे झाले म्हणजे 'निशागळनु' समारंभ होतो. जैनधर्मी गुजराती लोकात हा समारंभ भाद्रपद शुद्ध बीजेला करतात. या दिवशी महावीरदेव विद्या शिकायला गेले, म्हणून त्या दिवशी मुलालाही नवे कपडे घालून, पाटी पेन्सील देऊन ऐपतीप्रमाणे घोड्यावरून वाजतगाजत शाळेत धाडतात.

**लग्नविधी**

जुन्याकाळी वधूपरीक्षा निराळ्या तऱ्हेने केली जाई. वधूला भावी सासूच्या डोक्याला तेल चोळण्यास सांगत असत. जी मुलगी उत्तम रीतीने तेल चोळायची ती उत्तम वधू ठरायची. वधू परिक्षेत पास व्हायची !

लग्नाआधी दोन तीन दिवस 'गणेश' बसवण्याचा विधी होतो. उजव्या सोंडेचा गणपती चौरंगावर बसवतात. हळद-कुंकू, पानसुपारी, नारळ, सांजेच्या पंचवीस मुठीया ठेवून पूजा करतात. नवऱ्यामुलाला आंघोळ घातल्यावर गणेशापुढे बसवून सुगंधी उटणे लावतात. महाराष्ट्राप्रमाणे अंगाला हळद लावण्यासारखाच हा विधी आहे. या वेळी सुहासिनी गीते गातात.

लग्नविधीला बोहले नसते. चौरंगाभोवती पितळेचे कलश ठेवलेले असतात. लग्न समाजात होते. मंगलाष्टके झाल्यावर नवरा-नवरी एकमेकांना विवाहमाला घालतात. नंतर एकमेकांचा हात एकमेकांच्या हाती रेशमी वस्त्राखाली घेऊन हस्तमिलाप घडवून आणतात.

या आधी 'चोरी' समारंभाच्या निमित्ताने चार मंगळ चुकवायचे असतात. गावकीचे, धर्माचे, देवदेवतांचे देणे असेल ते चुकते करावे लागते.

लग्नानंतर कन्सार वाढण्याचा एक समारंभ असतो. जावयाला सासू वाढते. जेवणानंतर ती जावयाचे हात धुते. हात धुतल्यावर जावई सासूच्या पदराला हात पुसतो. सासू त्याला चांदीचे दातकोरणे-कानकोरणे व ऐपतीप्रमाणे रुपये देते. दातकोरणे हे वृद्धापकाळाचे प्रतीक असते. ते देण्याने सासू जावयाला दीर्घायुषी होण्याचा आशीर्वादच देत असते.

गुजराती लग्न-कार्यात, सण-समारंभात त्या त्या वेळी म्हणण्याची पुष्कळ गाणी आहेत. स्त्रिया ती गाणी म्हणत असतात.

धार्मिक गोष्टीबरोबर अंधश्रद्धाही रूढ आहेत. बाहेर जाताना शिंक आली किंवा मांजर आडवे गेले तर अपशकुन मानतात. कुमारी आडवी गेली तर शुभ मानतात.

**सण-समारंभ**

भारतात इतर प्रांतांत जसे सण-समारंभ, उत्सव, व्रते आहेत, तसेच ते गुजरातभरही आहेत. पुष्कळसे सण थोड्याफार फरकाने, पण एकसारखेच असतात. हा फरकही हवामान, भौगोलिक परिस्थितीमुळे पडलेला असतो. काही सण त्या, त्या विभागापुरते व पंथापुरतेच मर्यादित असतात. त्या प्रदेशाचे ते वैशिष्ट्य असते.

सण-समारंभ किंवा व्रत-वैकल्ये यांच्यामागे एक सांस्कृतिक व सर्वस्पर्शी अशी दृष्टी असते. गुजरातीत सणाला 'तेहवार' म्हणतात.

**बेस्तुवरस**

हा नव्या वर्षाचा दिवस. कार्तिक शुद्ध प्रतिपदेचा. दिवाळीचा पाडवा हाच गुजरातमध्ये नववर्षारंभ पाळतात. या दिवशी व्यापारी लोक जमाखर्चाच्या नव्या वह्या घालतात. वही-पूजनाचा समारंभ थाटाने साजरा होतो. गुजराती पंचांगाप्रमाणे 'कारतक' हा नव्या वर्षाचा पहिला महिना असतो आणि 'आसो' म्हणजे आश्विन हा अखेरचा असतो.

**मोळाकत**

गुजरातेत स्त्रियांची व्रते आणि सणवार यांची एक विशेषता अशी की, वयोमानाप्रमाणे त्याचे प्रकार आढळतात. लहान मुली आषाढात 'मोळाकत' हे व्रत करून गौरीपूजा करतात. एकदाच आणि तेही मिठाशिवाय एकधान्य

फराळ करून पूजा करतात. दिवसभर गरबे, खेळ चालतात. संयम, संस्कार, आनंद सारे या व्रतातून मिळते. स्वतःच्या भावी जीवनाची कल्पना येते आणि आर्य-संस्काराचे महत्त्व पटते. सौंदर्यदृष्टी विकास पावते, अंग वळते, कंठ फुटतो आणि शिस्तीचा प्रथम पाठही मिळतो.

**गौरच व्रत**

चांगला पती मिळावा म्हणून कुमारी श्रावणात हे व्रत करतात. हे व्रत करताना पाच दिवस रोज एकदाच जेवायचे असते. तेही अळणी. रोज गौरीची पूजा केल्याखेरीज तोंडात पाणी घ्यायचे नसते. संध्याकाळी कुंवारी एकत्र जमून गौरीची स्तुतिपर गाणी गातात. गरबा नाचतात. पाचव्या दिवशी मध्यरात्रीपर्यंत जागरण करून व्रताचे उद्यापन करतात.

खेड्यातून या काळात मुलीला चालीरीती शिकवतात. कुठे कुठे तर मयत झाल्यावर छाती बडवून शोक, विलाप कसा करावा, हे देखील शिकवतात. शहरात ही प्रथा नाही. आनंदोत्सव चालतो. जिला मुठीत राहणारा नवरा मिळतो तिला इतर मुली म्हणतात, ‘ तिने पाच बोटांनी देव पूजला आहे. ’

**जयापार्वती**

विवाहित तरुणीसाठी हे व्रत असते. सती सावित्रीसारखी या मागे दंत-कथा आहे. सर्पदंश होऊन मरण पावलेल्या आपल्या पतीला एका सतीने हे व्रत करून जिवंत परत मिळविले, अशी ती कथा आहे. व्रत करणारी स्त्री या दिवशी दिवसभर उपास करते. नंतर स्नान करून महादेवाची पूजा करते. रात्री फराळ करते. असे पाच दिवस चालते. पाचव्या दिवशी रात्री जागरण व उद्यापन होते.

**दिवासा**

पतीच्या कल्याणासाठी सुवासिनी हे व्रत करतात. हे व्रत करणाऱ्या स्त्रीने एक दिवस, एक रात्र व दुसराही सबंध दिवस झोपायचे नसते; एवढेच नव्हे तर आडवे होऊन विश्रांती देखील घ्यायची नसते. हे व्रत अमावास्येच्या दिवशी करायचे असते. व्रताच्या दिवशी उपवास, मग मोठी पूजा करून फराळ करायचा असतो. या वेळी सगेसोयरे, इष्टमित्र बोलवतात. फराळाचे देतात. वायने वाटतात. ऐपतीनुसार वराच खर्चही करतात.

**बोळीचोथ**

श्रावणात शुद्ध चतुर्थीला हे व्रत मातेने मुलाच्या कल्याणासाठी करायचे असते.

माता स्नान करून सवत्स धेनूचे पूजन करते. एकच वेळ जेवते. जेवणात शिळी बाजरीची भाकरी व दही घेते. गायीचे दूध-तूप या दिवशी तिला वर्ज्य असते.

**नागपंचमी**

बोळीचोथच्या दुसऱ्या दिवशी नागपंचमी. स्त्रियांप्रमाणे पुरुषही हे व्रत करतात. भिंतीवर नागाचे चित्र काढतात. यापुढे 'तलवट' म्हणजे गूळ व कुटलेले तीळ मिसळून ठेवतात. नारळही ठेवतात. पूजा करतात. हा प्रसाद व फलाहार घेऊन दिवसभर व्रतस्थ राहतात. या दिवशी शिजलेले अन्न खात नाहीत; पण भिजवलेले चालते.

**शीळसातेम**

श्रावण सप्तमीला शितळासप्तमी म्हणतात. या दिवशी चूल पेटवायची नसते. चुलीत आंब्याची बाठ ठेवतात. कापसाची माळ चुलीला घालतात. हळद-कुंकू वाहतात. टिळा लावतात. या दिवशी फक्त एकदाच तेही आदल्या दिवशीचे शिळे खायचे असते. चूल पेटवायची नसते. हे व्रतही माता मुलाबाळांच्या कल्याणासाठीच करतात.

**नवरात्र**

आश्विन उजाडताच नवरात्राला प्रारंभ होतो. या दिवसात अंबाजीमातेचे पूजन, जप, करतात. एकवेळ अन्नग्रहण करतात. माताजींचे दर्शन घेऊन रास-गरबा नाचतात. नऊ दिवस गरबा चालतो. खेड्यात जाळीदार घटात दिवा ठेवतात व तो घट माथ्यावर घेऊन मुली गाणी गात गात घरोघर जातात. पैसे, लाह्या, डाळे वसूल करून मौज मजा करतात.

**रांदलमाता**

गुजराती समाजात प्रत्येक मंगल प्रसंगाची सुरुवात 'रांदलमाते'च्या पूजनाने होत असते. 'रांदल' हे सूर्याच्या पत्नीचे नाव आहे. मूळ नाव आहे 'रन्नादे' पण सगळीजणं तिची 'जगन्माता' म्हणून पूजा करतात व 'रांदलमा' म्हणतात. घरात रांदलमाची स्थापना करून तिच्यापुढे तुपाचा नंदादीप अखंड तेवत ठेवतात. विविध तऱ्हेची गाणी गाऊन आराधना करतात. वंशवृद्धी व्हावी व वांझपणा टळावा यासाठी स्त्रिया रांदलमाला नवस करतात. कुमारिकांना बोलावून त्यांची चरणपूजा करतात, जेवायला घालतात, मग नवस बोलणारी स्त्री शेवटी जेवते. सर्व व्रतात ह्याचे पावित्र्य मोठे मानतात.

**दिवाळी**

दिवाळीच्या दिवसात घरोघर दीप लावतात. अंगणात, घरांपुढे साथिया रांगोळ्यांनी आरास करतात. रात्री शोभेचे दारूकाम चालते. गोडधोड पक्वांनांची रेलचेल असते. धनत्रयोदशीला धनाची पूजा करतात. नरकचतुर्दशीला नरकासुराचा वध झाला म्हणून दीप उजळून आनंद करतात. आमावस्येला लक्ष्मीपूजन होते. दिवाळीचा सण लहान-थोर, गरिब-श्रीमंत सर्व साजरा करतात.

**उतरांड**

संक्रांतीच्या वेळी हा सण साजरा होतो. अहमदाबाद, बडोदे, सुरत आदी ठिकाणी या सुमारास पतंगोत्सवाची धमाल उडते. घराघरांच्या व अन्य इमारतींच्या छपरावर उभे राहून पतंग उडवले जातात ! यावेळच्या तरुणांचा उत्साह अमाप असतो. दरवर्षी अनेक अपघात होतात, पण उत्साह काही ओसरत नाही.

**होळी**

गुजरातच्या भिल्ल आदि आदिवासींमध्ये व ग्रामीण भागात होळीचा सण विशेष उत्साहाने साजरा होतो. या वेळी रंग उडवतात, फागू गीते गातात, हसण्या-खेळण्याने आनंद उपभोगतात.

जैन पंथीयात ‘ पर्युषण पर्व ’ फार महत्त्वाचे मानले जाते. श्रावण वद्य द्वादशी ते भाद्रपद शुद्ध चतुर्थीपर्यंत आठ दिवस हे पर्व पाळले जाते.

**जत्रा-यात्रा**

लोकजीवनाला उल्हासित करणाऱ्या जत्रा आणि यात्रा गुजरातभर ठिक-ठिकाणी भरतात. कार्तिकी पौर्णिमेला अहमदाबादेजवळ वौठा, साबरकांठा, शामलाजी व सिद्धपूर येथे सरस्वतीच्याकाठी मोठ्या जत्रा भरत असतात. शिवरात्रीला गिरनार-च्या भवनाथाची यात्रा भरते. स्थानिक ग्रामदेवतांच्या जत्रा गावोगावी होतात. रास, गरबा नाचला-गायला जातो. बासरी वाजवतात. तरणेतरची यात्रा फार मोठी असते. दोन दिवस लोक रास-रासडा नाचून मौज मजा करतात. यात्रांच्या ठिकाणी दुकाने थाटली जातात. मोठा व्यापार चालतो. गुरांचीही खरेदी विक्री होते.

अशा प्रकारे गुजरातचे जनजीवन विविध सण—समारंभाने, व्रत-उत्सवाने व जत्रा-यात्रांनी गजबजलेले आहे.

□ □

# भाषा आणि साहित्य

गुजराती भाषेची उत्पत्ती आणि विकास अन्य भारतीय भाषांप्रमाणेच झालेला आहे. साहित्याची आदिभाषा प्राचीन भारतात संस्कृत हीच होती. साहित्याची भाषा जरी संस्कृत राहिली तरी सामान्य जनांची बोली बदलत गेली. या लोकांच्या बोलभाषेला प्राकृत असे नाव पडले. या प्राकृत भाषेचेच एक रूप म्हणून शौरसेनी ही भाषा रूढ झाली. कालांतराने ह्या शौरसेनी भाषेपासूनच नागर अपभ्रंश भाषेची उत्पत्ती झाली. आजची गुजराती भाषा ही ह्या नागर अपभ्रंश भाषेपासून निर्माण झालेली आहे. ११ व्या शतकापासून ते १४ व्या शतकापर्यंत रूढ असलेल्या भाषेला विद्वानांनी 'गौर्जर अपभ्रंश' असे नाव दिले होते. त्यानंतर १५ व्या शतकापासून ते १७ व्या शतकापर्यंतच्या भाषेला 'प्राचीन गुजराती' असे म्हटले जाते. आणि त्यानंतर पुढे 'आर्वाचीन गुजराती' भाषेचा विकास झालेला आहे. संस्कृत व्याकरणाच्या आधारानेच गुजराती भाषेला व्यवस्थित असे रूप देण्यात आलेले आहे. संस्कृत आणि प्राकृत या भाषांचे शब्द जसे आजच्या गुजरातीत आढळतात, तसेच परक्यांची आक्रमणे, परसत्तेची राजवट, परदेशांशी व्यापार या साहचर्यामुळे अरबी फारसी, इंग्रजी, पोर्तुगीज आणि फ्रेंच या भाषातील शब्दही गुजराती भाषेत बरेच आढळतात.

गुजराती भाषेचा सर्वात जुना उल्लेख ७८८ मध्ये उद्योतनसूरींच्या 'कुवलयमाला' या प्राकृत कथासंग्रहात सापडतो. त्यात एक प्रवासी भारताच्या निरनिराळ्या प्रदेशातील लोकांच्या बोलीचे वर्णन करताना गुजराती लोकांच्या गाथेत म्हणतो—

**' धण लोणिय पुहठंळो धम्मयरे संधि**
**विशहे णि उणे । ण उरे भल्लड भणिरे**
**अह पेच्छद गुज्जरे अवरे ॥ '**

—खूप लोणीयुक्त आहार घेतल्यामुळे पुष्ट शरीराचे, धार्मिक, संधिविग्रह करण्यात निपुण, आणि ' ठा उरे भल्लड ' असे बोलणाऱ्या गुर्जर लोकांना त्याने पाहिले.

अशा या लोकांची गुजराती ही आर्यकुलाची एक मुख्य भाषा आहे. विक्रम संवताच्या १० व्या शतकात ती उत्तर आणि पश्चिम भारतात् गुजरातच्या सिद्धराज आणि कुमारपाल या चालुक्य राजांच्या दरबारच्या आचार्य हेमचंद्राने अपभ्रंश भाषेचे व्याकरण विस्तारपूर्वक लिहिले. या व्याकरणात दिलेली काव्याची अवतरणे प्राचीन गुजरातीचे नमुने होत.

**प्राचीन गुजराती साहित्य**

आचार्य हेमचंद्र हा जैन विद्वान १०९३ ते ११७४ ह्या कालखंडात होऊन गेला. हा त्या काळचा महान प्रतिभासंपन्न लेखक होता. विद्वत्ता आणि आध्यात्मिक अधिकार त्याने प्राप्त केलेला होता. त्यामुळे त्याला ' कलिकालसर्वज्ञ ' असे संबोधले आहे. सिद्धराज सोळंकी या राजाने गुजरातमध्ये शिक्षणाचा प्रसार करण्याच्या उद्देशाने हेमचंद्राला आपल्या दरबारात सन्मानपूर्वक ठेवून घेतले होते. त्यानुसार त्याने ' सिद्ध हेशशब्दानुशासन ' नावाच्या ग्रंथात अपभ्रंश भाषेचे व्याकरण लिहिले. ' काव्यानुशासन ' या ग्रंथात त्याने मम्मटाच्या काव्यप्रकाश ग्रंथाचे विवरण केले आहे. ' द्व्याश्रय ' या ग्रंथात कुमारपालापर्यंतच्या चालुक्य राजांची त्याने प्रशस्ती लिहिली असून व्याकरणाच्या नियमांची उदाहरणेही दिली आहेत. ' छंदोनुशासन ' या ग्रंथात त्याने अपभ्रंश भाषेतील छंदांची लक्षणे सांगितलेली आहेत.

गुजराती भाषेचे अध्ययन आणि इतिहास माहित करून घेण्याच्यादृष्टीने हेमचंद्राचे वरील ग्रंथ फार उपयुक्त आहेत.

गुजरातच्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक व्यक्तीत्वावर हेमचंद्राच्या साहित्यातूनच प्रकाश पडतो.

या युगातील शुद्ध काव्याची ही थोडी वानगी —

**लइ बप्पुल पिऊ दुद्धुला, करू अम्हाण छासि ।**
**पुत्तहु मत्थें सवउं जइ दहिं जमिवि जहिअ आसि ।**

—हे बाळा दूध पी, आमच्या येथे ताक कोठून मिळणार? मुलाच्या डोक्यावर हात ठेवून सांगते की, मी आयुष्यभर दह्याचे दर्शनसुद्धा घेतलेले नाही.

प्राचीन गुजराती काव्यामध्ये रास, फागु, बारमासी, मातृका, कक्को आणि रूपक-काव्य असे विविध प्रकार आढळतात.

रास किंवा रासो या प्रासयुक्त पद्यामध्ये धर्मविषयक कथात्मक, चरित्रात्मक, आणि वर्णनात्मक गेयकाव्य असते. जैन कवींनी आपल्या धर्ममत प्रचारासाठी रास ह्या काव्यप्रकाराचा बराच उपयोग करून घेतला.

शालिभद्र सूरि या कवीची 'भरतेश्वर बाहुबली रास' ही रचना कालदृष्ट्या १८८५ मधील पहिली रचना मानली जाते. त्यानंतर धर्म या कवीच्या 'जम्बूस्वामी चरित्र' आणि 'स्थूलिभद्र रास' या काव्यांची रचना झाली. नंतर विजयसेन-सुरीची 'रेवंतागिरीरास' व अम्बदेव सुरीची 'समरा रासू' ह्या रचना प्रसिद्ध झाल्या.

फागु काव्य म्हणजे फाल्गुन महिन्यात, अर्थात वसंत ऋतूमध्ये गावयाची गीते. या काव्यात शब्दालंकारांच्या चमत्काराचे प्रदर्शन आढळते. विशेषतः यमक आणि उत्प्रेक्षा यांचा वापर अधिक्याने केलेला असतो, प्रेम आणि शृंगार हा अशा काव्यांचा विषय असतो. परंतु जैन कवींनी या लोकप्रिय काव्य प्रकाराचाही उपयोग धर्मप्रचारासाठी केला. अशा काव्यात प्रारंभी ते एखाद्या युवकाचे प्रेमवर्णन करीत असत. परंतु अखेरीस शील, त्याग आणि तप या गुणांचा विजय म्हणजेच जैनधर्माचे महत्त्व ते प्रस्थापित करीत असत. शेकडो फागु काव्यातील ग्रंथांमध्ये 'वसंतविलास' हेच काव्य फक्त अशा सांप्रदायिकतेपासून अलिप्त आहे. म्हणूनच या काव्याला गुर्जर साहित्याच्या आकाशातील चंद्रमा असे मानले जाते. जिनपद्य सूरि, राजशेखर या व अन्य अज्ञात कवींची फागु-काव्ये प्राचीन गुर्जर साहित्यात आढळतात.

बारमासी हा देखील रास आणि फागु यांच्याप्रमाणेच प्राचीन काळातील एक प्रचलित काव्य-प्रकार आहे. काव्यपूर्ण शैलीत बाराही महिन्यांचे प्राकृतिक सौंदर्य आणि वियोगिनी नायिकेची मनोदशा याचे प्रभावशाली वर्णन अशा काव्या-तून आढळते.

मातृका आणि कक्को हे चमत्कृतीपूर्ण काव्यप्रकार आहेत. मातृकाची

प्रत्येक ओळ क्रमशः स्वराने सुरू होते, तर कक्कोची व्यंजनाने सुरू होते. या प्रकारच्या काव्यात बहुधा सुंदर सुभाषिते आढळतात.

महान जैन कवी जयशेखर सूरि याने लिहिलेले ' प्रबोध चिंतामणी ' हे १५ व्या शतकातील एक वैशिष्ट्यपूर्ण रूपक काव्य म्हणून मानले जाते. या काव्याची रचना कवीने प्रारंभी संस्कृतमध्ये केली होती. परंतु मागाहून सामान्य लोकांना समजण्यासाठी काही फेरफार करून हे काव्य गुजरातीमध्ये लिहिले. गूढ आध्यात्मिक विषय मोठ्या रोचक पद्धतीने कवीने या काव्यात हाताळला आहे.

प्राचीन काळातील साहित्य हे प्रामुख्याने पद्यरूप जरी असले तरी काही गद्य साहित्यही आढळते. जैन मुनींनी आपल्या मतप्रचारासाठी गद्यात धर्मकथा लिहिल्या होत्या. तरुण प्रभू सुरीने ' प्रतिक्रमण बालवबोध ' या ग्रंथाची १३५५ मध्ये रचना केली. यांत जैनधर्म दर्शन, व्रते, कथा, इत्यादींचा समावेश आहे.

१३९४ मध्ये कुलमंडन गाठीने, ' मुग्धावबोध औक्तिक ' नावाचे संस्कृत भाषेचे व्याकरण गुजराती भाषेत लिहिले होते. यात नियम आणि उदाहरणे गुजराती भाषेची आहेत. यावरून त्याकाळच्या गद्य वाङ्मयाचा थोडासा परिचय होतो.

या काळातली सर्वात प्रौढ गद्य रचना म्हणून माणिक्यसुंदर सूरीची ' पृथ्वीचंद्र चरित ' ही मानली जाते.

या काळातील साहित्य निर्मिती प्रामुख्याने जैन कवींनी जरी केली असली तरी काही जैनेतर कवी देखिल झाले. त्यांपैकी असाइत रचित ' हंसाहुली ' श्रीधर व्यासकृत ' रणमल्ल छंद, ' कवी भीम कृत ' सदयवत्स चरित, ' या रचना विख्यात आहेत.

१४२० मधील मुसलमान कवी मीर अब्दूर्रहमान कृत ' संदेशक रास ' हे मेघदूतासारखे लिहिलेले एक दूतकाव्य आहे.

**मध्यकालीन गुजराती साहित्य**

इसवी सन १५०० ते १८५० पर्यंतच्या काळातील साहित्य हे मध्यकालीन साहित्य मानले जाते. या काळात गुजरातवर मुसलमानी राजसत्ता होती. राजकीय पारतंत्र्य आणि सामाजिक विस्कळीतपणा यामुळे या काळातील सामान्य जनतेचे जीवन शुष्क व आनंदहीन बनले होते. भक्तिकाव्य, ज्ञानवैराग्य काव्य, आख्यान-काव्य,

आणि पद्यवार्ता साहित्य अशा चार प्रकारची साहित्य निर्मिती या काळात प्रामुख्याने झाली.



नरसी मेहता

भक्तिकाव्यात नरसी मेहता हा गुजरातचा फार श्रेष्ठ कवी मानला जातो. १४८४ ते १५५० या काळात हा भक्तकवी होऊन गेला. जुनागड जवळील तलाजा गावात बडनगरा नागर ब्राह्मण कुळात याचा जन्म झाला होता. पित्याचे नाव कृष्णदास व मातेचे नाव दयाकुँवर होते. याच्या लहानपणीच माता-पिता स्वर्गवासी झाले. याचे पालनपोषण मोठ्या भावाने केले. लिहिण्या-वाचण्यात किंवा प्रापंचिक कामात याचे मन रमत नसे. साधू-सज्जनांच्या संगतीत हा हिंडत असे. याचे लग्न होऊन याला दोन मुलेही झाली होती. मुशाफिराप्रमाणे भटकत राहण्याच्या याच्या वृत्तीला अनुलक्षून याची भाबी एकदा याला झोंबेल असे बोलली. नरसी घराबाहेर पडला. एका ओसाड महादेवाच्या देवळात जाऊन बसला. सात दिवस निराहार आराधना करीत राहिला. महादेव प्रसन्न झाले. द्वारकेतल्या गोपीकृष्णाच्या रासलीलेचे दर्शन घडवले आणि तेव्हापासून हा प्रेममूर्ती भगवान श्रीकृष्णाचा अनन्य भक्त बनला. एकाहून एक सरस अशी भक्तीगीते नरसी मेहताने लिहिली.

गांधीजींचे 'वैष्णव जन तो तेणे कहिए, जे पीड पराइ जाणे रे' हे आवडते भजन नरसी मेहताचेच आहे.

गुजरातची दुसरी श्रेष्ठ भक्तकवयित्री म्हणजे संत मीराबाई होय. ही खरी तर राजस्थानची. तिने राजस्थानीत जशी रचना केली, तशी गुजराती भाषेतही केली आहे. ही जन्मली, वाढली राजस्थानात; परंतु जीवनाच्या अखेरीस द्वारकेस

आली होती. मिराबाईची सुमारे २५० पदे गुजरातीत प्रचलित आहेत. नरसी मेहताप्रमाणेच मिराबाईदेखील श्रीकृष्णाचीच उपासक होती.

भालण हा गुजराती आख्यान-काव्य लिहिणारा एक प्रख्यात कवी मानला जातो. १४३४ ते १५१४ या काळात हा पाटण येथे होऊन गेला. याला आख्यान काव्याचा जनकच मानतात. ध्रुवाख्यान, नलाख्यान, दुर्वासाख्यान दशमस्कंद आख्यान आदी भालणाची आख्यानरचना प्रसिद्ध आहे. लोक-प्रचलित कथा घेऊन आपल्या प्रतिभेने ती रंजक करून लोकांपुढे ठेवण्यात भालण वाकबगार होता. वात्सल्यरसाचे चित्रण करण्यात भालण अद्वितीय मानला जातो.

पद्मनाभ कवीचे 'कान्हडदे प्रबन्ध' हे आख्यानकाव्य ऐतिहासिक असून चार खंडात उपलब्ध आहे. भीम आणि केशवदास या कवींनी अनुक्रमे 'हरिलीला षोडषकला' आणि 'श्रीकृष्णालीला' नावाची आख्यानकाव्ये लिहिली. १४८० च्या सुमारास मांडणबंधारो नामक कवीने 'रामायण,' 'रुक्मागद' आणि 'प्रबोध बत्तीसी' ही काव्ये रचली.

भालण कवीच्या पश्चात विपुल संख्येने आख्यान काव्याची रचना करणारा बडोद्याचा नाकर नामक श्रीमंत वाणिक कवी होता. हा आपल्या ब्राह्मण मित्रासाठी आख्यान लिहीत असे. ती आख्याने ऐकवून त्याचे ब्राह्मण मित्र आपली उपजीविका चालवीत असत. 'चंद्रहासाख्यान', 'ओखाहारण', 'नलाख्यान' आणि महाभारताचा अनुवाद या याच्या प्रमुख रचना आहेत.

विष्णुदास आणि विश्वनाथ जानी या कवींनीही आख्यानकाव्ये लिहिली. परंतु १६३६ ते १७३४ या काळात झालेला प्रेमानंद हा समस्त गुजराती साहित्यातील सर्वश्रेष्ठ कवी आणि आख्यानकार मानला जातो. याच्यापूर्वी गुजराती भाषा तेवढी प्रतिष्ठा पावलेली नव्हती. 'अबे-तबे का सोलह आना, इकडम् तिकडम् का आठ आना, और शुं सा पैसा चार' अशी स्थिती होती. याचा अर्थ असा,– अबे-तबे (हिंदी) ची किंमत सोळा आणे होती. इकडम् तिकडम् (मराठी) ची किंमत आठ आणे होती. परंतु शुं सा (गुजराती) ची किंमत फक्त चार आणेच होती. गुजरातीची अशी शोचनीय दशा पाहून सहृदय प्रेमानंद चिंताग्रस्त बनला. त्याने प्रतिज्ञा केली की, 'जोपर्यंत गुजराती भाषा संस्कृत

भाषेच्यापुढे बरोबरीच्या नात्याने उभी राहणार नाही, तोपर्यंत मी पगडी घालणार नाही. ' याने लिहिलेल्या ' रोषदर्शिका सत्यभामाख्यान ' काव्यामध्ये याने हरीला प्रार्थना केली आहे की,

> **सांगोपांग सुरंग व्यंग अतिशे, धारो गिरा गुर्जरी,**
> **पादे पाद रसाल भूषणवती, थाओ सखी उपरी,**
> **जे गीर्वाण गिरा गणाय गणतां, ते स्थान ए ल्योवरी**
> **थाये श्रेष्ठ सह सखीजन थकी, ए आश पूरो हरि ।**

प्रेमानंदाचे कित्येक शिष्य होते आणि त्या सर्वांनींच गुजराती भाषेच्या उत्थानाचा मोठा सामूहिक प्रयत्न केला असे सांगतात.

प्रेमानंदाने लिहिलेल्या असंख्य आख्यानांपैकी, नलाख्यान, दशमस्कंद, सुदामाचरित्र, मामेरू, रणयज्ञ, ओखाहरण, ही काव्ये विशेष प्रसिद्ध आहेत. ' स्वर्गनिसरणी, ' ' विवेक वणजारो ', ' भ्रमर पचीसी ' इत्यादी त्याची काव्ये तत्त्वज्ञानप्रधान आहेत. रोषदर्शिका, सत्यभामाख्यान, पांचाली प्रसन्नाख्यान व तपसाख्यान, ही तीन नाटकेही प्रेमानंदाने लिहिली असे सांगतात. परंतु विद्वानांत त्याबद्दल दुमत आहे.

अखो किंवा अखाभगत हा गुजराती भक्तिवैराग्य काव्याचा प्रसिद्ध कवी १६१५ ते १६७४ या काळात होऊन गेला. हा जातीने सोनार होता. अहमदाबादमध्ये येऊन राहात होता. प्रामाणिक होता. काही काळ हा टाकसाळीचा प्रमुख होता. एकदा एका स्त्रीने याला हार बनविण्यासाठी सोने दिले. त्या स्त्रीला हा आपल्या सख्या बहिणीप्रमाणे मानत असे. आपल्या पदरचे काही सोने घालून याने सुंदर हार तयार केला. परंतु त्या स्त्रीच्या मनात संशय निर्माण झाला. परंतु तपासाअंती तिचा संशय दूर झाला. तिने जाऊन अखोला याबद्दल धन्यवाद दिले. परंतु तिने आधी अविश्वास प्रकट केला याचेच आखोला आतोनात दुःख झाले. टाकसाळीतल्या कर्मचाऱ्यांनीही याच्यावर एक खोटा आरोप ठेवला. पुढे हा निर्दोष आहे असे सिद्ध झाले. परंतु या क्षणभंगुर व अविश्वासी जगाबद्दल अखोच्या मनात विलक्षण विरक्ती उत्पन्न झाली. त्याने आपली हत्यारे एका विहिरीत फेकून दिली आणि आत्मशांतीसाठी घराबाहेर पडला. तो गोकुळ-

वृंदावन, काशी, येथे भटकला. नंतर ज्ञान मिळवून अहमदाबादला परत आला. त्याने शंकराचार्यांच्या वेदान्तदर्शनाचे सखोल अध्ययन केले. त्याने 'अखेगीता' आणि 'अनुभव बिंदु' ही दोन पुस्तके लिहिली. यात त्याने वेदान्तामधील गूढतत्त्वे सरळ सोप्या लोकभाषेत दिली आहेत.

प्रीतमदास, धीराभगत, निरांतभगत व भोजाभगत या कवींनीही या ज्ञानाश्रेयी शाखेत काव्यरचना केली आहे.

शामलभट्ट हा कवी १६९० ते १७६५ या कालखंडात होऊन गेला. हा प्रेमानंदाच्या समकालीन होता. परंतु प्रेमानंदाप्रमाणे आख्यानकाव्य न लिहिता याने 'पद्यवार्ता' ह्या प्रकारचे काव्य लिहिले. 'कह्यू कथे ते शानो कवि?' म्हणजे सांगितलेलीच कथा सांगणारा कवी कसला? असे म्हणून त्याने वेगळ्याच ढंगाने 'सिंहासनबत्तीशी, सूड वहो तेरी, पद्यावती, रुपावती, नंदबत्रीशी' इत्यादी कथा-काव्यांची सृष्टी निर्माण केली.

याशिवाय शाक्त संप्रदायातील कवी वल्लभ मेवाडो, स्वामी नारायण संप्रदायातील कवी मुक्तानंद, ब्रह्मानंद, प्रेमानंदस्वामी, निष्कुलानंद, देवानंद, यांच्याही विविध रचना प्रसिद्ध आहेत. मीराबाईशिवाय या काळात दिवालीबाई, राधाबाई, कृष्णाबाई, पुरीबाई आणि गौरीबाई या कवयित्रींनीही शेकडो पदे रचलेली आहेत.

७८५ च्या सुमारास अरबांच्या छळाला कंटाळून काही पारशी इराणमधून भारतात आले होते. सुरत जिल्ह्यातील संजाणच्या आसपास त्यांनी वस्ती केली होती. त्यांनी गुजराती भाषा आत्मसात केली. तसेच खालच्या वर्गातील हिंदू मुलीशी विवाह केले. शेती आणि दारू-विक्री हा त्यांचा मुख्य पेशा होता. प्राचीन गुजराती भाषेत किती तरी पारशी लेखकांनी पुस्तके लिहिली आहेत. काही पारशी धर्मगुरुंनी संस्कृतचे अध्ययन करून जेंद आणि पेहलवी भाषेतील कवितांचा संस्कृत आणि गुजराती भाषेत अनुवाद केला. वहेराम लक्ष्मीधरने १४५१ मध्ये 'अर्दे–विराफ–नामेंह' नावाचा ग्रंथ लिहिला. काही पारशी कवींनी गुजराती कवींप्रमाणेच आपल्या धर्मग्रंथातील आणि फिर्दौसीच्या शाहनामा यातील कथावस्तू घेऊन आख्याने लिहिली. सुरत येथील एखद रुस्तम पेशोतन यांनी 'जरथोश्त–नामेंह' आणि 'सियवक्ष–नामेंह' नावाची रचना केली. अशा प्रकारे आणखी काही चरित्रे (नामेंह) लिहिली.

दयाराम हा मध्यकालातील अखेरचा कवी मानला जातो. नर्मदेच्या काठी असलेल्या चाँदोद नावाच्या गावात १७६७ साली याचा जन्म झाला. जातीने हा सठोदरा नागर ब्राह्मण होता. दयाराम हा मोठा स्वाभिमानी कवी होता. व्यक्तीचे किंवा समाजाचे बंधन तो मानीत नसे. कृष्णाव्यतिरिक्त कुणापुढेही मस्तक नमण्यास तो तयार नसे. प्रेमानंद आणि शामल यांच्याप्रमाणेच दयारामनेही विपुल साहित्य रचना केली आहे. ‘ वल्लभनो – परिवार ’, ‘ रसिक वल्लभ ’, ‘ रास पंचाध्यायी ’, ‘ षड्‌ऋतुवर्णन ’ इत्यादी किती तरी ग्रंथ त्याने लिहिले आहेत. याने विविध गरबागीते देखील लिहिली आहेत. गर्ब्याला आकारसौष्टव आणि स्वरूपसौंदर्य दयारामने दिले. त्याच्या गर्ब्यात एक अनिर्वचनीय, मर्मस्पर्शी गोडवा व कोमलता आहे. दयारामची भाषा सूक्ष्मातिसूक्ष्म भाव कलात्मक रीतीने व्यक्त करण्यात समर्थ आहे.

**अर्वाचीन गुजराती साहित्य**

भारतात इंग्रजी सत्ता दृढमूल झाल्यावर गुजराती साहित्यातही एका नव्या युगाला प्रारंभ झाला ! इंग्रजी शिक्षणाने नवशिक्षितांची पिढी तयार होऊ लागली. इंग्रजी वाङ्मयाशी तिचा संबंध येऊ लागला. नव्या ज्ञानाबरोबर नव्या समाजसुधारणांची दृष्टीही रुजू लागली. समाजाला शिक्षित करण्यासाठी व जुन्या रूढी काढून नवीन सुधारणा घडवून आणण्यासाठी अनेक संस्था निघाल्या. काही नियतकालीकेही प्रसिद्ध होऊ लागली. ‘ मुंबई समाचार ’, ‘ बुद्धिप्रकाश, ’ ‘ सुरत समाचार, ’ ही त्यांतील काही प्रमुख होती. दलपतराम दायाभाई आणि नर्मदाशंकर लालशंकर दवे हे दोन प्रमुख कवी १८५० ते १८८५ या काळात झाले. दलपतराम यांनी विविध विपयांवर पद्यरचना केली. वर्णभेद, आंतरजातीय-विवाह, विधवा-विवाह, बालविवाह यांच्या विरोधी, तसेच अन्य सामाजिक विषयांवर यांनी कविता लिहिल्या. ‘ विजयक्षमा, ’ ‘ हंसकाव्यशतक, ’ ‘ हुन्नरखाननी चढाई, ’ ‘ गमार बावनी, ’ ‘ ऋतूवर्णन ’ ‘ संपलक्ष्मी संवाद, ’ ‘ जादवास्थली, ’ ‘ वेनचरित्र, ’ ‘ फार्बस विलास, ’ ‘ फार्बस विरह, ’ इत्यादी काव्ये त्यांनी लिहिली. शिवाय काही सरस गर्बागीते आणि ‘ लक्ष्मी नाटक ’ व ‘ मिथ्याभिमान नाटक ’ अशी दोन नाटकेही लिहिली.

नर्मदाशंकर लालशंकर दवे हे सुरतेचे नागर ब्राह्मण होते. ते वीर नर्मद या नावानेच अधिक प्रसिद्ध होते. स्वाभिमान, सत्यप्रियता न्याय, प्रेम, निर्भीकता इत्यादी वीर नर्मद कवींचे मुख्य गुण होते. ते मोठे जहाल सुधारक होते. त्यांनी १८५६ मध्ये विधवा-विवाह केला होता. त्यांच्यावर जातीबहिष्कार पडला होता. परंतु त्यांनी त्याची पर्वा न करता आपले सुधारणेचे व्रत चालू ठेवले.



नर्मदाशंकर

'पिंगल प्रकाश', 'अलंकार प्रवेश', 'रसप्रवेश', 'नायीका विषय प्रवेश' इत्यादी ग्रंथ त्यांनी लिहिले. मोठ्या परिश्रमाने 'नर्मकोष' नावाचा गुजराती भाषेचा कोष प्रकाशित केला. त्यांनी लिहिलेले निबंध 'नर्मगद्य' या नावाने आणि कविता 'नर्मकविता' या नावाने प्रसिद्ध आहेत. 'द्रौपती दर्शन,' 'रामजानकी दर्शन,' 'सार शकुंतल', 'सीताहरण' इत्यादी नाटके त्यांनी लिहिली. 'मारी हकिकत' नावाने त्यांनी आपले आत्मचरित्रही लिहिले आहे. 'राज्यरंग' नावाचा विश्वइतिहास व एक महाकाव्य लिहिण्याचाही प्रयत्न त्यांनी केला होता. 'जय जय गरवी गुजरात' या प्रसिद्ध गीताचे कवी नर्मदाशंकरच आहेत. अशा प्रकारे गद्य आणि पद्य या दोन्हीही गुजराती साहित्यक्षेत्रात एका नव्या युगाचा प्रारंभ करण्याचे श्रेय कवी नर्मदाशंकर दवे यांना दिले जाते.

याच कालात नवलराम लक्ष्मीराम पंड्या यांनी 'नवल ग्रंथावली' दोन भागात लिहिली. 'इंग्लंडनो इतिहास' नावाने यांनी प्रथम इंग्रजांचा इतिहास गुजरातीत लिहिला. फ्रेंच नाटककार मोलियर याच्या 'मॉक डॉक्टर' नाटकाचे

'भटनुं भोपाळुं' नावाने यांनी रूपांतर केले. या रूपांतरात त्यांनी गुजराती जीवन एवढ्या कौशल्याने चित्रित केले आहे, की हे रूपांतर आहे असे वाटतही नाही. 'वीरमती' नावाचे ऐतिहासिक नाटक व 'कवि जीवन' नावाने नर्मदाशंकरचे चरित्रही यांनी लिहिले आहे.

१८६७ पासून यांनी लिहिलेले प्रौढ समीक्षात्मक निबंध प्रसिद्ध होऊ लागले. त्यांच्या या निबंधापासून गुजराती साहित्यातही परंपरा रूढ झाली. यांच्यापूर्वी नर्मदांनी जरी काही आलोचनात्मक निबंध लिहिले असले तरीसुद्धा शास्त्रीय पद्धतीनुसार साहित्यसमीक्षा करण्याचा प्रारंभ नवलराम यांनीच केला. त्यांनी संस्कृत व इंग्रजी समीक्षेचे उत्कृष्ट अध्ययन केलेले होते. 'काव्यशास्त्र संबंधी विचारो', 'मनना विचारो', 'हास्य अने अद्भुत रस', 'देशी पिंगळ' आदी यांनी लिहिलेले समीक्षाशास्त्रावरील निबंध प्रसिद्ध आहेत. नवलराम समीक्षक, विचारवंत पंडित, कवी, नाटककार जसे होते, तसेच ते कट्टर समाजसुधारकही होते. यांची 'बाल लग्न बत्रीशी' आणि 'बालगरबावली' नावाची दोन पुस्तके समाजसुधारणेविषयीचीच आहेत. त्यांच्या उपहासात्मक विनोदी टीकेचा मासला म्हणून एक मजेशीर वाक्य सांगता येईल. लल्लू नावाच्या एका अयशस्वी नाटककाराला ते कविता लिहिण्याची सूचना देत आहेत– 'भाई लल्लू ने म्हारी सवाल छै के नाटक फाटक न चेटक छोडि छूटक कविता लखे.'

नंदशंकर तुळजाशंकर मेहता हे सुरतेचे लेखक. शिक्षण–विभागातील रसेल नावाच्या इंग्रजी साहेबाच्या प्रेरणेने यांनी 'करणघेलो' नावाची पहिली गुजराती ऐतिहासिक कादंबरी लिहिली. गुजरातमध्ये त्याकाळी ती फार लोकप्रिय ठरली आणि मराठीतही तिचा अनुवाद झाला 'करणघेला' हा गुजरातचा अखेरचा हिंदू राजा होता. याचे अनुकरण होऊन गुजरातीत 'राजकदेवी', 'वनराज चावडा', 'सधराजेसंग' इत्यादी ऐतिहासिक व्यक्तींवर कादंबरी लेखन झाले.

भोलानाथ साराभाई दिवेटिया यांची तुकारामाच्या धरतीवरील 'अभंग माला', महीपतराय नीळकंठ यांचे 'सास बहूनी लडाई' हे नाटक व 'भवाई' हा लोकनाट्याचा संग्रह, रणछोडभाई उदयराम कृत 'ललिता दुःख दर्शक', 'जयकुमारी विजय', 'नल-दमयंती', 'तारामती' इत्यादी सामाजिक व पौराणिक नाटके, करसनदास मूलजींनी लिहिलेले 'इंग्लंड मां प्रवास' हे प्रवासवर्णन हरगोविंददास कांटावाला यांनी लिहिलेल्या 'अंधेरी नगरी नो गंधर्वसेन' व 'त्रे

बहनो' ह्या गोष्टी आदी या अर्वाचीन काळाच्या प्रारंभीचे गुजराती साहित्य प्रसिद्ध आहे. याच काळात 'गुजराती भाषा नो इतिहास' हा ग्रंथ व्रजलाल शास्त्रींनी लिहिला आहे.

१८८५ पासून १९२० पर्यंत गुजराती-साहित्यातील दुसरा कालखंड मानला जातो. या कालखंडात गोवर्धनराम, मणिलाल, नरसिंहराव आणि न्हानालाल आदी साहित्यिकांनी प्राचीन व अर्वाचीन काळच्या संगमस्थानी उभे राहून दोन्हींचा समन्वय घडवून आणण्याचा यत्न केला.

गोवर्धनराम यांची 'सरस्वतीचंद्र' ही कादंबरी ('नवलकथा) गुजराती साहित्यातील एक अद्वितीय कलाकृती मानली जाते. 'स्नेहमुद्रा' हे त्यांनी लिहिलेले एक दीर्घ काव्य आहे. गोवर्धनराम यांचे लेखन लोककल्याणाच्या भावनेने ओतप्रोत आहे.

मणिलाल नभुभाई द्विवेदी यांनी अल्पायुष्यात 'आत्म निमज्जन', 'कान्ता' इत्यादी सात-आठ कवितांची पुस्तके लिहिली. यांचा वेदान्त तत्त्वज्ञानाचा गाढा अभ्यास होता. 'सुदर्शन गद्यावली' हा त्यांच्या निबंधांचा संग्रह प्रसिद्ध आहे.

बालाशंकर उल्लासराम कंथारिया या कवींनी फारशीतील हाफिज ढंगाची गुजराती कविता लिहिली. 'क्लांत कवि' नामक संग्रहात संस्कृत साहित्याच्या धर्तीवर ऋतुवर्णन, शृंगार क्रीडा आणि अलंकारांची चमत्कृती आहे.

नरसिंहराव भोलानाथ दिवेटिया हे एक अध्ययनशील, सुस्पष्ट विचारांचे व सूक्ष्म दृष्टी असलेले साहित्यिक होते. गांधीजींनीही यांचा साहित्यिक म्हणून सन्मान केला होता; आणि आचार्य काका कालेलकरांनी तर यांना 'गुजराती साहित्यातील भीष्म पितामह' म्हणून गौरविले आहे. हे कवी, भाषाशास्त्री, विवेचक व संस्मरण लेखक होते. 'पद्य-कुसुममाला', 'हृदयवीणा', 'नूपुर झंकार', 'स्मरण संहिता', 'बुद्धचरित' इत्यादी काव्याची व 'मनोमुकुर', 'स्मरणमुकुर', 'विवर्तलीला',- ही यांची गद्य साहित्य संपदा प्रसिद्ध आहे. इंग्रजीत लिहिलेला 'गुजराती भाषा आणि साहित्य' हा ग्रंथ दोन भागात प्रसिद्ध आहे. नरसिंहरावांच्या 'कुसुम माळे' पासून गुजराती कवितेतील नव्या युगाचा प्रारंभ होतो. विषय, भाव आणि प्रकटीकरण यात ही नवीनता दिसून येते. नर्मद कवीने गुजरातीत नवीन काव्याचा प्रारंभ केला, पण नरसिंहरावांनी आपल्या प्रतिभेने तिला प्रगल्भ स्वरूप दिले. एका

समीक्षकाने म्हटले आहे, " गुजराती काव्य शकुंतलेचा पिता विश्वामित्र-नर्मद असले तरी कण्व-नरसिंहराव आहेत. "

केशवलाल हर्षदराय ध्रुव ' वनमाळी ' हे प्रामुख्याने प्राचीन साहित्याचे संशोधक व अनुवादक होते. यांनी ' मुद्राराक्षस ', ' विक्रमोर्वशीय ', ' गीतगोविंद ', ' अमरुशतक ' व भासाच्या आणि हर्षाच्या संस्कृत नाटकांची गुजरातीत उत्तम भाषांतरे केलेली आहेत. त्याशिवाय काही टीका-निबंध व कविताही लिहिल्या आहेत. गुजराती भाषेचे पंडित म्हणून यांची ख्याती होती.

सर रमणभाई नीलकंठ ' मकरंद ' हे प्रसिद्ध समाजसुधारक होते. प्रार्थना समाजाच्या मार्फत प्रसिद्ध होणाऱ्या ' ज्ञानसुधा ' मासिकाचे संपादक होते, 'भद्रं भद्र' ( कादंबरी ), ' राईनो पर्वत ' ( नाटक ), ' हास्यमंदिर ' ( निबंध ), व कविता ने साहित्य ' ( समीक्षा ) ही त्यांची ग्रंथसंपदा प्रसिद्ध आहे.

मणिशंकर रत्नजी भट्ट ' कान्त ' यांना कवी, विचारवंत व शिक्षक म्हणून गुजराती साहित्यात महत्त्वपूर्ण स्थान होते. ' पूर्वालाप ' हा कविता संग्रह व ' रोमन स्वराज्य ' आणि ' गुरुगोविंदसिंह ' ही दोन नाटके प्रसिद्ध आहेत. याशिवाय ' शिक्षण नो इतिहास,' व ' इजिप्त नो इतिहास ' यांनी लिहिले असून स्वीडनबर्ग, टागोर, ॲरिस्टॉटल, प्लेटो आदींच्या साहित्याचा गुजरातीत अनुवाद केला आहे.

सूरसिंहजी तख्तसिंहजी गोहेल ' कलापी ' हे सौराष्ट्रातील लाठी नावाच्या संस्थानचे राजा होते; पण प्रतिभाशाली कवीही होते. ' कलापीनो केकारो ' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे. शिवाय ' काश्मीरनो प्रवास ' हे प्रवास-वर्णन, ' माला अने मुद्रिका ' व ' नारी हृदय ' ह्या कादंबऱ्या आणि ' कलापीना पत्रो ' हा चिंतन-प्रधान पत्रसंग्रह ही पुस्तके प्रसिद्ध आहेत. कलापींनी उत्कृष्ट गजला लिहिल्या आहेत. त्यामुळे ते गुजरातचे लाडके प्रेमकवी बनले. ही थोडी वानगी पहा—

**ज्यां ज्यां नझर मारी ठरे यादी भरी त्यां आपनी।**
**आंसू मही ए आंखभी यादी झरे छे आपनी ॥**

जिथे जिथे माझी दृष्टी पडते तिथे तिथे मला तुमचे स्मरण होते. डोळ्यांतून अश्रू गळत असते, तर त्यांतूनही तुमचेच स्मरण झिरपले असते.

न्हानालाल दलपतराम ऊर्फ कवी ' प्रेमभक्ती ' यांना वडिलोपार्जित प्रतिभा लाभली होती. न्हानालाल यांना अर्वाचीन गुजराती साहित्यात ' महाकवी ' मानले



१६७७१०

जाते. १९२० च्या असहकारितेच्या लढ्यात यांनी भाग घेतला होता. न्हानालाल यांनी विपुल साहित्यरचना केली. केटलाक काव्यो, राजसूत्रोनी काव्य त्रिपुरी, वसंतोत्सव, चित्रदर्शनो, गीतमंजरी, ओज अने अगर, नाना-नाना रास, हे स्फुट कवितांचे संग्रह, 'कुरुक्षेत्र' हे महाकाव्य, इन्दुकुमार, जयाजयंत, राजर्षि भरत, विश्वगीत, जहांगीर-नूरजहाँ, शाहंशाह अकबर व संघमित्रा ही नाटके, उषा नामक कादंबरी व साहित्यमंथन, उद्‌बोधन, संसार मंथन आणि अर्धशताब्दिना बे बोलो हे निबंध आणि भाषण संग्रह एवढी ग्रंथनिर्मिती त्यांनी केली. या महाकवीने प्रणय आणि परिणय यांचे आदर्श गुजराती साहित्यात प्रस्तुत केले आहेत. यांनी लिहिलेली सुमारे २०० गरबागीते प्रसिद्ध असून शब्द, अर्थ आणि संगीत यांचा सुभग समन्वय त्यांत झालेला आहे. न्हानालाल हे गुजरातचे अत्यंत लोकप्रिय कवी होते. १९४४ साली यांचा देहांत झाला.

आनंद शंकर बापूभाई ध्रुव हे एक विद्वान लेखक होते. आपणो धर्म, काव्य-तत्त्व–विचार, साहित्य–विचार आणि विचारमाधुरी हे त्यांचे लेखसंग्रह प्रसिद्ध आहेत.

अरदेशर फरामजी खबरदार 'अदल' या पारशी लेखकांनीही आपल्या पारशी-गुजराती भाषेत ग्रंथ रचना केली आहे. विलसिका, प्रकाशिका, भारनो टंकार, संदेशिका, कलिका, इत्यादी कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत.


दामोदर खुशालदास बोटादकर या कवीचे कल्लोलिनी, श्रोतस्विनी, निर्झरिणी, रास तरंगिणी व शैवलिनी हे पाच काव्यसंग्रह प्रकाशित झालेले आहेत.

याशिवाय जन्मशंकर महाशंकर बूच 'ललित' व बलवंतराय कल्याणराय ठाकोर 'सेहेनी' या साहित्यिकांचीही काव्य, नाटक आदी ललितग्रंथ प्रसिद्ध आहेत.

यापुढील अर्वाचीन गुजराती साहित्य गांधी-युगातील, म्हणजेच १९२० च्या पुढचे आहे. गांधीवादाखेरीज समाजवाद आणि साम्यवाद या विचार-सरणींचा प्रभावही या काळातील गुजराती साहित्यावर पडलेला आहे. गांधी युगातील साहित्य सामान्य माणसाच्या जवळ आले. गांधीयुगातील कवी आणि लेखक जीवनातील कठोर वास्तवतेकडे धिटाईने वळले आणि विश्वबंधुत्वाची व विश्वैक्याची गीते त्यांनी गायली. सुंदरम् यांची 'कोया भगतनी कडवी वाणी' व

उमाशंकर जोषी यांची ' विश्वशांती ' या काव्याने गांधी-युगातील कवितेचा प्रारंभ होतो.

मोहनदास करमचंद गांधी यांनीही आपल्या साध्यासाठी साहित्य हे साधन म्हणून वापरले आहे. गांधीजींनी हिंदी, इंग्रजी व गुजराती भाषेत लेखन केले आहे. ' सत्य का प्रयोग अथवा आत्मकथा ' हा गांधीजींचा आत्मचरित्रपर ग्रंथ म्हणजे गुजराती भाषेचे अमोल लेणेच आहे. अनासक्तियोग, आश्रमवासी प्रत्ये आश्रम जीवन, आश्रमकी बहनोंके लिए, गीताबोध इत्यादी किती तरी वैचारिक साहित्य गांधीजींनी लिहिले आहे. ' नवजीवन ' या गुजराती साप्ताहिकातून त्यांनी विविध विषयांवर विपुल लेखन केलेले आहे. त्यांनी गुजराती गद्याला एक नवीन शक्तीच दिली. गांधीजींची शैली सरळ आणि सुबोध आहे. त्यांच्या आत्मकथेची जगभर अनेक भाषांतून भाषांतरे झालेली आहेत.



मोहनदास करमचंद गांधी

गांधीजींच्या विचारांनी व राष्ट्रीय अंदोलनांनी प्रभावित झालेल्या कितीतरी लेखकांना नवीन प्रेरणा मिळाली. गुजरातीतच नव्हे तर प्रत्येक भारतीय भाषेत गांधी-युगाची प्रतिमा उमटलेली आहे.

दत्तात्रेय बालकृष्ण कालेलकर उर्फ आचार्य काका कालेलकर हे जन्माने महाराष्ट्रीय, मराठीतील अव्वल दर्जाचे श्रेष्ठ साहित्यिक, परंतु काकांनी गुजराती भाषेतही मातृभाषेइतक्याच सहजतेने विपुल लेखन केलेले आहे.

गांधीवादी लेखकांमध्ये काकासाहेबांचे स्थान मोठे आहे. ' हिमालयनो प्रवास, स्मरण यात्रा, लोकमाता, जीवनी नो आनंद, जीवन संस्कृती, जीवन विकास,



काकासाहेब कालेलकर

जीवन भारती, पूर्व आफ्रिका मां आणि ओतराती दिवालो,' इत्यादी त्यांची गुजराती रचना फार प्रसिद्ध आहे. गुजराती निबंध-साहित्य, प्रवास-साहित्य, आत्मकथा, आणि गुजराती गद्य शैली यांच्या विकासात काकांनी महत्त्वाची कामगिरी बजावलेली आहे.

किशोरलाल मशरूवाला, महादेवभाई देसाई, या थोर गांधीवादी नेत्यांनीही गुजराती वैचारिक साहित्यात मोलाची भर घातलेली आहे.

कन्हैयालाल मणिकलाल मुन्शी यांनी राजकारण, साहित्य आणि शिक्षण या तिन्ही क्षेत्रांत वैशिष्ट्यपूर्ण कामगिरी केलेली आहे. राजकारणात राहूनही मुन्शींनी गुजरातीचे एक श्रेष्ठ कादंबरी कार म्हणून लौकिक कमावला. १९१३–१४ साली 'वरनी वसुलात' नावाची त्यांची पहिली कादंबरी प्रसिद्ध झाली. कथा नवीन, विषय नवीन, पात्रे नवीन, संवादपद्धती आणि नवीन जोश घेऊनच ते गुजराती

साहित्याच्या मैदानात उतरले. त्यानंतर 'पाटणनी प्रभुता, गुजरातनो नाथ, राजाधिराज, जय सोमनाथ, आणि पृथ्वीवल्लभ,' ह्या एकाहून एक सरस अशा ऐतिहासिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. किसका दोष, स्वप्नद्रष्टा व तपस्विनी या त्यांच्या आणखी सामाजिक कादंबऱ्या आहेत.



कन्हैयालाल मुन्शी

मुन्शींनी सामाजिक आणि पौराणिक नाटकेही लिहिली. सामाजिक नाटकांमधून आधुनिक समाजातील दंभावर कठोर टीका केलेली आहे. काकानी शशी, ब्रह्मचर्याश्रम, बे खराब जण, पीडाग्रस्त प्रोफेसर इत्यादी त्यांची नाटके आहेत. आधेरास्ते, सीधीचढान, मेरी अनुत्तरदायित्वपूर्ण कहानी, शिशू और सखी इत्यादींमधून मुन्शींनी कलात्मक रीतीने आत्मचरित्रपर लेखन केलेले आहे. याशिवाय त्यांनी समीक्षा-लेखन व चरित्रलेखनही केले आहे.

अर्वाचीन गुजराती साहित्यात कन्हैयालाल मुन्शीसारखा प्रतिभाशाली कादंबरीकार व नाटककार सापडणे कठीण आहे. गुजरातीमधील ऐतिहासिक कादंबरीला मुन्शींनी प्रतिष्ठा मिळवून दिली.

रमणलाल वसंतलाल देसाई यांनी आधुनिक गुजराती जीवनातील मंगलमय भागाचे चित्रण केले. गांधींच्या प्रभावाखालील हे एक लेखक होते. 'पूर्णिमा' ही सत्याग्रह युगातील करुण बलिदानकथा आहे. 'ग्रामलक्ष्मी' मध्ये ग्रामसेवेचा आदर्श आहे. 'भारेलो अग्नि' मध्ये गांधीजींच्या सत्य, अहिंसा आदी विचारांचे चित्रण आहे. अशा प्रकारे आपल्या साहित्याच्या द्वारे गांधीजींचे विचार यांनी जनमानसापर्यंत पोहोचवले आहेत. 'गांधी युगातील वर्तमान जीवनाचा पहिला

सफल कादंबरीकार' असे गौरवशाली उद्गार रमणलाल देसाई यांच्याविषयी समीक्षकांनी काढले आहेत.

गौरीशंकर गोवर्धनराय जोशी हे 'धूमकेतु' या नावानेच प्रसिद्ध आहेत. कादंबरी, कथा, नाटक, निबंध, प्रवासवर्णन, आदी विविध तऱ्हेचे साहित्य यांनी लिहिले आहे. परंतु कथाकार म्हणून यांची विशेष प्रसिद्धी आहे. तणखा, अवशेष प्रदीप, आकाशदीप, मेघबिंदू, परिशेष, अनामिका, बनछाया, ज्ञानगोष्टियाँ इत्यादी यांचे कथासंग्रह प्रसिद्ध आहेत. राजमुकुट, पृथ्वीश, मल्लिका, पराजय, या यांच्या सामाजिक कादंबऱ्या असून चौलादेवी, राजसंन्यासी, कर्णवती, जयसिंह सिद्धराज, गुर्जरेश्वर, कुमार पाल, नाईकादेवी इत्यादी ऐतिहासिक कादंबऱ्याही प्रसिद्ध आहेत.

झवेरचंद मेघाणी यांनी गुजराती लोकसाहित्याचे संशोधन आणि संपादन विशेष परिश्रम घेऊन केलेले आहे. युगवंदना, एकतारो हे काव्यसंग्रह, सोरठ, गुजरात नो जय, ह्या कादंबऱ्या, मेघाणींचे 'नवलिका ओ या कथा' आणि सहा भागात प्रसिद्ध असलेले 'सौराष्ट्र नी रसधार' तसेच चुंदडी, सोरठी संतो, धर्तीनुधावण, इत्यादी लोकसाहित्याचे खंड उपलब्ध आहेत.

रामनारायण पाठक, चुनीलाल शहा, श्रीमती लीलावती मुन्शी, गुणवंतराय आचार्य आदी लेखकांनीही गुजराती साहित्यात आपल्या कलाकृतींनी मोलाची भर टाकलेली आहे.

गुलाबदार ब्रोकर हे आजच्या गुजरातीमधील आघाडीचे कथालेखक आहेत. लता अने बीजी बातो, वसंधरा आने बीजी बातो, उमींवाटे, इत्यादी त्यांचे कथासंग्रह फार लोकप्रिय ठरलेले आहेत. सुशिक्षित नागर जीवनातील कथा-विषय यांनी निवडलेले आहेत. यांच्या काही कथा मनोविश्लेशणात्मकही आहेत.

पन्नालाल पटेल यांनी गुजराती ग्रामीण जीवन आपल्या कथा-कादंबऱ्यांतून चित्रित केले आहे. ग्रामलक्ष्मी, मानवीनीभवाई, वलामण इत्यादी त्यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय आहेत.

ईश्वर पेटलीकर यांनीही ग्रामीण जीवन आपल्या कथा-कादंबऱ्यांतून रेखाटले आहे. जनमटीप, मारीहैयासगडी, या कादंबऱ्या आणि लोहिनी सगाई, काशीनुं करवत, इ. गद्यसंग्रह लोकप्रिय आहेत.

चुनीलाल मडीलाल हे नवीन कल्पनारम्य साहित्यातील एक महत्त्वपूर्ण कथा-

कार आणि नाटककार आहेत. पावकज्वाला, व्याज नो वारस, पद्मजा, इत्यादी कथा-संग्रह आणि रंगदा, हूँ, आणि मारीवहू ही यांची नाटके प्रसिद्ध आहेत.

सुरेश जोशी हे गुजरातीमधील कवी, टीकाकार, आणि प्रयोगशील कथाकार आहेत. यांच्या प्रतिकात्मक शैलीने गुजराती साहित्यरसिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. गुजराती कथेला यांनी एक वेगळेच वळण दिले आहे.

त्रिभुवनदास 'सुंदरम्', उमाशंकर जोशी, चंद्रवदन मेहता, पूजालाल दलवाडी, करसनदास माणेक, झीणाबाई देसाई 'स्नेहरश्मी', सुंदरजी बेटाई, मनसुखलाल झवेरी इत्यादी कवींनी अलिकडील गुजराती कविता खूपच समृद्ध केलेली आहे. उमाशंकर जोषी यांना आजच्या गुजराती कवितेत मानाचे स्थान आहे. विश्वशांती नंतर 'गंगोली', 'गुलेपोलांड', 'निशीथ', 'प्राचीन', 'आतिथ्य', आणि 'वसंतवर्षा' इत्यादी यांचे काव्यसंग्रह लोकप्रिय आहेत. काव्याशिवाय यांनी कथा, कादंबरी, समीक्षा, इत्यादी प्रकारचे लेखनही केले आहे. परंतु एक सफल, प्रतिभाशाली कवी म्हणूनच यांची ख्याती आहे. 'संस्कृती' नावाचे एक दर्जेदार मासिकही हे संपादित करतात. गुजरात विद्यापीठाचे उपकुलगुरू व भारतीय ज्ञानपीठाचे पारितोषिक विजेते म्हणूनही यांचा गौरव झालेला आहे.



उमाशंकर जोषी

गुजराती भाषेत विनोदी वाङ्मयही बरेच लिहिले जाते. हलके फुलके निबंध, हास्यकथा, विनोदी नाटके व एकांकिका इत्यादी प्रकार ज्योतींद्र दवे, चीनुभाई पटवा, दामु सांगाणी, जयंती दलाल, नटवरलाल बूच, हैदरअली जीवाणी, बकुल त्रिपाठी, प्रियदर्शी, रमेश भट्ट, दिनकर देसाई, चुनीलाल मडिया, इत्यादी विनोद-

कारांनी आपल्या विविध प्रकारच्या विनोदी साहित्याने गुजराती साहित्य खुसखुशीत व हास्यनिर्भर बनवले आहे.

परभाषेतील साहित्याचे अनुवाद पुष्कळच झाले आहेत. मराठीमधील वि. स. खांडेकरांच्या कादंबऱ्या, आचार्य अत्र्यांची नाटके, सानेगुरुजींच्या गोष्टी गुजरातीत फारच लोकप्रिय ठरल्या आहेत.

गुजरातीमधील बालवाङ्मयाचे दालनही भरपूर समृद्ध आहे. गिजुभाई रमणलाल सोनी, रमणलाल शाह, हरीश नायक आदी लेखकांनी मुलांसाठी कथा, कविता, नाटके आदी विविध प्रकारचे लेखन केलेले आहे. श्री. जीवनराम जोशी यांनी एकट्यांनीच सुमारे ३०० पुस्तके बाळांसाठी मोठ्या निष्ठेने लिहिली आहेत. 'रमकडू' 'बालमित्र', 'जगमग' या नावांची मुलांची मासिके बालजगतात फार प्रसिद्ध आहेत.

नव्या जमान्यात नव्या प्रेरणा घेऊन तडफेने लिहिणाऱ्या लेखकांत राजेंद्र शाह, निरंजन भगत, बाळमुकुंद दवे, उशनस्, जयंत पाठक, प्रियकांत मणियार इत्यादी अग्रेसर आहेत. नव्या कवींमध्ये हरींद्र दवे, सुरेश दलाल, त्रिभुवन व्यास, हासिन बूच, लालशंकर ठाकर, आदिल मन्सुरी आदी प्रमुख आहेत. नव्या प्रतिमांनी नवीन आशय प्रकट करण्याची प्रयोगशीलता गुजराती तरुण साहित्यिकांतही आढळते.

साहित्याच्या अभिवृद्धीसाठी 'गुजराती साहित्य परिषद' ही संस्था १९०५ पासून कार्यशील आहे. रणजीत बाबाभाई मेहता यांनी त्या वेळी ही संस्था स्थापन केली. गोवर्धनराम त्रिपाठी, कन्हैयालाल मुन्शी यांच्यासारख्या साहित्यश्रेष्ठींनी ही संस्था वाढवली. १९३६ साली परिषदेचे वार्षिक अधिवेशन अहमदाबाद येथे झाले. त्याचे अध्यक्षस्थान म. गांधींनी विभूषित केले होते.

या परिषदेशिवाय 'गुजरात विद्या सभा', 'फार्बस साहित्य सभा', 'गुजरात साहित्य सभा', सुरत येथील 'नर्मद सभा', व बडोदा येथील 'प्रेमानंद सभा' या संस्थाही साहित्य प्रसाराचे काम निष्ठेने करीत आहेत.

'अखंड आनंद', 'नवनीत', 'संस्कृती', 'रुचि', 'जीवन प्रकाश' 'बीज' इत्यादी वाङ्मयीन नियतकालिके व 'जन्मभूमी' आदी दैनिके गुजरातीमध्ये निरंतर प्रसिद्ध होत आहेत. गुजराती वृत्तपत्र सृष्टीही तेजस्वी व टवटवीत आहे.

□ □

# कलाप्रिय गुजरात

गुजराती माणूस म्हटला म्हणजे तो ' दियो-ल्यियो ' करणारा सटोडिया व्यापारीच असणार व सदैव तो हिशेब ठिशेबाच्या वह्याच वर-खाली करत बसलेला दिसणार, अशी अन्य प्रांतीय लोकांची गैरसमजूत असते. गुजरात हा प्रामुख्याने वणिक वृत्तीचा आहे हे जरी खरे असले, तरी तो जीवनातील सर्व आनंद मनमुराद लुटणारा रसिक व कलाप्रियदेखील आहे. निरनिराळ्या ललितकलांची आणि हस्तकलांची जपणूक गुजरातमध्ये प्राचीन काळापासून होत आहे. दिवसेंदिवस त्यांत नवनवीन भर पडत आहे, आणि त्यांचा विकासही होत आहे. विविध विकासशील कलांची समृद्ध दालने पाहिली म्हणजे गुजरातच्या अव्वल रसिकतेची व कलासक्त मनाची ओळख पटते.

**संगीत**

गुजरातने शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात प्राचीन काळापासूनच उल्लेखनीय कामगिरी केली आहे. गुजरातमधील सोळंकी वंशातील राजा अजयपाल आणि सोमराज यांच्या काळी ' संगीत रत्नावली ' नामक पुस्तक लिहिले असा उल्लेख मिळतो. चालुक्य राजा तिसरा सोमेश्वर याच्या काळातील ' अमिलसितार्थ चिंतामणी ' अथवा ' मानसोल्लास ' ग्रंथात संगीतावर दोन प्रकरणे लिहिलेली आहेत.

सोळंकी युगातील जयसिंह सिद्धराज याची कारकीर्द सुवर्णकाळ मानली जाते. या काळात अन्य कलांप्रमाणेच संगीतालाही खूपच उत्तेजन मिळाले होते. कुमारपाल राजानंतरच्या काळातील राजा हरिपाल हा बराच काळ दक्षिणेत जाऊन राहिला होता. तेथे त्याने ' संगीत सुधाकर ' नावाचा ग्रंथ तामिळ भाषेत लिहिला. तसेच संगीत रत्नाकरावर टीकाग्रंथही लिहिला, एवढा तो विद्वान, संगीतशास्त्री होता. गुजरातच्या एका राजाने तामिळ भाषेत संगीतावर ग्रंथ लिहिला हे एक विशेषच होय !

कल्याणीचा राजा जगदेव मल्ले याने 'संगीत चुडामणी' नावाचा ग्रंथ लिहिल्याचा उल्लेख आढळतो.

गुजरातने धार्मिक संगीताचीही जोपासना आस्थापूर्वक केलेली आहे. शैव, वैष्णव, जैन, स्वामीनारायण, शक्ती इत्यादी पंथांची मंदिरे होती. या मंदिरांतून कीर्तनपद्धती रूढ होती. पृष्टीमार्ग संप्रदायाचे आद्य संस्थापक श्री. वल्लभाचार्य यांनी वैष्णव मताचा प्रचार जनतेत करण्यासाठी श्रीकृष्णाच्या बालस्वरूपाची उपासना रूढ केली. त्यासाठी त्यांनी संगीताला महत्त्वाचे स्थान दिले. अन्य संप्रदायांतही संगीताचार्य होते आणि त्यांनीही कीर्तने रूढ केली. ही प्रथा फारच लोकप्रिय ठरली आणि आजही ती प्रचलित आहे. ही कीर्तने ध्रुपद शैलीत होती आणि ताल पण त्या शैलीला अनुरूप होता. जिथे जिथे मंदिर होते, त्या त्या ठिकाणी शास्त्रीय संगीताची उपासना अशा प्रकारे चालू असे. भक्ती आणि संगीत यांचे नाते जवळचे आहे. भक्तीमध्ये संगीताची आणि संगीतात भक्तिरसाची तल्लीनता माणसाला उदात्त भूमिकेवर नेते. भक्तांनी तेथे संगीताला मोक्षाचे साधन मानले आहे. भक्ति-प्रधान गुजरातचा आद्यकवी, भक्त आणि संगीतकार नरसी मेहता हा याचे साक्षात स्वरूपच आहे. तो स्वतः उत्कृष्ट संगीतकार होता. त्याने रचलेल्या 'प्रभाती' म्हणजे भूपाळ्या हे गुजरातीचे अमोल धन आहे.

त्यानंतर गुजराती भक्तिसंगीत समृद्ध केले संत मीराबाईने. ती उत्कृष्ट कवयित्री जशी होती तशीच निपुण संगीतकारही होती. मीरेच्या रसमय भजनांची गोडी आजही अवीट आहे.

वैजनाथदास अथवा 'बैजू' हा संगीतकार चांपानेरचा निवासी होता. त्याची संगीतसाधना अजबच होती! तो आपल्या तंद्रीत एवढा धुंद असे की, अन्य कशाचेही भान त्याला नसे. म्हणून लोक त्याला 'बावरा' म्हणू लागले. 'संगीत ओकदेशा' नावाचा ग्रंथ बैजू बावराने लिहिला. शिवाय त्याने अन्य शेकडो धृपदे रचली. त्याचा स्वभाव सरळ, साधा, दयाळू, निरभिमानी आणि भक्तिपूर्ण होता. धृपद-गायनपद्धती रूढ करणारा ग्वाल्हेरचा राजा मानसिंह याच्या संगीत कर्तबगारीत बैजूचाही मोठा हिस्सा होता.

भारताच्या संगीतामध्ये मोगलकाळ हा सुवर्णकाळ होता. या काळात एकाहून एक श्रेष्ठ असे संगीतकार निर्माण झाले. त्याचा परिणाम गुजरातवरही झाला होता. वडनगरचे राज्य त्या काळी मोठे संस्कृतिकेंद्र होते. मोठमोठे पंडित,

कलाकार, संगीतकार तेथे नांदत होते. दीपराग गायल्यानंतर तानसेनाच्या शरीराचा जो दाह झाला तो वडनगरच्या 'ताना आणि रीरी' नावाच्या दोन ग्रामकन्यांनी मेघमल्हार गाऊन शांत केला अशी आख्यायिका प्रचलित आहे.

त्यानंतरच्या काळात जामनेरचा राजा छत्रसाल याच्या दरबारी असलेला कलाकार पं. श्रीकंठ याने लिहिलेल्या 'रसकौमुदी' ग्रंथात संगीताचा ऊहापोह केलेला आहे.

पुढील काळात भेटतो कवि प्रेमानंद. 'माणभट्ट' नावाची संगीतशैली याने रूढ केली. तो स्वतः कवी होता. निरनिराळ्या रागात तो आख्यानांची रचना करीत असे आणि ती माणाच्या म्हणजे गागराच्या तालावर गाऊन दाखवत असे. श्रोते तल्लीन होऊन जात असत.

रससिद्ध कवी दयाराम यांनी भिन्न भिन्न रागात अनेक गीते रचली. त्यांनी लिहिलेली गरबागीते गुजराती संगीताचा एक प्रकार म्हणून मान्यता पावली आहेत. तंबोऱ्याच्या साथीवर शास्त्रीय गाण्याची ते उत्तम मैफिल रंगवीत असत.

जुनागडचे आदितराम यांना 'संगीतादित्य' ही पदवीच लाभलेली होती. सौराष्ट्रातील नथुराम सुंदरजी मोठे गायक होते. पं. मुळजीभाई जेठाराम ह्या भावनगरच्या संगीतकारांनी 'संगीत चिंतामणी' नावाचे पुस्तक लिहिले आहे. संगीताचार्य डाह्याभाई शिवराम यांनी 'संगीत कलाधर' नावाचा लिहिलेला ग्रंथ म्हणजे संगीतावरील महाभारत मानला जातो.

बडोदा संस्थानात संगीताला चांगला राजाश्रय मिळाला. नोटेशन पद्धती, संगीतशाळा, विद्यालयात संगीताचे शिक्षण हे प्रथम बडोद्यातच सुरू झाले. १९१५ मध्ये अखिल भारतीय संगीत परिषद भरवण्याचा मान बडोद्यानेच पटकावला होता.

अलिकडल्या काळात स्वर्गीय पं. ओंकारनाथ ठाकूर यांनी संगीताच्या क्षेत्रात गुजरातचे नाव भारतातच केवळ नव्हे तर परराष्ट्रातही उज्ज्वल केले. त्यांची संगीत-तपस्या थोर होती. संगीतावर संशोधन करून त्यांनी पुष्कळ ग्रंथ लिहिले. त्यात 'प्रणयभारती' व 'राग अने रस' हे ग्रंथ अभ्यासूंना उत्कृष्ट मार्गदर्शक ठरतील असे आहेत. ते स्वतःला पं. विष्णु दिगंबर पलुस्करांचे शिष्य म्हणवून घेत असत. परंतु आपल्या गायकीत त्यांनी स्वतःच्या प्रतिभेने बरेच बदलही केले होते.

गुजरातमध्ये आणखी पुष्कळच गुणी गायक जसे निर्माण झाले, तसेच

वाचन ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ... दि. ... प्रवास

गुजरातने 'बिलावल', 'सोरठ', 'खंभायती', 'तोडी गुर्जरी' इत्यादी गायकी रागही दिले आहेत.

**नृत्य**

गुजरातला स्वतःची अशी 'गरबा' व 'रास' ही दोन प्रमुख नृत्ये आहेत. पण ती लोकनृत्ये आहेत. शास्त्रीय पद्धतीची ती नाहीत. ही गुजराती लोकनृत्ये सामाजिक व धार्मिक अशा संमिश्र स्वरूपाची आहेत. ग्रामीण भागातल्याप्रमाणे शहरातही स्त्री-पुरुष मोठ्या उत्साहाने उत्सव प्रसंगी नृत्यात भाग घेतात. गुजरातचे हे एक वैशिष्ट्य लक्षात घेण्यासारखे आहे.

गुजराती 'गरबा' म्हणजे गुजरातचा अभिमान आहे, तर 'रास' म्हणजे गौरव आहे! गुजराती माणूस रास-गरब्यावर मनापासून प्रेम करतो. लट्टू असतो.

'गरबा' हे प्रामुख्याने स्त्रियांचे नृत्य आहे. यात लहान मुलीबाळींपासून ते वयोवृद्ध स्त्रियांपर्यंत सर्वजणी भाग घेतात. 'गरबी' हे पुरुषांचे नृत्य आहे. नवरात्राच्या दिवसात व शक्तीपूजेच्या काळात देवीच्या प्रांगणात स्त्रिया 'गरबा' नाचतात, तर पुरुष 'गरबी' नाचतात. गुजरातमध्ये नवरात्राच्या दिवसात गावो··



गरबा नृत्य

गावी गरब्याची धमाल चाललेली दिसते. गरब्यांनीच रात्री उजाडतात. आनंद-उत्साहाने भरभरून जातात. अखेरीस देवीचा प्रसाद वाटतात.

'गरबा' हे स्त्रियांनी वृत्ताकार फिरून करावयाचे नृत्य आहे. गरबाप्रमाणे गरबी नृत्यातही मध्यभागी 'झवारा' म्हणजे गहू पेरलेली लहानशी हंडी, 'गर्भदीप, म्हणजे दिवा किंवा 'मंडवडी' म्हणजे रंगीबेरंगी कापडाने सुशोभित केलेली व आत झवारा असलेली लाकडी वस्तू ठेवतात आणि तिच्याभोवती नृत्य करतात. छिद्रे असलेल्या मातीच्या घड्यात गर्भदीप ठेवतात. यास गरबाचे प्रतीक मानले जाते. ही छिद्रे अशा रीतीने पाडलेली असतात की त्यातून मोर, हंस, फूल-पाने आतील दिव्याच्या प्रकाशाने आकारावीत. टाळ्यांच्या तालावर गरबा नाचतात. 'गरबा' नृत्याचा 'हींच' व 'गरबी' चा 'हॉंची' असे नृत्य प्रकार आहेत. 'हॉंची' प्रकारच्या नृत्यात मुक्त हावभावांना वाव असतो. गरबा नाचताना गावयाची किती तरी लोकगीते आहेत. त्यातून देवीची स्तुती केलेली असते—

**माता सोळे सराद नव नोरताँ रे**
**माता वीस वजैया दिवाळी रे**
**भवानी खेले नोरताँ रे**

— माते श्राद्धाच्या सोळा दिवसानंतर नऊ दिवसांचे नवरात्र आहे. यानंतर वीस दिवसांनी दिवाळी आहे. भवानी नवरात्र खेळत आहे.

या लोकगीतांशिवाय नरसी मेहता, भालण, प्रेमानंद आदी किती तरी कवींनी 'गरबी'ची गीते रचली आहेत व ती लोकांच्या जिभेवर आहेत. दयाराम कवीला तर 'गरबीसम्राट' म्हटले जाते. 'गरबी' गीतांमधून राधा-कृष्णाची भक्ती-लीला वर्णिलेली असते—

**नन्दनन्दन अलबेलडो रे,**
**एनां वहालां लागे छे वेण;**
**सांभल सही मारी**
**घेलुं कीधुं गोकुलियुं रे,**
**एनां कामणगारां नेण;**
**सांभल सही मारी**

नटवर सुन्दर शामलो रे,
मनगमतो मोहनलाल;
सांभल सही मारी
हृदय सरसो लेइ लपटावुं,
मुने एवुं लागे छे वहाल;
सांभल सही मारी

— सखी ऐक ! नन्दनन्दन अलबेला आहे आणि त्याची वाणी प्यारी आहे. त्याने गोकुळाला वेड लावले आहे, कारण त्याच्या डोळ्यात मोहिनी आहे. तो सुंदर सावळा नटवर मोठा मनोहर आहे. तो मला इतका आवडतो की, त्याला हृदयाशी घ्यावे असे वाटते.

गरबा नाचताना गुर्जर-सुंदरी चित्तवेधक रंगीबिरंगी वेशभूषा करतात. तल्लीन होऊन गातगात ताल-ठेक्यावर नाचतानाचे दृश्य मनोहर असते.

अलीकडे गरबा नृत्ये सर्व तऱ्हेच्या सणसमारंभाच्यावेळी व विद्यालयांतून स्नेह-संमेलनासारख्या कार्यक्रमाच्यावेळीही सादर केली जातात. गरबा नृत्याच्या स्पर्धाही ठेवल्या जातात.

नृत्य–सौंदर्य, लय-माधुरी व गीत–संगीत यांचा सुरेख संगम गरबानृत्यात झालेला आहे.

अशी एक दंतकथा सांगतात की, श्रीकृष्णाचा पुत्र अनिरुद्ध याच्याशी बाणासुराची कन्या उषा हिचा विवाह झालेला होता. उषेलाच प्राचीन आख्यानातून ओखा म्हटले आहे. उषेला पार्वतीने नृत्य शिकवले होते. उषेने तेच नृत्य द्वारकेतल्या गोपींना शिकवले, त्यामुळे ते सौराष्ट्रात प्रचलित झाले. बाणासुर आजचा जो आसाम आहे, त्या प्रदेशाचा राजा होता. म्हणजे आसामचे नृत्य उषेच्या द्वारा गुजरातमध्ये आले. आसाम-सौराष्ट्र-गुजरात यांमध्ये अशाप्रकारे नृत्य-समन्वय घडून आला !

गुजरातचे दुसरे महत्त्वाचे नृत्य म्हणजे ‘ रास ’, याला ‘ दांडिया रास ’ असेही म्हणतात. हे नृत्य प्रामुख्याने पुरुषांचे आहे. परंतु स्त्रियाही रास खेळतात. कृष्ण-गोपींच्या रासलीलेचा या नृत्याला संदर्भ लाभलेला आहे. प्राचीन ग्रंथांमधून याचा उल्लेख ‘ हल्लीसक नृत्य ’ या नावाने केलेला आढळतो. हल्लीसक नामक

नृत्याचे तीन प्रकार आहेत. दंडरसक-टिपऱ्यांचे, तालरसक-टाळ्यांचे, व ललित-रसक-हावभावांचे. यापैकी 'दंडरसक' या प्रकारातून गुजरातचे दांडिया रासनृत्य जन्माला आले असावे.

गुजरातेत कोजागिरी पौर्णिमेला टिपूर चांदण्यात रासनृत्याला बहार येतो. गोकुळअष्टमीला व नवरात्रातही रास नाचतात. नवरात्रामधील रास देवीप्रीत्यर्थ असते.



रासनृत्य

रासनृत्यात नर्तकांच्या हातातील टिपऱ्यांनी ताल धरण्यात येतो. गोलाकार फिरून हे नृत्य नाचतात. गाणीही म्हणतात. रासनृत्याची लयबद्धता, ताल, पदन्यास, आणि संगीत मन वेधून घेते. मृदुंग, सनईची साथ देखील असते. एकजण गीताची ओळ सांगतो, बाकीचे ती म्हणतात. एखादा कृष्ण बनतो, बाकीचे त्याचे सौंगडी होतात. हळूहळू नृत्याची लय वाढत जाते. रंग भरतो.

रास-गरबा नृत्याशिवाय ग्रामीण व आदिवासी लोकांची लोकनृत्येही आहेत.

माहीर जातीच्या शेतकऱ्यांमध्ये गरबासारखेच 'कुछाडी' नामक नृत्य प्रचलित आहे. शेतकऱ्यांच्या उल्हसीत चित्तवृत्ती व्यक्त करणारे हे नेतृत्व होळी व नवरात्राच्या दिवसात धमाल गाजते. सनई, नगारे यांच्या साथीवर अत्यंत द्रुतगतीने नाचतात. नर्तकांनी चुणीदार पायजमा व पांढरा अंगरखा घालून डौलदार तांबडा फेटा बांधलेला असतो.

सौराष्ट्राच्या बाजूला 'गोफ गूंथण' व 'पाधर' ही लोकनृत्ये रंगलेली दिसतात. 'गोफ गूंथण' हे टिपऱ्यांचे रास-नृत्यासारखेच नृत्य असून पुरुष ते नाचतात. गीताला व पदन्यासाला टिपऱ्यांच्या तालाची जोड असते.

सौराष्ट्रातील आदिवासी कोळ्यांचे 'पाधर' हे नृत्य आहे. हातात झांजा व टाळ घेऊन नर्तक गोल करून गाणी गातात. नौका वल्हविण्याचा अभिनय करतात. कित्येक झांजा न घेता हातात काठी घेऊन वल्ह्याप्रमाणे तिचा उपयोग करतात. नृत्याला रंग चढला म्हणजे नर्तक विविध तऱ्हेचे अंगक्षेप करतात. कित्येकदा शीर्षासन करून पायात झांजा धरून वाजवून दाखविण्याचे कौशल्य दाखवतात. झालावाड, रिमडी आणि राजागड या भागात 'पाधर' नृत्य फारच लोकप्रिय आहे.

रास प्रमाणेच 'रासडा' नावाचेही एक लोकनृत्य आहे. यात लोकसंगीताचे प्राधान्य असते. सौराष्ट्रातील कोळी, भरवाड जातीच्या स्त्रिया व पुरुष रासडा-नृत्य करतात. शेतकरी-जीवन, गोप-जीवन, श्रम-जीवन, सागरी-जीवन, तसेच समाज व कौटुंबिक जीवनातील सुख दुःखांचे भाव रासडा नृत्यात व्यक्त केले जातात.

पढार लोक मच्छीमारीचे काम करतात. त्यांचे 'भकोल्यिा' नामक नृत्य प्रसिद्ध आहे. नृत्याच्या वेळी नर्तकांचे सारे शरीर समुद्राच्या लाटाप्रमाणे हेलावत असते.

श्रमिकांचे 'टिपणी' नृत्य सोमनाथजवळच्या चोरवाडच्या कोळी स्त्रिया फार सुरेख करतात.

भिल्ल आदी अन्य आदिवासी जमातींमध्ये देखील विविध लोकनृत्ये प्रचलित आहेत.

**भवाई**

अन्य प्रांताप्रमाणेच गुजरातलाही त्याचे लोकनाट्य आहे. त्याला 'भवाई'

म्हणतात. खेडूत जनतेत भवाई फार प्रिय आहे. भवाई करणारे फिरते लोक गावोगाव जातात. त्यांचा हा व्यवसायच असतो. भवाईला खुला रंगमंच चालतो. प्रकाशासाठी पूर्वी मशाल पाजळली जाई. अलिकडे पेट्रोमॅक्स, वीज असते.

भवाई करणारी मंडळी एखाद्या गावात जातात. ' भूगल ' नावाचे वाद्य वाजवून आपले आगमन जाहीर करतात. दिवाळी-दशहऱ्याच्या दिवसात गावोगाव भवाईचे फड उभे राहतात. शेतीभातीची कामे या वेळी झालेली असतात. श्रमपरिहारासाठी, मनोरंजनासाठी काही तरी हवेच असते.

गावच्या देवळापुढे किंवा धर्मशाळेपुढे रात्री मैदानात लोक दाटीवाटीने बसतात. मान वर करून, डोळे विस्फारून कुतूहलाने पाहतात.

सुरुवातीला भूगल वाजतो. तबला घुमतो आणि गणेशजीचे सोंग रंगमंचावर पायातले घुंगर छुन छुन वाजवीत प्रकट होते. दोन-तीन गायक व सूत्रधार येतो. ते गणेशजीची गीते गाऊन स्तुती करतात.

मग भवाई सुरू होते. ' छेलबटाऊ ' हे फार जुने व लोकप्रिय नाट्य आहे. अशा पुष्कळ कथानकावर भवाई रचलेल्या आहेत. धार्मिक, ऐतिहासिक तशा सामाजिक कथांवरही आहेत, ठाकूर असाइत त्यांनी सुमारे ३०० भवाई रचल्या होत्या. परंतु त्या ग्रंथात नसल्यामुळे केवळ पाठांतरावर तोंडातोंडी आलेल्या फारच थोड्या आता उरलेल्या आहेत.

मराठी तमाशात जसा सोंगाड्या असतो किंवा संस्कृत नाटकात जसा विदूषक असतो, तसा भवाईत ' रंगला ' असतो. रंगला वाईट चाली, परंपरा, व्यसनाधीनता, भ्रष्टाचार, ढोंग इत्यादींवर आपल्या उपहासगर्भ वाणीने टीका करतो. श्रोत्यांना हसवता, हसवता शिकवतो.

गावोगाव मिळणाऱ्या बिदागीवर ही मंडळी गुजराण करतात. पावसाळ्याच्या दिवसात यांचे खेळ बंद राहातात. अलिकडे मनोरंजनाची विविध साधने खेड्यापाड्यापर्यंत पोचल्यामुळे ' भवाई 'ची लोकप्रियता पूर्वी इतकी उरलेली नाही. तथापि एक प्राचीन कला म्हणून भवाईच्या पुनरुज्जीवनाचे प्रयत्नही होत आहेत.

**रावणहथ्या**

निरनिराळ्या याचकांनीही प्राचीन लोकसंस्कृती टिकवून धरली होती. गुजरातमध्ये लोकसंगीताची परंपरा सांभाळणारी रावणहथ्या नामक एक

याचकांची जमातच होती. गीते गाऊन भीक मागणे हेच काम हे लोक करीत असत. घरोघर जात असत. निरनिराळ्या धार्मिक, ऐतिहासिक प्रसंगांवर रचलेली कथागीते, भजने व रासडागीते गात असत. अलिकडच्या काळात ही जुनी परंपरा लुप्त होत चालली आहे.

राजस्थानशी निकटचा संबंध असल्यामुळे चारण शैलीतील गीतगायनाची प्रथा ही गुजरातमध्ये आहे. लोककवी दुलाभाई 'काग' यांची चारणगीते फार प्रसिद्ध आहेत.

अर्वाचीन काळात न्हानालाल, झवेरचंद मेघाणी या श्रेष्ठ कवींनीही सुंदर सुंदर लोकगीते देऊन लोकसंगीताची गुजराती परंपरा पुष्ट केली आहे.

**नाटक**

गुजराती रंगभूमीला फार प्राचीन इतिहास आहे. बाराव्या शतकात सिद्धराजाच्या कारकीर्दीत हेमचंद व त्याच्या अनेक शिष्यांनी सुमारे ६०० नाटके संस्कृतात लिहिल्याचा उल्लेख आढळतो. पुढे अनेक राजवटी आल्या नि गेल्या, पण मंदिराच्या आधाराने ही जुनी रंगभूमी तगून राहिली होती.

१८५० मध्ये आधुनिक गुजराती रंगभूमी जन्मास आली. श्री. निळकंठ यांचे 'राईनो पर्वत' व दलपरायनी लिहिलेले 'लक्ष्मी' ही नाटके त्यावेळीं लोकप्रिय ठरली. त्यानंतर आठ-दहा वर्षांनी 'जयकुमारी विजय' रंगभूमीवर आले. नानाभाई राणिना या पारशी लेखकाने शेक्सपीयरच्या 'कॉमेडी ऑफ एरर्स'चे रूपांतर 'भाईयो' नावाने रंगभूमीवर आणले. ठक्करांनी 'लेडी मॅकबेथ'च्या आधारावर 'वसुंधरा' नाटक लिहिले.

त्यानंतर नर्मदाशंकर यांनी सहा नाटके लिहिली व ती रंगभूमीवर त्या वेळी बरीच गाजली. चाबराजी, रुस्तुमजी, एदलजी, रणछोडर्जी, बंदेखुदा, खुर्शीदजी, बोमनजी, नासेरवानजी, बाघजी, ढोलसाजी, मूळशंकर मुलाणी आदि त्या काळातील नाटककारांनी गुजराती रंगभूमीची अमोल सेवा बजावलेली आहे. दौलतराम, कृपाराम पंड्या, मणिलाल, नानूभाई द्विवेदी आणि शंकर रतनजी भट्ट हेही यशस्वी नाटककार म्हणून गाजले.

अलिकडील काळात कन्हैयालाल मुन्शी, प्रभुलाल द्विवेदी, चंद्रवदन मेहता आदी नाटककारांनी ऐतिहासिक, सामाजिक नाटके लिहून गुजराती रंगभूमीवर नावीन्य आणले. गुजराती रंगभूमीच्या विकासाला नाटककार व अभिनेते म्हणूनही

पारशी मंडळींनी खूपच मोठा हातभार लावला आहे. हौशी नाट्यसंस्था गुजरात-भर होत्या, त्याशिवाय व्यावसायिक नाट्यमंडळ्याही होत्या. 'नाटक उत्तेजक मंडळी,' 'आर्य सुबोध नाटक मंडळी', 'आर्य नीतीदर्शक नाटक समाज', 'नटमंडळ' आदि संस्थांनी रंगभूमीची मोठी सेवा बजावली आहे. अमृत केशव नायक, बाबूलाल नायक, मोहनलाल लालजी, जयशंकर, प्रताप ओझा, इत्यादी अभिनेते व दिग्दर्शक यांनी गुजराती रंगभूमी गाजती ठेवली.

अलिकडे नव्या नव्या नाटकांचे नव्या तऱ्हेने प्रयोग होत आहेत. व्यावसायीकांबरोबर हौसी – प्रायोगिक रंगभूमीही जोमाने वाटचाल करीत आहे.

**चित्र**


गुजरातला त्याची स्वतंत्र अशी एक चित्रशैली आहे. परंतु कल्पसूत्रे व कालक कथा या जुन्या जैन पोथ्या उजेडात येईपर्यंत ही चित्रशैली मान्यता पावलेली नव्हती. २० व्या शतकाच्या सुरुवातीला जैन पोथ्यावरील या चित्रांबद्दल अधिक संशोधन झाले आणि या चित्रशैलीला स्वतंत्र स्थान मिळाले. या पोथ्यांच्या सजावटीसाठी भारतीय परंपरेतील रेखाधिष्ठित अशी द्विमित चित्रे काढली आहेत. रूढ आकृत्या व मोजके ठराविक रंग यांनी ही चित्रे इतर पद्धतीहून वेगळी दिसतात. ही चित्रे प्रामुख्याने जैन पोथ्यांवर असल्याने त्यांना जैनचित्रे म्हणण्याचा प्रघात होता. परंतु श्री. चमनलाल मेहता यांनी संशोधन करून या पद्धतीला गुजराती चित्रशैली म्हणण्यास सुरुवात केली. या चित्रांचे कलाकार हे पारंपरिक लोक-कलाकार होते. १७ व्या शतकापर्यंत ही परंपरा टिकली, पण ती पुढे खंडित झाली.

त्यानंतर काही काळाने प्रसिद्धीस आलेल्या राजपूत, किंवा राजस्थानी चित्रशैलीचे मूळ या गुजराती शैलीत आहे असे जाणकारांचे मत आहे. पर्वत, नदी, वृक्ष, मेघ आदींच्या आलेखनात राजपूत शैलीने मिळविलेले प्रभुत्व गुजराती शैलीमुळेच आले असे त्यांचे मत आहे. या चित्रशैलीचे मूळ पश्चिम भारतच आहे. पुढे ती नेपाळ, बंगाल, ओरिसा, ब्रह्मदेश इथपर्यंत पोहोचली.

जामनगरच्या राजवाड्याच्या भिंतीवर या पद्धतीची चित्रे आजही पाहावयास मिळतात. यावरून जुन्या काळी भित्तीचित्रांची कल्पना रूढ होती असे सिद्ध होते. आजही चित्रकलेच्या क्षेत्रात गुजराती कलाकार भारतात सुप्रसिद्ध आहेत. रवीशंकर रावळ, कनू देसाई, जगन्नाथ अहिवासी, सोमलाल शहा, रसिकलाल परिट,

इत्यादी चित्रकारांनी गुजरातची थोर परंपरा सांभाळलेली आहे. बडोदा विश्वविद्यालयाने चित्रकलेचा विभाग सुरू करून ही कला प्रोत्साहित केली आहे. गुजरातनेही ' ललीतकला अकादमी ' स्थापन करून संगीत, नृत्य, नाट्य आदी कलाबरोबरच चित्र कलेलाही प्रोत्साहन दिले आहे.

अन्य कला क्षेत्राप्रमाणेच चित्रकलेतही नवीनतेचे वारे खेळू लागले आहे. नव्या आशयाची चित्रे नव्या शैलीने चित्रित होत आहेत. शरद पटेल, आबिद सुरती, दशरथ पटेल, इत्यादी नवचित्रकार आज आघाडीवर आहेत.



गुजराती चित्रशैली

**वास्तुशिल्प**

प्राचीन काळातील लेणी, स्तूप, मंदिर, यांवरून जुन्या वास्तुशिल्पाची कल्पना येते. गिरनार, तळाजा, साना, गोप व धानक येथील लेणी विख्यात आहेत. गुजरातमध्ये सापडलेले स्तूप विटांचे बांधलेले आहेत. जुनागडजवळचा बोरिआ येथला आणि दुसरा सोपारा जवळचा असे दोन बौद्ध स्तूप उल्लेखनीय आहेत. प्राचीन काळातील मंदिरे मुख्यतः सौराष्ट्रात आढळतात. गोप येथील मंदिर जुने परंतु उत्कृष्ट आहे. सोळंकी व वाघेली या राजांनी गुजरातेत बरीच सुंदर मंदिरे बांधली होती. त्यातील बहुतेक पुढील काळात उध्वस्त झाली. परंतु त्यांच्या अवशेषांवरून त्या काळातील शिल्पकला किती प्रगत होती याची साक्ष पटते. सिद्धपूरचे रुद्रमहालय, मोढेराचे सूर्यमंदिर व घुमली येथील नवलखा मंदिर ही शिल्पकलेची उत्कृष्ट प्रतिके आहेत. अबू व शत्रुंजय पर्वतावरील जैन-मंदिरे देखील अशीच कोरीव, कातीव नक्षीदार आहेत.

मुसलमानी आमलात मशिदी, राजवाडे व मनोरे यांच्या रूपाने गुजरातेमधील वास्तुकला उभी राहिली. अहमदाबाद, पाटण, धोलका, खंबायत, भडोच, चांपानेर, जुनागड या शहरांमधून अशी जुनी स्मारके पुष्कळ आढळतात. गुजरातमधील सुसंस्कृत व कुशल कारागिरांनी मुस्लिम सत्ताधिशांच्या आदेशाप्रमाणे ह्या वास्तू घडवल्या, त्यामुळे त्यात हिंदू आणि मुस्लिम शिल्पकलेचा सुंदर संगम झाला आहे. त्यातूनच गुजरातची वेगळी अशी शिल्पशैली विकास पावली.


सोळंकी वंशाच्या पूर्व काळात गुजरातमध्ये मूर्तीकलेची एक वेगळी परंपरा होती. त्या परंपरेतील काही मूर्ती उपलब्ध झाल्या आहेत. त्यात भडोच जिल्ह्यातील कावी येथे सापडलेली कुबेराची मूर्ती, कठलाल येथील त्रिमूर्ती, कारवाण जवळची लकुलीश्याची मूर्ती, भिन्नमाळ येथील यक्षमूर्ती या विशेष उल्लेखनीय आहेत. १५ व्या शतकात पाटणचा सूत्रधार मंडन याने शिल्पशास्त्रावर अनेक संस्कृत ग्रंथ लिहिले असून त्यात विविध प्रकारच्या मूर्तींची वर्णने आहेत. मानव रूपातल्या गरुडावर आरूढ झालेल्या आठ, दहा, बारा, चौदा, सोळा, किंवा वीस हात असलेल्या विष्णूची मूर्ती हे पश्चिम भारतीय शिल्पाचे एक वैशिष्ट्य होय.

गुजरातमध्ये अनेक मानवनिर्मित तलाव आहेत. निरनिराळ्या राजांनी ते बांधलेले आहेत. या तलावांचे बांधकामही प्रेक्षणीय आहे.

**साथिया**

गुजराती रांगोळ्यांना 'साथिया' म्हणतात. साथिया हा राजस्थानी शब्द

असून त्याचा अर्थ स्वस्तिक असा आहे. गुजरात-राजस्थानची जवळीक फार प्राचीन काळची आहे. त्यामुळे अशी आदान-प्रदान झालेली आहे. साथियाच्या आकृतीत राजस्थानी माँडनाचे साम्यही त्यामुळेच आढळते.



साथिया

रंगावलींनी घरेदारे, मंदिरे सुशोभित करण्याची प्रथा गुजरातमध्येही आहे आणि त्यात गुर्जर स्त्रिया वाकबगारही आहेत. नवरात्राच्या दिवसात आणि दिवाळीत घरांपुढची अंगणे रंगीबिरंगी साथीयांनी शोभिवंत होतात. मंगलकार्यात किंवा इतर सणासुदीला साथियांच्या आकृत्यांनी प्रांगण सजतेच. विशिष्ट प्रसंगी विशिष्ट तऱ्हेच्या आकृत्या विशिष्ट पद्धतीनेही काढल्या जातात. एरवी साफसुफ केलेल्या भुईवर चुनखडीच्या भुकटीच्या पांढऱ्या पातळ द्रवात कापसाची बारीक वात भिजवून साथिया रेखटतात, तर नागपंचमीला दुधात कोळशाची पूड मिसळून त्या मिश्रणाने रेखतात. एरवीच्या साथियास शंख, चक्र, सूर्य, चंद्र, कमळ,

स्वस्तिक इत्यादी आकृत्या असतात, तर नागपंचमीच्या वेळी त्यात पाळणा, विंचू, नाग आदींच्याही आकृत्या दाखल होतात.

सौराष्ट्रात घराच्या भिंती, चौकटी, कोनाडे व छतांवरही साथियाची नक्षी चितारतात. ही नक्षी चितारण्यासाठी चिंधीचा उपयोग करतात. गुजरातच्या खेड्यापाड्यांतूनही पांढऱ्या द्रवात चिंधी बुडवूनच साथिया-रेखाटन केले जाते. अशा तऱ्हेच्या रेखाटनास नाजुकपणा कमी असतो. काही ठिकाणी चुनखडीऐवजी निरनिराळे गडद रंगही वापरले जातात. अशा रंगीत साथियांनी नटलेल्या भिंती सुरेख व आकर्षक दिसतात.

साथियांच्या आकृत्यांतही आता नवनवीन आकार–प्रकार येऊ लागले आहेत. रंगभरणी होऊ लागली आहे. पक्षी, फुले, पाने यांच्या चित्तवेधक आकृत्यांनी ती सुशोभित होत आहे.

**कलाकुसर**

गुजरात राज्याच्या ग्रामीण भागातील कारागिरी भारतात प्रसिद्ध आहे. सुरतेचे जरीकाम, कच्छमधील जडावाचेकाम, पाटण येथील अगेटचे अलंकार, संखेडाचे लाखकाम, पालनपुरचे सुगंधी पदार्थ आणि विविध ठिकाणचे लाकडावरील कोरीव कामेही विशेष उल्लेखनीय आहेत.

स्त्रियांच्या वेशभूषेत विविध तऱ्हेच्या साड्या असतात. पाटोळा, त्रंचोई, बांधणी, चुंडी, सेल्ल इत्यादी साड्यांचे प्रकार आहेत. सुरती साड्यांचे जरकाम व भरतकाम उत्कृष्ट असते. पांढऱ्याशुभ्र साड्यांवर तांबड्या, पिवळ्या व हिरव्या धाग्यांनी बारीक विणकाम केलेले असते, ते फारच आकर्षक दिसते. त्रंचोईचे रंग इतके चकचकित असतात की, सोन्या-चांदीच्या धाग्यांनी या साड्या विणल्या आहेत की काय असा भास होतो. लखलखीत तरीही नयनरम्य रंग हे ह्या साड्यांचे वैशिष्ट्य असते. परंतु ही कलाकुसर अलिकडे महाराष्ट्रातल्या पैठणीप्रमाणे लुप्त होत चालली आहे.

विणकामाचे उत्कृष्ट कसब,–हाताने विणलेल्या पाटोळानामक साड्यांत पाहायला मिळते. पाटोळा साडीवर चित्रित करावयाचे आकार विणण्याच्या आधीच ठरवतात. तांबडे, निळे, हिरवे व पिवळे रेशमी धागे वापरून पाटोळाचे विणकाम करतात. पाटोळ्यावरील नक्षीचा उगम रांगोळ्यांच्या आकृत्यांमधून झालेला दिसतो.

या जातीच्या साड्या प्रामुख्याने पाटण, सुरत व खंबायत येथे होतात. सुरतेकडील पाटोळा साडीवर हिरवा रंग व पानाफुलांची नक्षी विशेष दिसते. खंबायतच्या साडीवर तीन पांढरी फुले व त्यांना देठ अशी नक्षी असते. काठावर लांबट फुलांच्या आकृत्या रंगवतात. पाटणच्या साडीवर साडीभरून रुंद पट्टे असतात व त्यावर पक्षी, प्राणी, मनुष्याकृती इत्यादी नक्षी असते. काठ फुलांच्या नक्षीने फारच शोभिवंत करतात. बांधणीपद्धतीच्या साड्या वैशिष्ट्यपूर्ण असतात. रोजच्या जीवनातील प्रासंगिक गोष्टी त्यावर चितारतात. या साड्या पाटणला प्रामुख्याने होतात. गोठ वा जरीचे काठ लावूनही काही साड्या बनवतात.

चुंड्डी-साडी आकाराने लहान असून तिच्यावर नक्षी छापलेली असते. महाराष्ट्रातील चिरडीप्रमाणे ती असते. या साडीत नऊ रंग वापरतात. म्हणून तिला ‘ नवरंगी ’ असेही म्हणतात. नवानगर, जुनागड, अहमदाबाद व सुरत या ठिकाणी या साड्या प्रामुख्याने होतात. कच्छची कारागिरी प्रख्यात आहे. एकेकाळी प्रसिद्ध असलेल्या दमास्कसच्या तलवारीचे पोलाद कच्छ मधूनच जात असे. आजही येथील सुऱ्या व चाकू प्रख्यात आहेत. त्यांच्यावरील रुप्याचे नक्षीकाम प्रसिद्ध आहे.

अशा या विविध कलाकुसरीच्या वस्तूंमधून गुजरातची कलादृष्टी व रसिकता प्रकट होते.

◻ ◻

# स्थलयात्रा


गुजरातचे लोकजीवन व कलाजीवन जसे वेधक आहे तसेच स्थलदर्शनही लोभस, प्रेरणादायी आहे. गुजरात प्रदेशात प्राचीन पुण्यक्षेत्रे जशी आहेत, तशीच आर्वाचीन तिर्थक्षेत्रेही आहेत. रम्य नगरे आहेत, भव्य तलाव आहेत, विशाल उद्याने आहेत, विद्यापीठे आहेत.

**अहमदाबाद**

पश्चिम भारतातील हे मोठे शहर असून परवापरवापर्यंत गुजरात राज्याची राजधानी येथे होती. या शहराला सुमारे ९०० वर्षांचा इतिहास आहे. याचे प्रारंभीचे नाव आशावल होते, नंतर ते कर्णावती झाले. १४११ मधे अहमदशहा सुलतानाने हे शहर बसवले आणि अहमदाबाद असे नाव दिले. अहमदाबाद शहरात मुस्लिम राजवटीत उभारल्या गेलेल्या भव्य व शिल्पकलेच्यादृष्टीने उत्कृष्ट अशा मशिदी व मनोरे आजही पाहावयास मिळतात. जामा मशीद ही त्यापैकीच एक. अहमदशहानेच ही मशीद बांधली. सारंगपूर दरवाजाच्या बाहेर सीदी बशीरची मशीद आहे. या मशिदीला दोन उंच मनोरे बांधले होते. आणि त्यांचे वैशिष्ट्य असे की, एका मनोऱ्याच्या सज्जाला हात-लावून तो हालवला की दुसरा मनोराही डोलू लागतो. स्थापत्यशास्त्रातील हा एक चमत्कारच समजतात !

एकतोडानी नावाच्या मशीदीवरही असाच एक झुलता मनोरा आहे. लाल दरवाजाजवळ सिदी-सैयदची मशीद साधीसुदीच आहे. या मशिदीच्या मागच्या बाजूला हवा आणि प्रकाश आत येण्यासाठी दोन दगडी जाळ्या बसवलेल्या आहेत. या जाळ्या म्हणजे दगडी कोरीव कामाचा अप्रतिम नमुना होय. एका झाडाची गुंतागुंतीची पण आकर्षक आकृती कोरली आहे. यावरून लाकडाची प्रतिकृती

तयार करण्यात आली, व ती न्यूयॉर्कमधील वेलिंग्टन वस्तुसंग्रहालयात ठेवण्यात आली आहे.




झुलता मनोरा – अहमदाबाद

कांकरिया तलाव हे अहमदाबादचे निसर्गरम्य असे स्थळ आहे. बहात्तर एकर जमिनीवर हा विस्तीर्ण तलाव पसरलेला असून त्याच्या मध्यभागी नगीनावाडी नावाचे एक लहानसेच पण सुंदर उद्यान बनवलेले आहे. अहमदाबाद शहराच्या मधूनच साबरमती नदी वाहते. तिच्या पलीकडच्या तीरावर गांधीजींनी उभारलेला आश्रम आहे. या आश्रमात स्वराज्याचा बराच इतिहास घडला आहे. १९३० साली गांधीजींची सुप्रसिद्ध दांडी-यात्रा येथूनच निघाली होती.

अहमदाबाद शहर हे भारतातील एक प्रमुख औद्योगिक केंद्र म्हणूनही प्रसिद्ध आहे. येथे कापडाच्या सुमारे ६० गिरण्या असून याला हिंदुस्थानचे 'मँचेस्टर' असे म्हटले जाते. या गिरण्यांमुळे या शहरात मोठा व्यापार जसा चालतो, तसाच कामगारवर्गही मोठा आहे 'मजूर महाजन' नावाची आदर्श कामगार संघटना गांधीजींनी याच शहरात प्रथम सुरू केली होती. गांधीजींचे साहित्य प्रसिद्ध करणारी 'नवजीवन ट्रस्ट' नावाची प्रकाशन-संस्था येथेच आहे.

**बडोदे**

अहमदाबाद ही गुजरातची राजकीय राजधानी होती, तर बडोदा ही सांस्कृतिक राजधानी होती! बडोदा म्हटल्याबरोबर आठवण होते ती श्रीमंत



गांधीजींचा साबरमती आश्रम

सयाजीराव गायकवाड महाराजांची. भारतात इंग्रजी अमदानीत बरीच संस्थाने होती. त्यात बडोदे हेही एक होते. पण इतर बहुतेक संस्थानांनी आणि तिथल्या राजांनी ख्यालीखुशाली ऐषआराम, रेस, छंद आणि नाना तऱ्हेची व्यसने, प्रजेची पिळवणूक, गलथान कारभार, लहरीपणा यांविषयीच कुप्रसिद्धी मिळविली. परंतु सयाजीराव महाराजांची कीर्ती पसरली आणि आजतागायत टिकली ती त्यांच्या प्रजाहितदक्ष कारभारामुळे, त्यांच्या ज्ञान–कला व विद्येच्या लालसेमुळे. बडोद्यात पाऊल टाकताच याच्या खुणा पटतात.

विश्वामित्री नामक छोट्याशा नदीकाठी ही देखणी, वैभवशाली नगरी उभी आहे. स्वच्छ, सुंदर आणि प्रसन्न !

बडोद्यात मध्यवर्ती सूरसागर तलाव आहे. त्याने शहराची शोभा वाढवलेली आहे. मकरपुरा, नजरबाग आणि लक्ष्मीविलास असे तीन प्रेक्षणीय राजप्रासाद आहेत. त्यात लक्ष्मीविलासाचे वैभव आगळेच आहे. उत्कृष्ट चित्रांचे व शिल्पांचे दुर्मिळ नमुने तेथे पाहण्यास मिळतात. शहराच्याबाहेर विस्तीर्ण उद्यान आहे. वस्तुसंग्रहालय, पशुसंग्रहालय आणि चित्रसंग्रहालय या उद्यानातच आहेत. या संग्रहालयात नाना तऱ्हेच्या दुर्मिळ वस्तूंचे व कलाकृतींचे दर्शन होते. चित्रसंग्रहालयातील विविध कलाकारांची चित्रे पाहून डोळे निवतात !

बडोद्याचे ग्रंथसंग्रहालय ही फार प्रसिद्ध संस्था आहे. सयाजीरावांचे ग्रंथ-प्रेम विलक्षण होते. त्या प्रेमापोटीच त्यांनी ही समृद्ध व अद्ययावत पद्धतीची संस्था काढली. विविध विषयांवरील उत्तमोत्तम, संशोधित ग्रंथांचे प्रकाशनही त्यांनी केले होते. कलेला आणि विद्येला त्यांनी उदार आश्रय दिला. त्यामुळेच नृत्य-नाट्य-संगीत-चित्र इत्यादी कलाशिक्षणाची सोयही तिथे झाली.

मराठी आणि गुजराती बांधवांची बडोदा ही संगमभूमी आहे. गुजराती माणूस बडोद्याला वडोदरा म्हणतो.

**पावागड**

पावागड पर्वत हा गुजरातचा एक प्रासिद्ध पर्वत आहे.पावागडावर महाकालीचे मंदिर आहे. बडोदा शहरापासून पावागड २९ मैल आहे. पावागडाच्या जवळच ऐतिहासिक चांपानेर ही नगरी वसलेली होती. आज त्या कोणे एके काळी वैभवाच्या शिखरावर असलेल्या राजनगरीचे अवशेष मात्र आढळतात.

पावागडासंबंधी अनेक आख्यायिका ऐकायला मिळतात. मारुती जेव्हा द्रोणागिरी हातावर घेऊन चालला होता, त्या वेळी त्यातून खाली पडलेले एक ढेकूळ म्हणजे आजचा पावागड अशी दंतकथा सांगतात.

पावागडावर विश्वामित्र ऋषींचा आश्रम आहे. जवळच विश्वामित्री नदीचा उगम आहे. गडावर जाण्यासाठी तीन द्वारातून जावे लागते. पाहिल्यांदा ‘ अटका-द्वार–’ त्यातून चढून गेले म्हणजे ‘ हीना तलाव ’ लागतो. गोड व स्वच्छ पाण्याचा हा तलाव चढण्याचे श्रम हलके करतो. तिथून पुढे गेल्यावर लागते ‘ बुधिया द्वार ’ आणि नंतर भेटतो ‘ शहंशाह का दरवाजा ! ’

गडावर खापरा नावाच्या लुटारूची मोठी हवेली एके काळी होती म्हणे ! तिचे भग्नावशेष आजही दिसतात.

गडावर महाकाली व भद्रकाली अशी देवींची दोन मंदिरे आहेत. ‘ तेलिया सरोवर ’ आहे. नवरात्राच्या दिवसांत गडावर मोठी यात्रा भरते.

**गिरनार**

गुजरातचा हा दुसरा गिरीराज. जुनागडपासून सुमारे मैलभर अंतरावरच आहे. याची उंची सरासरी १०६० मीटर आहे. भोवतालच्या झाडीतून याची शिखरे दिसतात. याच्या अनेक शिखरात अंबा, गोरख, कालिंका, गुरुनेमिनाथ

ही प्रमुख आहेत. प्राचीन काळी गिरनारलाच उज्जयंत किंवा रैवतक पर्वत म्हणत असत. प्रभास पर्वत अथवा वस्त्रापथक्षेत्र असेही म्हणत. हिंदू, जैन, बौद्ध, इस्लाम अशा विविध संस्कृतींचा येथे संगम आढळतो. येथील शिखरावर गोरखनाथ, दत्तात्रेय, अंबामाता यांची मंदिरे आहेत. तसेच जैन श्रावकांची देवळे व धर्मशाळा आहेत. अशोकाचे १४ शिलालेख कोरलेले आहेत. शाक्त पंथी लोक प्राचीन काळी येथे राहात होते.

गिरनारच्या दक्षिणेस 'गीर' नावाची डोंगरमालिका आहे. तेथे घनदाट जंगल आहे. त्याला गीरचे जंगल म्हणतात. या जंगलात देखण्या व रुबाबदार भारतीय सिंहांची वस्ती आहे. सध्या तेथे १७७ सिंह व त्यांचे छावे आहेत. दिवसेंदिवस ही संख्या घटत चालली आहे. त्यामुळे तेथे शिकारीस मज्जाव करण्यात आला आहे. या सिंहांची जोपासना करण्याची व्यवस्था सरकारने केली आहे. तसेच प्रवाश्यांना सिंह-दर्शनाचीही सोय केलेली आहे. पावसाळ्यानंतर नोव्हेंबरमध्ये सिंहदर्शन घेता येते. परंतु मार्च ते मे ह्या दिवसात जंगलही गवतहीन बनलेले असते आणि उकाड्याच्या त्रासामुळे सिंह देखील मोकळ्यावर हिंडत असतात. त्यामुळे या दिवसात सिह दर्शनाचा पूर्ण आनंद अनुभवता येतो. सांबर, नीलगाय, विविध तऱ्हेची हरिणे, अस्वल, चित्ता इत्यादी जंगली जनावरेही दृष्टीस पडतात.

गीर जंगलात प्रवाश्यांसाठी राहण्याची उत्तम सोय शासनाने अलिकडे केलेली आहे.

**चोरवाड**


समुद्रकिनाऱ्यावरील हे एक रमणीय ठिकाण आहे. चोरवाडच्या आजूबाजूचा प्रदेश तऱ्हेतऱ्हेच्या फळाफुलांच्या उद्यानांनी आणि समृद्ध शेतीवाडींनी गजबजलेला आहे. प्रवाश्यांचे हे एक आवडते ठिकाण आहे. चोरवाडची नागवेलीची पाने फार प्रसिद्ध आहेत. येथील 'केशरी केरी' नावाचा आंबा फारच स्वादिष्ट व मधुर असतो.

बलसाड जिल्ह्यातील तीथल, उभराट, शुक्लतीर्थ आदी स्थळेही निसर्गसंपन्न व प्रेक्षणीय आहेत.

**पालिताणा**

शत्रुंजय नामक पर्वतावर जैनांची प्रसिद्ध मंदिरे असून स्थापत्य व शिल्प-

कलेबद्दल फार प्रसिद्ध आहेत. येथे अनेक मंदिरे असल्यामुळे पालिताणाला 'मंदिरांची नगरी' असे म्हटले जाते. एकाहून एक सुंदर अशी आठशे त्रेसष्ट संगमरवरी नक्षीदार बांधणीची मंदिरे येथे आहेत. त्यातील पहिला तीर्थंकर 'आदिश्वरा'चे मंदिर प्रमुख मानले जाते. त्याशिवाय आदिनाथ, कुपाहपाल, विमलक्षा, संप्रती राजा आणि चौमुख ही मंदिरे महत्त्वाची आहेत. ही मंदिरे प्रथम अकराव्या शतकात बांधल्याचा उल्लेख आहे; १४ – १५व्या शतकात त्यांचा नाश झाला, परंतु सोळाव्या शतकानंतर आजची मंदिरे बांधली गेली. डोंगरावर उंचभागी



पालिताणा – जैन मंदिरातील शिल्प


असलेल्या मंदिरापर्यंत जाण्यासाठी पायऱ्यांचे जिने बांधलेले आहेत. मधुनमधून विश्रांतीसाठी विश्रामस्थाने आहेत. भावनगरापासून ५६ किलोमीटर अंतरावर व अहमदाबादपासून २१४ किलोमीटर अंतरावर पालिताणा हे रेल्वे स्टेशन येते. कार्तिकी व चैत्री पौर्णिमा, फाल्गुन शुद्ध १३ व अक्षयतृतीया या दिवशी येथे उत्सव होतो. त्या वेळी हजारो यात्रेकरू, प्रवासी येत असतात.

**डाकोर**

डाकोरचे डाकोरनाथाचे मंदिर फार प्रसिद्ध आहे. हे वैष्णवांचे मोठे तीर्थस्थान आहे. नडियादजवळ हे रेल्वेमार्गावर येते.

**उदवाडा**

हे पारशी लोकांचे पवित्र स्थान आहे. सुरतेजवळ हे रेल्वे मार्गावर येते. पारशी लोक धर्मरक्षणाच्या हेतूने इराणमधून गुजरातमध्ये येथे आले. समुद्र किनाऱ्यावर असल्यामुळे रमणिय स्थळ आहे.




सूर्यमंदिर — मोढेरा

**मोढेरा**

सोलंकी वंशातील राजा भीमदेव ह्याने १०२६ मध्ये मोढेरा येथील सूर्य-मंदिर बांधले. शिल्प-सौंदर्याच्या दृष्टीने हे मंदिर फार प्रेक्षणीय असून आबूच्या दिल्वाडा मंदिराशी याचे खूपच साम्य आढळते. कोणार्कच्या स्थापत्यकलेचे प्रतिबिंबही यात उमटलेले दिसते. सोलंकी राजे सूर्यवंशी होते. सूर्योपासक होते.

मोढेरा येथील हे सूर्यमंदिर आज भग्नावस्थेतच दिसते. सूर्य देवाची मूर्तीही नाही. तथापि मंदिराचे अवशेषरूप स्तंभ, इतर मूर्ती, छत्र, द्वार यांवरील पाषाण-नक्षी पाहून मन स्तिमित होते. मध्ययुगातील विकसित शिल्पकलेची साक्ष पटते. गुजरातेत एवढे मोठे व सुंदर सूर्यमंदिर अन्य नाही. अहमदाबाद किंवा मेहसान येथून मोटारीने मोढेराला जाता येते.

**द्वारका**



रणछोडदास—द्वारका

पश्चिम किनाऱ्यावर श्रीकृष्णाची द्वारका वसलेली आहे. चारीधाम यात्रेत व सप्तपुरांतही द्वारकेची महती गायलेली आहे. द्वारका हे गोमतीच्या तीरावर वसलेले लहानसे गाव जरी असले तरी त्याचे महात्म्य मोठे आहे—द्वारकाधीश श्रीकृष्णामुळे.

श्रीकृष्णाने ही सोन्याची नगरी समुद्रात विश्वकर्म्याच्या हस्ते निर्मिली अशी तिची पौराणिक ख्याती. श्रीकृष्णाने प्रभासक्षेत्री अवतार समाप्ती केल्यानंतर ती समुद्रात बुडाली.

द्वारकेतले आजचे कृष्णमंदिर कृष्णाचा नातू वज्रनाथ याने बांधले. श्रीकृष्णाला येथे 'रणछोडदास' हे नाव मिळाले आहे. मथुरेला असताना जरासंधाने स्वारी केली त्या

वेळी तेथून युद्ध न करता रण सोडून श्रीकृष्ण येथे आला म्हणून हे नाव ! रणछोडजीचे मंदिर साधे पण भव्य आहे. १७० फूट उंचीवर आहे. सभामंडप प्रशस्त आहे. रणछोडजीची मूर्ती श्यामलवर्णी, चार फूट उंचीची आहे. जडजवाहिरांनी व नाना अलंकारांनी ती सुशोभित असते. रणछोडदास खूपच श्रीमंत आहे. बलरामाचे मंदिर याच मंदिरात आहे.

आद्य शंकराचार्यांनी स्थापन केलेल्या चार धर्मपीठांपैकी द्वारका हे एक आहे.


पश्चिम किनाऱ्यावरील 'द्वारिका' म्हणजे भारताचे 'लहानसे दार' असा याचा अर्थ सांगतात.

**सोमनाथ**

सोरठी सोमनाथ हे भारतातील एक प्रसिद्ध तीर्थस्थान आहे. सोमनाथला पौराणिक तसे ऐतिहासिक महत्त्व लाभलेले आहे. प्राचीनकाळी सोमराजाला म्हणजे चंद्राला त्याच्या दक्ष श्वसुराने 'तू क्षयी होशील' असा शाप दिला. शापाचे कारण असे घडले होते की, सत्तावीस राण्यांपैकी रोहिणीवर चंद्राचे विशिष्ट प्रेम जडले होते. सव्वीसजणींनी प्रजापती दक्षपित्याकडे गाऱ्हाणे गायले. दक्षपित्यालाही राग आला आणि त्याने शाप दिला. या शापातून सुटका व्हावी, उःशाप मिळावा या हेतूने सोमराजा या स्थळी आला. शिवलींग स्थापून आराधना सुरू केली. सोमनाथने स्थापिले म्हणून सोमनाथ नावाने हे स्थळ प्रसिद्धीस आले.

सोमनाथवर गुजरातची महान भक्ती जडली. 'जय सोमनाथ !' ही त्यांची भक्तिपूर्ण वीरगर्जना बनली. शेतीभाती-व्यापारउदीम-चढाईलढाई जे काही करायचे ते सोमनाथावर विसंबून आणि लाभ पदरात पडला, विजय मिळाला म्हणजे तोही सोमनाथाच्या कृपेने असे समजून सोमनाथाला त्यातील अंश अर्पण व्हायचा. सोमनाथच्या आसनाखाली अलोट संपत्ती, धनदौलत जमा व्हायची. बारामास सोमनाथला यात्रा भरे. लांबलांबून भक्तजन यायचे. सोमनाथाच्या श्रीमंतीची कीर्ती परकी आक्रमकांच्या कानापर्यंत पोचली. त्यांना लोभ सुटला आणि पहिल्यांदा गजनीच्या महंमदाने स्वारी करून सोमनाथ लुटले. भक्तांनी प्रतिकार केला. पण रक्ताचा सडा पडला, प्रेतांचा खच झाला. महंमूद अलोट संपत्ती घेऊन गेला. असे अनेकवार घडले. चटक लागलेल्या आक्रमकांनी सोमनाथला वारंवार लुटले. अखेरचा घाव औरंगजेबाने घातला. मंदिर देखील छिन्नभिन्न करून टाकले.

कालांतराने आहिल्याबाई होळकर यांनी लहानसे मंदिर उभारले.



सोमनाथ मंदिर

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर पुनश्च सोमनाथाचा जीर्णोद्धार झाला. भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे हस्ते नव्याने प्रतिष्ठापना करण्यात आली. या वेळी सोमनाथचे पौरोहित्य तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी केले होते.

हिरण्या, कपिला आणि सरस्वती या नद्यांचा जवळच त्रिवेणी संगम आहे. सरस्वती गुप्त आहे. हिरण्या नदीच्या काठीच श्रीकृष्णांनी आपला देह सोडला. म्हणून या स्थानाला देहोत्सर्ग क्षेत्र म्हणतात.

सोमनाथ हे गुजरातचेच नव्हे तर भारताचे तीर्थस्थान आणि स्फूर्तिस्थान आहे.

गुजरातमध्ये सुरत, जामनगर, भावनगर, जुनागड ही मोठमोठी शहरे पाहण्यासारखी आहेत.

**पोरबंदर**

पोरबंदर ही प्राचीन सुदामपुरी व अलिकडील म. गांधीजींची जन्मभूमी. या त्यांच्या जन्मभूमीत आता ' कीर्ति-मंदिर ' उभारलेले आहे.

**गांधीनगर**

गुजरातची ही नवी राजधानी अहमदाबादपासून २३ किलोमीटर अंतरावर नव्याने वसवलेल्या ' गांधीनगर ' येथे नेलेली आहे. ' गांधीनगर ' उत्तरेला साबरमती नदीच्या काठीच वसवले आहे. येथील सचिवालयाला ' सरदार भवन ' असे नाव वल्लभभाईंच्या स्मरणार्थ दिलेले आहे.

या भागात नामांकित आंबराया आहेत. त्या तशाच राखून, या नव्या नगराची रचना ५,५०० हेक्टर भूमीवर नव्या पद्धतीने व आकर्षक रीतीने केली आहे.

¤ ¤

# अर्वाचीन गुजरातचे शिल्पकार

गुजरातची सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इत्यादी क्षेत्रात आज जी प्रगती झालेली दिसते, तिच्यामागे काही पुरुषार्थी प्रयत्न आहेत. अशा प्रयत्नांतूनच देश किंवा प्रदेश आकार घेत असतो. अशाच काही पुरुषांचा हा अल्प-परिचय :

**दुर्गाराम महेता**

राजा राममोहनराय, महादेव गोविंद रानडे किंवा गोपाळ गणेश आगरकर या महापुरुषांनी बंगाल – महाराष्ट्रात जे धर्म व समाजसुधारणेचे कार्य केले, तसेच गुजरातमध्ये वैचारिक आणि सुधारणात्मक असे प्रभावी आणि अत्यंत महत्त्वाचे कार्य दुर्गाराम महेता यांनी केले आहे. आपल्या धर्मातील उणिवा त्यांनी निर्भीडपणे समोर मांडल्या आणि धर्मातून संशय, अज्ञान, अंधश्रद्धा निघून जाव्यात यासाठी त्यांनी सुरतमध्ये धर्मयुद्ध चालवले. दुर्गाराम स्वतः नागर ब्राह्मण होते, तरीही त्यांनी नात्यागोत्याचे रीतिरिवाज सोडून दिले आणि भूत, प्रेत इत्यादी चमत्कारांच्या समजुतींवर घणाघात केले. त्यांनी विज्ञानविषयक लेख लिहिले आणि समाजसुधारकांचा एक गट तयार केला.

१८४४ मध्ये दुर्गाराम यांनी ‘मानवधर्म सभा’ सुरत शहरात स्थापन केली आणि तिच्यामार्फत समाजसुधारणेचे कार्य सुरू केले. संस्थेच्या नावावरूनच ध्यानात येईल की, दुर्गाराम यांचा धर्म म्हणजे ‘मानवधर्म’ होता. त्यांनी त्या काळी देखील निर्भीडपणाने अस्पृश्यतेला विरोध केला आणि म्हटले, “ या जगात जन्माने भंगी कोणीच नाही. कर्माने कोणाला आपण भंगी म्हणतो...पण जेव्हा तो कामाने – वागण्याने – स्वच्छ होऊन आपल्याकडे येतो तेव्हा त्याला अटकाव करण्याचा विचार करण्याचे काहीच कारण नाही.”

दुर्गारामांनी विधवाविवाहाचा पुरस्कार केला, तसेच मूर्तिपूजेलाही विरोध केला.

कोणत्याही गुरूचा किंवा शास्त्राचा शब्द प्रमाण न मानता स्वतंत्र विचार करण्याची प्रथा सर्वांच्या आधी गुजरातेत दुर्गारामांनी सुरू केली.

**नर्मदाशंकर लालशंकर दवे**

कविवर्य नर्मद यांचा जन्म २४ ऑगस्ट १८६३ मध्ये सुरत येथे वडनगरा ब्राह्मण-परिवारात झाला. मुंबईच्या एलफिस्टन इन्स्टिटयूटमध्ये त्यांचे शिक्षण झाले. कवी म्हणून साहित्यक्षेत्रात त्यांनी जशी मोठी कामगिरी बजावली तशीच एक सामाजिक कट्टर सुधारणावादी म्हणूनही सामाजिक क्षेत्रात सेवा केली. सुधारणावाद्यांचे नर्मद हे नेते होते. त्यांचा प्रभाव सर्व गुजरातभर होता. त्यांच्या विचारांनी शिक्षित गुजरात पल्लवित झाला आणि म्हणून त्यांना 'सुधारणायुगाचे जनक' असे संबोधतात. एल्फिस्टन इन्स्टिटयूटमधल्या तरुण विद्यार्थ्यांनी स्थापलेली 'बुद्धिवर्धक सभा' ही एक नव्या वैचारिक जागृतीचे केन्द्र बनले, व त्यातूनच पुढे १८५१ साली 'बुद्धिवर्धक हिंदुसभा' जन्मास आली. नर्मदच तिचे प्रणेते होते. या सभेचा ओढा धर्मचर्चेपेक्षा विद्याप्रसार आणि समाजसुधारणा यांकडेच असे. इंग्रजी साहित्याच्या वाचनाने देशप्रेमाची नवी भावना या स्वरूपात जागृत झालेली होती. 'पॅट्रिऑटिझम'ला नर्मदांनी 'स्वदेशाभिमान' असा शब्द वापरला आहे. देशहिताची चिंता ही नर्मदांच्या विचारातील मुख्य भावना होती. त्यामुळे स्वातंत्र्य, विद्याप्रीती, सामाजिक सुधारणा, धार्मिक सुधारणा, साहित्यातील विविध प्रकार इत्यादी गोष्टींना महत्त्व प्राप्त झाले. नर्मद यांच्या अंगी उत्साह, हिंमत, दृढनिश्चय व करारीपणा भरपूर होता. बंगालच्या ब्राह्मसमाजाच्या विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. त्यामुळे आपला समाज बदलून टाकावा अशी बंडखोर वृत्ती त्यांच्या ठायी प्रबळ होती. अंधश्रद्धेविरुद्ध त्यांनी प्रचंड झुंज दिली. सामाजिक रीतिरिवाजांवर ते प्रहार करीत. तत्कालीन गुजरातच्या जीवनात नवचैतन्य निर्माण करण्यात नर्मदांचा वाटा मोठा आहे.

**विठ्ठलभाई पटेल**

विठ्ठलभाई झवेरभाई पटेल यांचा जन्म २७ डिसेंबर १८७३ रोजी नडियाद येथे झाला. सरदार वल्लभभाई पटेलांचे हे थोरले बंधू. प्रारंभीच्या काळात यांनी वकिली केली, पण १९११ पासून सार्वजनिक क्षेत्रात ते उतरले. १९१२ साली ते मुंबई कौन्सिलचे सदस्य बनले. १९१५ साली त्यांनी कॉंग्रेसच्या कार्यात मोठा वाटा उचलला. गुजरातमध्ये राष्ट्रीय विचारांचा प्रसार केला.

१९१७ साली ते 'इंपिरियल लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे' सदस्य बनले. लोकमान्य टिळकांचा प्रभाव विठ्ठलभाईंवर फार होता. ते कौन्सिल प्रवेशवादी होते. कौन्सिलमध्ये जाऊन इंग्रजांच्या अन्यायी राज्यकारभारावर ते आपल्या अभ्यासपूर्ण वक्तृत्वाची तोफ डागत असत. त्या काळात पं. मोतीलाल नेहरू, चित्तरंजनदास यांच्याप्रमाणेच विठ्ठलभाईंनीदेखील उत्तम संसदपटू म्हणून लौकिक कमावला होता.

**ठक्करबाप्पा**

अमृतलाल ठक्कर यांचा जन्म काठेवाडात भावनगर येथे २७ नोव्हेंबर १८६९ रोजी झाला होता. अस्पृश्य, दीन-दलित यांच्याविषयी त्यांच्या मनात बालपणापासून करुणेची व सहानुभूतीची भावना होती. १९१४ साली ते गोपाल कृष्ण गोखले यांच्या 'भारत सेवक समाजाचे' सेवक बनले.

१९२० साली असहकारितेच्या चळवळीत ते आले. स्वदेशी प्रचार, खादी आदी कामांत त्यांनी विशेष लक्ष घातले. राजकारणापेक्षा सेवाकार्यात त्यांना विशेष रुची होती. १९२२ ते १९३२ ही दहा वर्षे त्यांनी प्रामुख्याने आदिवासी भिल्लांची सेवा करण्यात घालवली. त्यांचे अज्ञान, दारिद्र्य, बेकारी, गरिबी, अंधविश्वास दूर करण्यासाठी अहर्निश परिश्रम केले. गांधीजींच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्यात ठक्करबाप्पांनी तनमनाने भाग घेतला. ते मानवतेचे पुजारी होते. १९ जानेवारी १९५१ रोजी त्यांचे निधन झाले. ठक्करबाप्पांच्या विषयी गांधीजींनी म्हटले होते, "ठक्करबाप्पा हे एक विरळा लोकसेवक आहेत. त्यांचा स्वभाव नम्र आहे. प्रशंसेची त्यांना भूक नाही. त्यांचे जीवनकार्य हाच त्यांचा संतोष आणि हीच त्यांची विश्रांती."

**सयाजीराव गायकवाड**

गुजरातेतील बडोदा संस्थानचे हे १८८१ ते १९३९ पर्यंत आधिपती होते. अन्य संस्थानिकांप्रमाणे यांनी केवळ सुखोपभोगात व ऐषआरामात काळ कंठला नाही. अनेक वेळा जगाचा प्रवास केला आणि परदेशात ज्या ज्या चांगल्या गोष्टी दिसल्या त्या, त्या आपल्या संस्थानात करण्याचा प्रयत्न केला. ते स्वतः मोठे विद्याव्यासंगी, नानाकलांचे चाहते व रसिक होते. त्यांनी आपल्या संस्थानात पडदापद्धती, बालविवाह, कन्याविक्रय इत्यादी दुष्ट रुढींना बंदी केली. प्राथमिक

शिक्षण सक्तीचे केले. पुरोगामी व लोकोपयोगी असे अनेक कायदे केले. देशी भाषांना उत्तेजन दिले. मध्यवर्ती व फिरत्या वाचनालयांची सोय केली. गुजराती–मराठी प्रजेचे प्रेम त्यांनी संपादन केले होते. लो. टिळक, अरविंद महर्षी वगैरे नेत्यांशी व क्रांतिकारकांशी त्यांचा घनिष्ट संबंध होता. यामुळे त्यांना ब्रिटिशांचा रोषही प्रसंगी पत्कारावा लागला, पण सयाजीरावांनी ब्रिटिशसत्तेपुढे लाचारीने कधी मान तुकवली नाही. लंडनमध्ये भरलेल्या दोन गोलमेजपरिषदांना ते हजर राहिले होते. तत्त्वज्ञान, धर्म, साहित्य आदी कार्याला त्यांनी सक्रिय साहाय्य दिले होते. हिंदी संस्थानात त्या वेळी बडोदा हे एक आदर्श, प्रगतीपर संस्थान म्हणून गणले जात असे ते सयाजीराव महाराजांच्यामुळेच होय.



सयाजीरावमहाराज गायकवाड

**रविशंकर महाराज**

गुजरातेत ' महाराज ' म्हणूनच ज्यांना ओळखतात अशी एक नव्वदीच्या घरातली वृद्ध, प्रेमळ व्यक्ती आहे. या सत्पुरुषाचे नाव आहे रविशंकर शिवराम व्यास. खेडा जिल्ह्यातील महेमदाबाद तालुक्यातील सरसवणी हे त्यांचे गाव. बारैये, पाटणवाडिये, धाराळे, ठाकर इत्यादी मागासलेल्या जमातींचे व्यास हे पिढिजात ' गोर ' म्हणजे पौरोहित्य करणारे उपाध्ये. या मागासलेल्या जमाती पूर्वी गुन्हेगार जमाती म्हणूनच ओळखल्या जात असत. चोरी करून, दरवडा घालूनच ते जगत असत. आणि त्यांच्यापुरते ' धाड घालणे ' हे पुरुषार्थाचे लक्षण मानण्यात येई. त्याशिवाय त्यांच्या जमातीत लग्ने होत नसत. इतकेच नव्हे तर नवऱ्याने चोरी

केली नाही, धाड घातली नाही तर त्याची बायको त्याला ‘ नादान ’ म्हणून हिणवीत असे. अशा या गुन्हेगार जमातीतल्या लोकांना सुधारण्याचे व त्यांना मानवतेचे हक्क मिळवून देऊन माणसांत आणण्याचे व्रत रविशंकरांनी घेतले. साठ वर्षें अहर्निश त्यासाठी झटले, झिजले, आणि किती तरी गुन्हेगारांचा हृदयपालट करून त्यांनी त्यांना चांगल्या मार्गाला लावले. गावोगावी ते अनवाणी पायाने फिरले. गुन्हेगारांना जवळ घेतले, कुरवाळले. सभ्य माणसांनी दूर केलेल्या त्या माणसांना रविशंकरांनी वत्सलता दिली. ते सारे त्यांना ‘ महाराज ’ म्हणू लागले. रविशंकर ‘ गुजरातचेच महाराज ’ बनले.

स्वातंत्र्याच्या लढ्यात महाराजांनी भाग घेतला. गांधीजींच्या सर्व कार्यात ते सामील झाले. तुरुंगवास भोगला. स्वदेशीचा प्रचार केला. विनोबांच्या भूदान–आंदोलनातही भाग घेतला. आज एवढ्या वयातही महाराज सेवेत गुंतलेलेच असतात. साऱ्या गुजरातला महाराजांबद्दल अपार आदर वाटतो.

**महादेवभाई देसाई**

महादेवभाईंना गांधीजींची पडछाया असेच म्हटले जाई. सुरतजवळील आलपेड नावाच्या गावी १ जानेवारी १८९२ रोजी महादेव भाईंचा जन्म झाला. सुरत व मुंबई येथे त्यांचे शिक्षण झाले. १९१६ साली ते एल. एल. बी. झाले. एका बँकेत नोकरीस लागले, पण त्यांच्या चित्ताला ती मानवेना आणि १९१७ साली महादेवभाई सहकुटुंब गांधीजींच्या साबरमती आश्रमात दाखल झाले. तिथून ते पूर्णत्वाने गांधीजींचे म्हणजे पर्यायाने देशाचेच झाले. गांधीजींच्या विशाल जीवनात त्यांनी स्वतःला विसर्जित करून टाकले होते. गांधीजी त्यांना आपला मुलगा मानत असत. गांधीजींच्या सर्व कार्यात ते त्यांच्या बरोबर राहिले आणि १९४२ च्या लढ्यात गांधीजी आगाखान पॅलेसमध्ये बंदिवासात असतानाच १५ ऑगस्ट १९४२ रोजी महादेवभाईंचे निधन झाले. असे समर्पित जीवन फारच विरळा !

पुढच्याच वर्षी गांधीजींच्या पत्नी कस्तुरबांचे तिथेच निधन झाले. ‘ बा ’ आणि महादेवभाई यांची वेगवेगळी स्मृति-समाधी आगाखान पॅलेसमध्ये आहे.

महादेवभाईंचे सुपुत्र नारायण देसाई हे सर्वोदय-आंदोलनातील आजचे आघाडीचे कार्यकर्ते आहेत.

**जुगतराम दवे**

बाल-शिक्षणाचे आचार्य म्हणून यांची गुजरातेत ख्याती आहे. सुरतेजवळ आदिवासी भागात, वेडछीनामक गावी एखाद्या तपस्व्याच्या निष्ठेने जुगतराम-भाईंनी शिक्षणसाधना केली. गांधीजींनी 'बुनियादी तालीम' नावाने आपले शिक्षणविचार मांडले. त्यांच्या विचारानुसार शैक्षणिक कार्य करण्यासाठी जे लोक प्रेरित झाले, त्यांपैकी जुगतरामभाई हे एक प्रमुख होते. त्यांनी आपले सारे जीवन 'बाल-शिक्षणा' साठी समर्पित केले. या क्षेत्रात त्यांनी अनेक प्रयोग केले. चिंतन केले. प्रसार केला. गुजरातमध्ये गावोगाव सर्वत्र आज बालवाड्या दिसतात. आपली मुले संस्कारी, सदाचारी, बुद्धिमान व सुनागरिक बनावीत यासाठी त्यांच्या शिक्षणाकडे प्रारंभापासूनच लक्ष पुरविले पाहिजे ही महत्त्वाची जाणीव पालकांत व शिक्षकवर्गातही जुगतरामभाईंनी निर्माण केली.

**मोरारजी देसाई**

बलसाड जिल्ह्यातील भदेली गावी २९ फेब्रुवारी १८९६ रोजी अनाविल ब्राह्मण जातीत यांचा जन्म झाला. मोरारजी गोपाळजी देसाई हे त्यांचे पूर्ण नाव. १९३० साली यांनी सरकारी नोकरी सोडून स्वातंत्र्याच्या लढ्यात भाग घेतला. तुरुंगवासही भोगला. स्वातंत्र्यानंतर प्रथम मुंबई प्रांताच्या मंत्रिमंडळात व नंतर केंद्रीय मंत्रिमंडळात त्यांनी अर्थमंत्री व उपपंतप्रधान म्हणून काम केले. मुंबई प्रांताचे तर ते मुख्यमंत्री होते. एक तत्त्वनिष्ठ व करारी शासक म्हणून ते ओळखले जातात. १९६९ साली काँग्रेसपक्ष दुभंगला आणि तेव्हापासून मोरारजी संघटना काँग्रेसचे नेते आहेत.

**नानाभाई भट्ट**

बालशिक्षणाच्या क्षेत्रात गुजरातमध्ये मॉंटेसरीसारखे स्थान श्री. गिजुभाई बधेका, हरभाई त्रिवेदी आणि नानाभाई भट्ट यांनी 'दक्षिणामूर्तीची' स्थापना करून मिळवले. 'बालकने मराय तो नहींज परंतु वढाय पण नहीं'—म्हणजे बालकाला मारू नये, पण रागावूही नये हा मंत्र दक्षिणामूर्तीने घरोघर पोचवला. पुढे नाना-भाई आपल्या काही सहकाऱ्यांसह भावनगरजवळच्या 'आमला' गावी गेले व ग्राम दक्षिणामूर्ती संस्थेमार्फत त्यांनी ग्रामीण संस्कृतीला पोषक अशा शिक्षणकार्याला सुरुवात केली. यातूनच पुढे सणोसरा येथे १९५३ साली लोकभारती ग्राम-

विद्यापीठाची स्थापना केली. लोकभारतीची दृष्टी भारतीय-संस्कृती व आधुनिक वैज्ञानिक विचारप्रवाह यांचा समन्वय करून उच्च शिक्षणाचे कार्य करण्याची आहे. नानाभाईंनी विविध शैक्षणिक प्रयोग करून तरुणांच्यामध्ये नवीन जिद्द आणि जीवननिष्ठा निर्माण केली आहे.

**दादासाहेब मावळणकर**

गुजरातने ज्यांना व ज्यांनी गुजरातला आपले म्हटले अशा महाराष्ट्रीयांपैकी मावळणकर हे एक प्रमुख. आचार्य काकासाहेब कालेलकर, मामासाहेब फडके यांनीही गुजरात आपली कर्मभूमी मानली होती. दादासाहेब हे विख्यात कायदे-पंडित होते. गांधीजींच्या आंदोलनात सर्वस्वाने होते. पांडित्य, तपस्या व सौजन्य-शील स्वभाव यांमुळे भारतीय लोकसभेचे पहिले सभापती म्हणून त्यांची उचित निवड झाली होती. त्यांनी आपल्या कारकीर्दीत भारतीय लोकसभेत चांगल्या परंपरा रूढ केल्या. अहमदाबादेतील ' लास्की इन्स्टिट्यूट ' या संस्थेच्या संस्थापनेतही त्यांचा भाग मोठा होता. आज त्यांचे सुपुत्र खासदार पुरुषोत्तम मावळणकर हेही या संस्थेच्या व गुजरातमधील समाजकार्याच्या आघाडीवर आहेत.

□ □

# विकासोन्मुख गुजरात

स्वातंत्र्यानंतर देशात स्वराज्याचे सुराज्य करण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. नियोजन मंडळाची स्थापना झाली. पंचवार्षिक योजनांची आखणी झाली. गुजरातही विकास-कार्यात मागे नाही.

गुजरातेत शेती हाच प्रमुख व्यवसाय आहे. सध्या गुजरातमधील एकूण जमिनीपैकी ५४टक्के जमीन लागवडीखाली आहे.गुजरातमध्ये पावसाचे सरासरी प्रमाण कमी आहे आणि पाणीपुरवठ्याच्या योजनाही मूळच्या कमी होत्या. स्वातंत्र्यपूर्व काळात त्या जवळजवळ नव्हत्याच म्हटले तरी चालेल. परंतु या पंचवीस वर्षांत ब-याच योजना हाती घेण्यात आल्या. त्यात तापी नदीवरील बहुउद्देशीय '**उकाई योजना**' व '**काक्रापारा**' पाणीपुरवठा योजना, मही नदीवरील बहुउद्देशीय '**कडणा योजना**' व **मही-पूर्व-काठ कालवा**, बनारस नदीवरील '**दंतीवाडा**' पाणीपुरवठा योजना आणि हातमती, मेशवा, सरस्वती, शेत्रुंजी, भादर, मच्छू, साबरमती या नद्यांतील पाणीपुरवठा योजना प्रमुख आहेत. यांतील बहुतेक पुऱ्या होत आल्या असून त्यामुळे गुजरातमधील पाणीपुरवठा–क्षेत्राचा बराच विस्तार झाला आहे. नर्मदा नदीवरील बहुउद्देशीय **नर्मदा प्रकल्प** ही एक मोठी योजनाही कार्यान्वित होत आहे. गुजरात राज्यात सध्या १२०९ सरकारी व १२ खाजगी स्वरूपाचे कालवे आहेत. त्याचप्रमाणे ६९९७ विहिरी, ३२६ तळी, व २९३ अन्यमार्गांनी पाणीपुरवठा होतो आणि ८८३७०० हेक्टर जमिन त्याखाली भिजते.

या राज्यातील 'उकाई' व 'कडणा' या दोन योजनांपासून १,९,०,००० किलो-वॅट जलविद्युत निर्माण होते. याशिवाय बाष्प व डिझल तेल यांच्या साहाय्याने ६७·३७५ किलोवॅट वीज निर्माण केली जाते.

भडोच नजीक 'नर्मदा योजना' पूर्ण झाल्यावर सुमारे ४०३.८५ हेक्टर

जमिनीस पाणीपुरवठा होऊ शकेल. कच्छ आणि शेजारच्या राजस्थानातील कोरडवाहू जमिनीला पाणी भेटेल.

सध्या गुजरात राज्यातील शहरे व खेडी मिळून सुमारे १२०० ठिकाणी वीजपुरवठा करण्यात येतो.

गुजरात राज्यात उद्योगधंद्यांची वाढही झपाट्याने होत आहे. पूर्वी कापड गिरण्यांपुरतीच औद्योगिक प्रगती मर्यादित होती. महागुजरातमध्ये ही उणीव भरून निघत आहे. गुजरातचे औद्योगिक चित्र वैविध्यपूर्ण होत आहे. बडोदा आणि सुरत या शहरांच्या परिसरात रासायनिक, औषधी, विद्युत् व तांत्रिक उपकरणे, कागद, कृत्रिम धागे इत्यादी अनेक प्रकारचे कारखाने आणि त्यांच्या अनुषंगाने अनेक छोटे उद्योगधंदे उभे राहिले आहेत.

यांत्रिक उपकरणांच्या उत्पादनाचे, राजकोट हे एक नवीन केंद्र निर्माण झाले आहे. याशिवाय सौराष्ट्रात भावनगर, पोरबंदर, जामनगर, धारका, मिठापूर, ध्रांगध्रा इत्यादी ठिकाणी लहान मोठी कारखानदारीची वाढ होत आहे.

अंकलेश्वर येथे सापडलेल्या तेलाचे शुद्धीकरण करणारा कारखाना बडोद्या-जवळ कोयडी येथे निघत असून, जवळच एक मोठा ‘ गुजरात स्टेट फर्टिलायझर’ खतांचा कारखानाही निघत आहे.

सौराष्ट्राच्या भागात चुन्याचा दगड मोठ्या प्रमाणात मिळत असल्यामुळे पोरबंदर, राणावाव, जामनगरजवळील सिक्का आणि ओखा येथे सीमेंट उद्योग वाढला आहे. पूर्वभागात चिनीमातीच्या भांड्यांचे कारखाने व समुद्रकिनारी-भागात मीठ उत्पादन वाढले आहे.

गीर भागात सत्तरहजार उत्कृष्ट गायी – म्हसी आहेत. तेथे दुधदुभत्याचा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालतो. आनंद येथील ‘ अमूल डेअरी ’, मेहसाना येथील ‘ दूधसागर डेअरी ’ हा सहकारी पद्धतीने चाललेला दुग्धव्यवसाय भरभराटीत आहे. अहमदाबाद, राजकोट, जामनगर, सुरेंद्रनगर, जुनागड, भावनगर व बडोदा येथे दुग्धव्यवसाय चालतो. उत्तम गायी–म्हशी व त्यांना लागणारा चारा याची पैदास फार चांगली होते. ‘अमूल डेअरी ’ ही आशिया खंडातील एक प्रथम दर्जाची डेअरी मानली जाते.

मीठापूर येथे टाटांचा व कांडलाजवळ सरकारी खत कारखाना कार्यान्वित होत आहे.

कांडला बंदरानजीक 'गांधी धाम' नगर वसवण्यात आले. सिंधी निर्वासितांची तेथे व्यवस्था करण्यात आली. तेथेही लहानमोठे उद्योगधंदे उभे राहिले आहेत.

मच्छीमारीचा धंदाही या राज्यात विशेष जोराने चालतो. त्या धंद्याला उत्तेजन व संरक्षण देण्यासाठी ही योजना झालेली आहे.

गुजरातने खेड्यापाड्यातून पंचायती राज्याचा स्वीकार केला असून १७ जिल्हा पंचायती, १८२ तालुका पंचायती, ५५ नगर पंचायती व ११,८६४ ग्रामपंचायती १८,४०९ खेड्यातून काम करीत आहेत. त्याशिवाय काही स्थानिक गोष्टींसाठी २०८३ न्याय-पंचायती स्थापन झालेल्या आहेत.

शिक्षणाचा प्रसारही द्रुतगतीने होत आहे. बालवाडीपासून पदवीशिक्षणापर्यंत योजनाबद्ध कार्य चालू आहे, ७ ते ११ वर्षांच्या बालकासाठी सक्तीचे मोफत शिक्षण आहे. ५०० लोकवस्तीच्या गावाला शाळा आहे. मूलोद्योग शिक्षणाच्या शाळाही आहेत.

राज्यात २,०१० माध्यमिक शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. त्याशिवाय भिन्न भिन्न उद्योगधंद्याला आवश्यक अशा शिक्षणाचीही व्यवस्था केलेली आहे.

गुजरात राज्यात – एम. एस. विद्यापीठ – बडोदा, गुजरात विद्यापीठ – अहमदाबाद, सरदार वल्लभभाई विद्यापीठ, गुजरात युनिव्हर्सिटी, सौराष्ट्र युनिव्हर्सिटी, दक्षिण गुजरात युनिव्हर्सिटी व गुजरात आयुर्वेद युनिव्हर्सिटी अशी सात विद्यापीठे आहेत. कृषि – विद्यापीठ कार्यान्वित आहे. त्याशिवाय 'फिजिकल रिसर्च लॅबोरेटरी', 'अहमदाबाद टेक्स्टाईल इंडस्ट्री रिसर्च असोसिएशन' आदी १९ संशोधन संस्था काम करीत आहेत.

शारिरीक शिक्षण, सैनिकी शिक्षण व तांत्रिक शिक्षण यांचीही ठिकठिकाणी सोय केलेली आहे. जुने हस्तोद्योग व कला यांना सवलती देऊन उत्तेजन देण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

आरोग्याच्या दृष्टीने राज्यात काळजी वाहिली जाते. सध्या २५१ प्राथमिक आरोग्य केन्द्रे आणि १०,७०३ खाटांची व्यवस्था सरकारी हॉस्पिटल्समधून आहे.

वाहतूक व दळणवळणांच्या साधनांचीही समाधानकारक वाढ राज्यात

झाली आहे. 'दि गुजरात स्टेट रोड ट्रान्सपोर्ट कार्पोरेशन' प्रस्थापित झाले असून प्रवासी मोटर धंद्याचे पूर्णपणे राष्ट्रीयीकरण झालेले आहे.

ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्यासाठी पर्यटन खात्याने वाहतुकीची व इतर सोय केलेली आहे व निसर्गरम्य स्थळी 'विश्रामगृहे' बांधली आहेत.

विकासाच्या दृष्टीने चोहोबाजूंनी महागुजरातची वाटचाल झाली आहे — आणखी होणार आहे.

□ □

# गुजराती लोकसाहित्य

लोकसाहित्य ही त्या त्या भाषेची एक अमूल्य अशी ठेव आहे. लोकभावना, लोकाचार आणि लोकस्थिती यांचे दर्शन लोकसाहित्य घडवीत असते. प्रत्येक भाषेत असे साहित्य आहे. गुजरातीतही आहे.

गुजराती लोकसाहित्यात धार्मिक व ऐतिहासिक भावनेने रचलेले कथा-काव्य, आणि लग्नकार्य, स्थानिक घटना, गरबा, रास यांची गीते, असे विपुल आणि विविध प्रकारचे लोकसाहित्य आहे. श्री. झवेरचंद मेघाणी यांनी हे विखुरलेले धन एकत्र करून साक्षेपाने संपादिले आहे.

काही पारंपारिक बालगीते, म्हणी व गुजराती लोककथेची ही वानगी :

**बालगीते**

१

भाई मारो डाह्यो
पाटले बेसी नाह्यो
पाटलो गयो खसी
भाई उठ्यो हसी

—भाऊ माझा शहाणा. पाटावरती आंघोळ केली. पाट गेला सरकून, भाऊ उठला हसून.

२

में एक बिलाडी पाळी छे
ते रंगे बहु रूपाळी छे
ते धीमे धीमे चाले छे
ने हळवे हळवे भाळे छे

घी खाय, गोळ खाय
दूध तो चप चप चाटी जाय ।

—मी एक मांजर पाळले आहे. ते रंगाने सुंदर आहे. ते हळूहळू चालते. टुकुटुकु बघते. तूप खाते, गूळ खाते. दूध तर चटचट चाटून टाकते.

३

दादानो डंगरो लीधो,
तेनो तो में घोडो कीधो,
घोडो चाले रमझम,
धरती गाजे धमधम,
धमधम धरती थाती जाय,
मारो घोडो कूदतो जाय,
कूदतां कूदतां आवे कोट,
कोट कूदीने मूके दोट.

—आजोबांची काठी घेतली. त्याचा घोडा केला. घोडा धावतो दणदण, जमीन वाजते धपधप. जमीन वाजत राहते आणि घोडाही पळत राहतो. पळता पळता भिंत आली. भिंतीवरून उडी मारली.

**खेळातला गडी निवडण्याचा मंत्र**

मराठी मुले जसे 'अरिंग मिरिंग' करून खेळातले गडी निवडून घेतात, त्याप्रमाणे गुजराती मुले देखील खालील मंत्र म्हणून गडी निवडतात. 'खजूर' शब्द ज्याच्यावर येईल तो निवडला जातो. असे करीत शेवटी जो उरतो, त्याच्यावर राज्य येते.

अडको दडको दहिने फोदो
दहि दडूके ऊलू पाके
पीलू पाके, चांदणीये,
साकर, शेरडी, खजूर !

**गुजराती म्हणी**

- नाम मोटा अने दर्शन खोटा
  —नाव मोठे आणि दर्शन खोटे

- एक माळाना मणका
  —एकाच माळेचे मणी
  सांभळवुं सौनुं, करवु मननुं
  —ऐकावे जनाचे, करावे मनाचे
- जेनू काम तेनू थाय बिजा करे तो गोता खाय
  —ज्याचं काम त्यानंच करावं, दुसऱ्यानं केलं तर धोक्यात येतो.
- सोनानी थाळीमां लोहानी मेख
  —सोन्याच्या थाळीत लोखंडाची मेख.

**गुजराती लोककथा**

## शेठनी शिकामण झांपासुधी !

गुजरात प्रदेशातल्या एका गावची ही गोष्ट. त्या गावात बराच मोठा व्यापार-धंदा चालत असे. उदीरामशेठ हे अशाच एका मोठ्या व्यापारांपैकी बडी आसामी. उदीरामांच्या बऱ्याच पेढ्या ठिकाठिकाणी होत्या. आणि त्यांचा व्यापारही दूरदूरच्या प्रदेशांशी होत असे.

व्यापाराचा पसारा मोठा असल्यामुळे नोकर, चाकर, कारकून, मुनीम इत्यादी सेवकवर्गही तेवढाच मोठा होता.

एकदा एका राजाच्या मुलीचे लग्न ठरले. आता राजाच्या मुलीचे ते लग्न ! कपडेलत्ते, दागदागिने, भांडीकुंडी ही लागणारच आणि तीही चांगली भारी किंमतीची हवीत.

राजाने उदीरामशेटना बोलावणे धाडले. उदीरामशेठ निरोप मिळताच तडक राजवाड्यात येऊन दाखल झाले. राजाने त्यांना सांगितले, “ शेठजी, मुलीच्या लग्नासाठी भारी कपडे, जडजवाहिर पाहिजे.”

शेटजी म्हणाले, “ हो हो. खास माणूस पाठवून दिल्लीवरूनच सगळा माल मागवतो म्हणजे झाले ! ”

नंतर उदीरामशेठ घरी आले. त्यांनी आपल्या मुनिमांपैकी एकाला बोलावले. हा मुनीम सर्व मुनिमांमध्ये जरा अधिक हुषार व चलाख होता. तेव्हा एवढ्या मोठ्या खरेदीसाठी त्यालाच दिल्लीला पाठवायचा बेत शेठजींनी केला होता.

" गोकुळभाई ! राजाच्या कन्येचे लग्न आहे. त्यासाठी भारी मालाच्या खरेदीकरिता तुम्ही दिल्लीस जा. लगेच निघायला पाहिजे."

" बरं आहे शेठजी. आत्ताच उंटीण मागवतो नि निघायची तयारी करतो. पण खरेदी तरी केवढ्याची आहे ? "

" राजाच्या मुलीचे हे लग्न, तेव्हा सहज तीन–साडेतीन लाखांची खरेदी होईल, पण तुम्ही सहा लाखांचा माल आणा, चांगला निवडक असा आणा, म्हणजे राजेसाहेब कदाचित चार लाखापर्यंतही खरेदी करतील. उरलेला माल आपण दुसरीकडे विकून टाकू. माल मात्र चोख्खा पाहिजे."

" त्याची काळजी नको शेठजी. "

मुनिमाने घरी जाऊन प्रवासाची तयारी केली. उंटीण तयार केली. मुनिमाने शेठजींचा निरोप घेतला. तो उंटिणीवर बसला आणि निघाला दिल्लीकडे.

उदीरामशेठ त्याला गावच्या वेशीपर्यंत पोचवायला गेले होते. ते मुनिमाला सारखे बजावत होते, " बरं का गोकुळभाई ! खरेदी चांगली झाली पाहिजे. माल अस्सल पाहिजे. कापड एकदम मनपसंत निघाले पाहिजे. हिरे-माणके-पाचू जातिवंत आणि तेजस्वी पाहिजेत. रत्नांची पारख नीट करा; नाही तर फसाल बरं ! आणखी घाई-गर्दी करू नका, नाही तर भलतीच किंमत देऊन बसाल. नीट धीमेपणानं काम करा. फसू नका. "

शेठजींचा उपदेश मुनीम गोकुळभाई इतका वेळ ऐकून घेत होता.

आता शेठजी वेशीवरून परतताना जेव्हा पुन्हा पुन्हा बजावून सांगू लागले तेव्हा तो म्हणाला,

" शेठजी, तुम्ही सांगितलेले ऐकून घेतो, पण तुमचा सल्ला फक्त दरवाजापर्यंतच. पुढे नाही. बराय्, रामराम. " उंटीण हाकीत मुनीम निघून गेला.

शेठजी परतताना विचारात पडले. 'गोकुळभाई असे का म्हणाला !' त्यांना आपल्या एका मुनिमाने असे बोलावे याचे वाईट वाटले, अपमान वाटला. त्यांनी मनाशी ठरविले, 'हा गोकुळभाई बराच चढेल दिसतो. त्याची पायरी त्याला दाखवलीच पाहिजे. शेठजींचा सल्ला दरवाजापर्यंतच असतो काय ? म्हणजे माझ्या शब्दाला काहीच किंमत नाही ! माझ्यापेक्षा तो स्वतःला काय फार शहाणा समजतो ? शहाणपणाचा त्याचा तोरा खाली केलाच पाहिजे.'

आणि शेठजींनी मनातल्या मनात असा निश्चय करून गोकुळभाईचा तोरा कसा उतरावयाचा याच्या उद्योगाला ते लागले.

विचार करता करता त्यांना एक युक्ति सुचली. त्यासरशी त्यांनी आपल्या चाकराला हाक मारून न्हाव्याला बोलवायला सांगितले. इतक्या तडकाफडकी आणि दुपारच्या वेळी न्हावी कशाला? असा प्रश्न चाकराला देखील पडला. पण तो काय शेठजींचा गुलामच. तो गेला तोताराम न्हाव्याकडे; आणि आणले त्याने त्याला पुढे घालून.

तोताराम न्हावी येताच शेठजी त्याच्या पुढे बसत म्हणाले, " तोताराम ! माझे केस फार वाढलेत. सगळे काढून टाक. आणि नीट काप बरं का ! "

तोतारामलाही आश्चर्य वाटले. पण तो तरी काय करणार ! शेठजींची आज्ञा मानलीच पाहिजे. त्याने शेठजींचे सगळे केस कापून टाकले. तुळतुळीत गोटा केला. हजामत झाल्यावर तोताराम नेहमीप्रमाणे केस गोळा करून चालू लागला, तेव्हा शेठजी म्हणाले, " तोताराम, केस नेऊ नकोस. इथेच ठेव. "

तोताराम आश्चर्याने आणखीनच थक्क झाला. शेठजींना केस कशाला, हे त्याला कळेना. पण काय करणार ! शेठजींची आज्ञा मानलीच पाहिजे. तोताराम केस ठेवून गेला.

मग शेठजींनी घरात जाऊन एक भारी किंमतीचे रेशमी, जरीकाठाचे व सुंदर वेलबुट्टी असलेले कापड आणले. त्या कापडात आपले कापलेले सगळे केस नीट गुंडाळले आणि त्याचे एक गाठोडे तयार केले.

लागलीच शेठजींनी दुसऱ्या एका नोकराला बोलावले आणि हुकूम दिला, " हे बघ, उंट तयार कर आणि हे गाठोडे घेऊन तात्काळ जा. गोकुळभाई वाटेतच भेटेल. त्याला हे गाठोडे दे आणि सांग की दिल्लीच्या बादशहाला शेठजींच्या वतीनें ही वस्तू भेट म्हणून दे. "

चाकराने उंट आणला. गाठोडे घेतले आणि तो निघाला. थोड्याच अंतरावर त्याने गोकुळभाईला गाठले. त्याच्याजवळ ते गाठोडे देऊन त्याला शेठजींचा निरोप सांगितला. गोकुळभाईलाही वाटले की, दिल्लीच्या बादशहाकडे जायचे तर काही नजराणा पाहिजेच. त्याने ते गाठोडे तसेच ठेवून घेतले.

मजल दर मजल करीत गोकुळभाई दिल्लीला पोचला. कापडबाजारात, जवाहिरपुऱ्यात जाऊन माल खरेदी करायला त्याने सुरुवात केली. एके दिवशी तो



92006

दिल्लीच्या बादशहाच्या भेटीस गेला. जाताना एका मोठ्या चांदीच्या तबकात शेठजींनी धाडलेले ते रेशमी गाठोडे घेऊन गेला.

दरबारात गेल्यावर बादशहाच्या पायाशी तबक ठेवून गोकुळभाई हात जोडून अदबीन म्हणू लागला,

" कृपावंत बादशहांनी आमच्या शेठजींची ही भेट स्वीकारावी. "

बादशहाने गाठोडे पाहिले. त्याला खूपच आवडले. त्याने ते घेतले. पण इतक्या सुंदर गाठोड्यात कसली वस्तू आहे हे पाहायची त्याला उत्सुकता लागून राहिली होती. तो सेवकाला म्हणाला,

" सोड पाहू ते गाठोडे ! "

सेवकाने चटकन् पुढे होऊन गाठोडे सोडले. त्याच वेळी वाराही सुटला. दारे खिडक्या हेलकावत होत्या. गाठोडे सोडताच आतील केस वाऱ्यावर भुरूभुरू उडायला लागले.

केस बघताच बादशहा संतापला. तो ओरडला, " बंद कर ती घाण. "

गोकुळभाईदेखील आश्चर्यचकित झाला होता. त्याला ही काय भानगड आहे तेच कळेना. बादशहा संतापाने थरथरत शिपायांना म्हणाला,

" पकडा या मुनिमाला आणि अंधारकोठडीत डांबून ठेवा. आमची चेष्टा करतो काय ? "

आज्ञा होताच शिपाई धावले. त्यांनी मुनिमाला पकडले आणि घेऊन जाऊ लागले. पण तेवढ्यात मुनिमाला एक युक्ति सुचली. तो बादशहाला गयावया करून म्हणाला,

" सरकार माझी चूक असेल तर मला ठार मारा. पण हे केस मला परत द्या. "

मुनिमाची ही विचित्र मागणी ऐकून बादशहालाही नवल वाटले. तो प्रधानाकडे पाहू लागला. प्रधानालाही या मागणीत काही तरी रहस्य वाटले. मुनीम डोळ्यांत पाणी आणून विनवू लागला,

" सरकारस्वारीने चुकीबद्दल माझी गाढवावरून धिंड काढावी. पाहिजे तर कडेलोट करावा. हत्तीच्या पायी द्यावे, हवे तसे करावे. पण मरताना हे केस मला परत करावे, एवढीच मागणी आहे. "

बादशहा आणि प्रधान यांची तर आता खात्रीच पटली. या केसात काही तरी भानगड आहे, असे त्यांना ठाम वाटले. मुनीम म्हणत होता,

" सरकारनी एवढी कृपा करावी या गरिबावर. फक्त हे केस जवळ घेऊन मरू द्या मला ! "

आता तर बादशहाची आणि प्रधानाची ठाम खात्री झाली की हे केस साधेसुधे नाहीत. यात काही तरी निराळे आहे खास. बादशहाने उत्सुकतेने विचारले,

" हे केस मागतोस ? यात काय आहे ? "

" सरकार, तेवढे विचारू नका. केस घेऊन मरू द्या म्हणजे झालं. "

" नाही नाही, तुला सांगितलेच पाहिजे. "

" सरकार, आमच्या शेठजींच्या जवळची ही बहुमोल ठेव आहे. तुमच्या जामदारखान्यात सर्व तऱ्हेची रत्ने आहेत. हत्ती, घोडे, रथ हे वैभव तर आहेच. मग तुम्हाला काय भेट द्यायची ? म्हणून मग ही अमूल्य भेट धाडली त्यांनी ! "

" केसाला कसले आले मोल ? "

" सरकार, या केसांची एक कथा आहे. एकदा आमचे शेठजी यात्रेला गेले होते. तेथे त्यांना एक साधू भेटले. साधुमहाराजांची शेठजींनी पुष्कळ सेवा केली. साधू प्रसन्न झाला. त्याने आपल्या दाढीचे केस कापून त्यांना दिले आणि सांगितले, ' हे केस तिजोरीत ठेव. ' शेठजींनी तसे केले. तेव्हापासून त्यांना कशाचीच ददात पडली नाही. खरं म्हणजे शेठजी हे केस द्यायला तयारच नव्हते. पण तरीही शेठजींनी ते आपल्या भेटीस धाडले. असे आहेत हे लाभदायक केस. तुम्हाला नको असतील तर मला परत द्या. मी ते घेऊन मरीन. माझी मुलंबाळं तरी श्रीमंत होतील. "

बादशहाला ही हकीकत खरीच वाटली. तो प्रधानाला म्हणाला,

" प्रधानजी, हे केस सोन्याच्या पेटीत बंद करून ठेवा. गोकुळभाई मुनिमाला नजराणा द्या. त्यांनी खरेदी केलेल्या मालावर कर माफ करून टाका आणि काही घोडे व शिपाई बरोबर देऊन त्यांना सन्मानाने निरोप द्या. "

मुनिमाने घरी येताच घडलेली हकीकत शेठजींना सांगितली व म्हटले, " शेठजींचा सल्ला दरवाजापर्यंतच उपयोगी पडतो. बाहेर आपलीच अक्कल चालवावी लागते. " मुनिमाचे म्हणणे शेठजींना आता पटले. त्यांनी गोकुळभाईला बढती दिली. तेव्हापासून गुजरातीत " शेठनी शिकामण झांपासुधी ' (शेठजीचा सल्ला दरवाजापर्यंत) अशी म्हण रूढ झाली आहे.

□ □

# संभाषण

गुजराती भाषेतील काही प्रथम परिचयात्मक वाक्ये देवनागरीत येथे दिली आहेत. एखाद्या गुजराती माणसाशी प्रारंभी बोलण्यासाठी आणि गुजराती भाषेचाही अल्पसा परिचय होण्यासाठी त्यांचा उपयोग होईल.

| मराठी | गुजराती |
|---|---|
| ◻ नमस्कार ! | –नमस्कार ! नमस्ते ! |
| ◻ आपले नाव काय ? | –आपनुं नाम शुं छे ? |
| ◻ माझे नाव सतीश. | –मारुं नाम सतीश छे. |
| ◻ आपले आडनाव काय ? | –आपनी अटक शुं छे ? |
| ◻ आपल्या वडिलांचे नाव काय ? | –आपना पिताजीनुं नाम शुं छे ? |
| ◻ आपण राहता कोठे ? | –आप क्यां रहो छो ? |
| ◻ मी पुण्यास राहतो. | –अमे पूनामां रहिअे छीअे. |
| ◻ आपला पूर्ण पत्ता सांगा ! | –आप पोतानुं पूरुं सरनामुं आपो ! |
| ◻ लिहून घ्या ! | –लखी लो ! |
| ◻ आपण कोठून येत आहात ? | –आप क्यांथी आवो छो ? |
| ◻ मी सरळ मुंबईहून येत आहे. | –हुं सीधो मुंबईथी आवुं छुं. |
| ◻ आपण कोठे जाणार आहात ? | –हवे आप क्यां जशो ? |
| ◻ मी बडोद्याला जाईन. | –हुं हवे वडोदरा जईश. |
| ◻ तिथे आपले कोणी नातेवाईक आहेत ? | –शुं आपना कोई सगा त्यां छे ? |
| ◻ माझ्या नात्यागोत्याची माणसे तिथे आहेत. | –मारां सगां त्यां घणां छे. |
| ◻ तिथं माझे काही मित्रही आहेत. | –त्यां मारा केटलाक मित्रो पण छे. |
| ◻ ठीक. | –सारो. |

- ¤ बसा. इथे असे बसा. —बेसो, अहीं आम बेसो.
- ¤ तुमची प्रकृती कशी आहे? —तमारी तबीयत केवी छे?
- ¤ माझी प्रकृती ठीक आहे. —मारी तबीयत सारी छे.
- ¤ हे काय केलेस? —आ शुं कर्युं?
- ¤ इथून बाजार किती दूर आहे? —अहिंथी बजार केटली दूर छे?
- ¤ बराच दूर आहे. —घणी दूर छे.
- ¤ किती पैसे झाले? —केटला पैसा थया?
- ¤ माझ्याजवळ मोड नाही. —मारीपासे परचुरण नथी.
- ¤ ह्या शहराचे नाव सुरेन्द्रनगर. —आ शहेरनुं नाम सुरेन्द्रनगर.
- ¤ नमस्कार, काय कसे काय? —नमस्ते, केम छो?
- ¤ ही वस्तू कुठे मिळेल? —आ वस्तु क्यां मळशे?
- ¤ मला गाता येत नाही. —मने गाता आवडतुं नथी.
- ¤ चहा घ्या. —चहा ले.
- ¤ वाट दाखवा. —रस्तो बताव.
- ¤ मी हवा बदलण्याकरिता आलो आहे. —हुं हवा फेर माटे आव्यो छुं.
- ¤ तुमचे शिक्षण किती झाले आहे? —तमे क्यां सुधी भण्या छो?
- ¤ मी पदवीधर आहे. —हुं ग्रेज्युएट छुं.
- ¤ तुम्ही काय उद्योग करता? —तमे क्यो धंदो करो छो?
- ¤ नाही. —ना.
- ¤ मला थोडे पाणी प्यायला देता का? —मने जरा पाणी पिवा आपशो के?
- ¤ मी फिरायला जात आहे. —हुं फरवा जाऊं छुं.
- ¤ चला, चहा घेऊ या. —चालो, आपडे चा पीईये.

¤ ¤

# गुजरात-गीत

जय ! जय ! गरवी गुजरात !

जय ! जय ! गरवी गुजरात ! दीपे अरुणुं परभात !
ध्वज प्रकाशशे झळळळळ कुसुंबी प्रेमशौर्य अंकीत,
तुं भणव-भणव निज संतति सउने प्रेमभक्तिनी रीति,
उंची तुज सुंदर जात, जय ! जय ! गरवी गुजरात !

उत्तरमां अंबा मात
पूरबमां काळी मात

छे दक्षिण दिशमां करंत रक्षा, कुंतेश्वर महादेव,
ने सोमनाथ ने द्वारकेश अे पश्चिम केरा देव !
छे सहायमां साक्षात, जय ! जय ! गरवी गुजरात !

नदी तापी, नर्मदा जोय
मही ने बीजी पण जोय

वळी जोय सुभटना जुद्धरमणने रत्नाकर सागर,
पर्वत उपरथी वीर पूर्वजो दे आशिष जयकर !
संपे सोये सउ जात ! जय ! जय ! गरवी गुजरात !

ते अणहिलवाडना रंग
ते सिद्धराज जयसिंग

ते रंग थकी पण अधिक सरस रंग, थशे सत्त्वरे मात,
शुभ शकुन दिसे मध्याह्न शोभशे, वीती गई छे रात !
जन घूमे नर्मदा साथ, जय ! जय ! गरवी गुजरात !

—नर्मद


गौरवशाली गुजरातचा जयजयकार असो ! गुजरातच्या दाही दिशांवर लवकरच केशरी रंगाचा आणि प्रेम व शौर्य यांनी अंकित असा ध्वज फडकेल. हे गुजरात ! तू आपल्या प्रजेस प्रेम आणि भक्ती दे. गुजरातची ही भूमी श्रेष्ठ आणि सुंदर आहे. उत्तरेस अंबाजी माता असून पूर्वेला कालिका माता आहे. दक्षिणेस कुंतेश्वर महादेव शत्रूंपासून रक्षण करीत आहे. पश्चिमेस सोमनाथ आणि द्वारकेश साक्षात श्रीकृष्ण असून गुजरातच्या साहाय्यार्थ सदैव सिद्ध आहे. तापी, नर्मदा, मही इ. नद्या हा गुजरात न्याहाळीत आहे. आणि याच्या रणांगणावर सुभटांची युद्धगीते ऐकू येत आहेत. याच्या पश्चिमेस रत्नांचा महासागर आहे, तर कित्येक पर्वतांवरून गुजरातचे वीर-पूर्वज आशीर्वाद देत आहेत. येथील प्रजा ऐक्याने नांदत आहे. अन्हिलवाड पाटण येथील शूरांची परंपरा व राजा सिद्धराज जयसिंगाचे औदार्य व त्याग ह्या सर्वांमुळे गुजरातला एक आगळाच रंग प्राप्त झालेला आहे; पण या सर्वांहूनही अधिक सुंदर असा रंग त्याला लवकरच लाभणार आहे. कारण गुलामीची रात्र सरत आली असून स्वातंत्र्याचा मध्याह्न लवकरच चमकणार, असा शुभ शकुन दिसत आहे. गौरवशाली गुजरातचा जयजयकार असो !

□ □

क्रमांक 60679 दि. ... 
१२००६

REFBK 0019007

REFBK-0019007


पाकिस्तान
कच्छ रण
भुज
कंडला
ओखा
द्वारका
जामनगर
राजकोट
सुरेंद्रनगर
अहमदाबाद
जूनागढ
गिरनार पर्वत
पालनपुर
मेहसाणा
नडियाद
आणंद
भडोच
नर्मदा
सूरत
डांग
धरमपूर
दमण
अ र बी समुद्र
म हा रा ष्ट्र

आपला भारत महान देश आहे.

या महानतेत विपुल विविधता आहे.

प्रांत, भाषा, साहित्य, कला, घरदार, रीतीरिवाज, वेषभूषा या सर्वांतच विविधता आहे.

तरीही या सर्व विविधतेत एकच भारतीय आत्मा आहे.

या बहुरंगी भारतीयत्वाची ओळख करून देणारी

**आपला भारत**

ही माला आम्ही प्रकाशित करीत आहोत.

प्रत्येक राज्याची माहिती देणारी स्वतंत्र अशी पुस्तके लिहीत आहेत.

राजा मंगळवेढेकर

नितीन प्रकाशन, पुणे ३०